म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५४८

REFBK-0026799

# अमेरिकेच्या अंतरंगात

## ज्ञानदा नाईक

REFBK-0026799

श्रीविद्या प्रकाशन
२५०, शनिवार, पुणे ३०.

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन,
२५०, शनिवार पेठ, पुणे – ३०.

© ज्ञानदा नाईक

मुखपृष्ठ : कमल शेडगे

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१५ सप्टेंबर १९९२

मूल्य : पंचावन्न रुपये

मुद्रक :
आनंद लिमये
इंडिया प्रिंटिंग वर्क्स
४२ जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई - ४०० ०३१

टाईप सेटर :
हेमंत हरीष भोळे
'क्षितिज'
जी-१२, 'प्रगती टॉवर्स',
शिवाजीनगर एस. टी. स्टँड समोर,
पुणे : ४११ ००५.

ती. आईस.....

जी अमेरिका प्रवासाला निघण्यापूर्वी होती,

पण या पुस्तक प्रकाशनापूर्वीच

आपल्या अनंत काळाच्या प्रवासाला निघून गेली.....

# अंतरंगात शिरण्यापूर्वी

भारतामध्ये मी बरीच फिरले आहे. त्यावेळी माझा हेतू होता, निसर्ग पाहणे ! ईश्वराने निर्माण केलेली सृष्टी न्याहाळतांना वाटत असतं धरतीच्या हिरव्यागार वस्त्रावर शरीर झोकून द्यावं, पक्षी होऊन आकाशाचा गहिरा रंग न्याहाळावा. दऱ्याखोऱ्यातून हिंडून फुलांचा मनोहारी निसर्ग डोळ्यांनी पिऊन टाकावा, पक्षांची मधूर भाषा समजावून घ्यावी. प्रचंड लांबीरूंदीच्या दऱ्यांची खोली, धरतीवरचे हे वेडे पहाड, आकाशाला कवेत घेण्याचा प्रयत्न करत असतानाडोळे भरून पहावं. या विशाल आकाशाखाली, या अमर्याद शक्तीखाली, जेव्हा माणूस आपल्या कतृत्वाची अहंकाराची ताठ मानेने प्रौढी गातो आहे, त्यात काय अर्थ आहे, ते जाणून घ्यावं, ही माझी मनीषा तृप्त होणारी नव्हती. त्यामुळे मी प्रवासाचा बेत आखत असते. किमान पुणे-मुंबईचा प्रवास तर माझ्या नशीबात कायम लिहिला आहे. शिवाय निसर्गाच्या अद्‌भूत चमत्कारामुळं माझी प्रवासाची गोडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

निसर्गानं ज्या अनेक ठिकाणी आपला वरदहस्त ठेवला आहे, त्यापैकी अमेरिका हा एक देश आहे असे माझ्या मनात पक्के ठसले होते. त्यामुळे अमेरिकेला जाण्याचे बेत बऱ्याच दिवसांपासून डोक्यात घोळत होते. ते मूर्त स्वरूपात यायला कारणीभूत ठरला तो माझा भाऊ ! माझा धाकटा भाऊ जयदेव माढगूळकर व त्याची पत्नी उर्मी, लॉस एंजलिस येथील एका हॉस्पिटलमध्ये सोशल वर्कर म्हणून काम करत असत. माझ्या अमेरिका गमनाला त्यांचा प्रेमळ आग्रह कारणीभूत होताच.

शेवटी मी व तात्या (माझे वडील - श्री. व्यंकटेश माडगूळकर) यांनी अमेरिका भेटीची तयारी केली व ऑगस्ट १९९० मध्ये आम्ही लॉस एंजलिसला रवाना झालो.

सध्याच्या विमान युगात जग जवळ आलंय, हे जरी खरं असलं, तरी परदेश प्रवास हा वाटतो तेवढा सुलभ राहिलेला नाही. याचं प्रत्यंतर आम्हाला लॉस एंजलिस विमानतळावर पोचल्यावर आलं. वर्णद्विशामुळे तेथील अधिकाऱ्यांनी जवळ जवळ २-३ तास विमानतळावरच आम्हाला डांबून ठेवले. नको नको वाटले. त्याक्षणी वाटलं, की असंच भारतात परत फिरावं – काहीही झालं तरी तो 'माझा' देश आहे.

आपल्या मनस्तापावर निसर्गाची फुंकर अद्वितीय ठरली, असं म्हणावं लागेल. कारण नंतर जसजसे आम्ही अमेरिकेत फिरलो, तसतशी तेथील निसर्गरम्य दृष्यांनी माझ्या मनावर एवढी मोहनी घातली की लॉस एंजलिस विमानतळावरचा ताप मी केव्हाच विसरून गेले. एवढेच नव्हे, तर अमेरिकेतील मानवनिर्मित व निसर्गनिर्मित सौंदर्यस्थळे सहज अननुभूतीच्या शब्दांत गुंफणे आवश्यक आहे असे वाटले. तिथले अस्वस्थ करणारे अनुभव शब्दबद्ध करावेसे वाटले.

तसे पाहिले तर अमेरिका भेटीच्या प्रवासवर्णनांवर आजपर्यंत अनेकांनी पुस्तके लिहिली आहेत. श्री. पु. ल. देशपांडे यांचे 'जावे त्यांच्या देशा', सौ. मंगला साठे यांचे 'सफर' इत्यादी तर प्रसिद्धच आहेत. तेव्हा माझ्या या पुस्तकात नवीन काय साधणार ? पण देशांतर हा प्रत्येकाचा स्वतंत्र अनुभव असतो.

प्रस्तुत पुस्तकातील 'गराज सेल' आणि 'निसर्गानं कोरलेलं शिल्प' हे दोन लेख महाराष्ट्र टाईम्सने, तर 'हिरवळ आणिक गाडी' हा दै. सामना ने प्रसिद्ध केला हे लेख आवडल्याचे अनेकांनी कळवले आणि 'आणखी लिहा' असा आग्रह केला. तोही या पुस्तकाच्या निर्मितीला कारणीभूत झाला आहे.

या पुस्तक निर्मिताच्या कामी पाठ्यपुस्तक मंडळातील माझे सहकारी श्री. सतीश पोरे यांचे सहाय्य लाभले आहे. तसेच श्रीविद्या प्रकाशनाचे श्री मधुकाका कुलकर्णी यांचे प्रोत्साहन व सहकार्यही मिळाले आहे. श्री. श्रीनिवास प्रभूदेसाई यांच्या चित्रांमुळे पुस्तकाची लज्जत वाढली आहे. या साऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

पुणे, १५ सप्टेंबर १९९२ **ज्ञानदा नाईक**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | देशांतर - एक अनुभव | १ |
| २ | सुजन कसा | ६ |
| ३ | लक्ष्यवेधी लक्षवेध | ११ |
| ४ | जय स्वतंत्रते | १६ |
| ५ | देखणे फिरणे | २० |
| ६ | हिरवळ आणिक गाडी तेथे ..... | २६ |
| ७ | ज्ञानगंगेचा प्रवाह | ३१ |
| ८ | अमेरिकन टी.व्ही.चा अवर्णनीय अनुभव | ३५ |
| ९ | अमेरिकन तरुणी | ४० |
| १० | जन्मसिद्ध हक्क | ४७ |
| ११ | क्रेडिट कार्ड - (तिळा) दार उघड ..... | ५२ |
| १२ | गराज सेल | ५८ |
| १३ | असे जिणे यांत्रिकवाणे | ६२ |
| १४ | प्रधान अर्थ | ६८ |
| १५ | तुझी माझी धाव आहे | ७३ |
| १६ | गुणीजन अवघे | ७८ |
| १७ | विल्यमस् - अमेरिकन खेडे | ८४ |
| १८ | निसर्गाने कोरलेले शिल्प | ८९ |
| १९ | यंग गन्स - ए. के. ४७ | ९५ |
| २० | म्हातारा इतुका न ..... | १०१ |

शाखा (स्थळ प्रत)

# देशांतर : एक अनुभव

'सर्वच प्रवासी थापाडे असतात' असे विल ड्युरान्ट म्हणतो.

'प्रत्येकाच्या आपला देश सोडून इतर देशाबद्दल फार रम्य कल्पना असतात,' ही माझ्या ज्ञानात अनुभवाने पडलेली भर. आपला देश सोडून आपण परदेशात गेल्यावर तिथले लोक जेव्हा आपल्या देशाबद्दल त्यांना असणारे ज्ञान व्यक्त करतात तेव्हा आपण चकित तरी होतो किंवा भारावून जातो.

माझे वडील १९६० साली ऑस्ट्रेलियाला गेले होते. आपला भारत देश आणि त्याचा महान सांस्कृतिक वारसा याचा कुणाही भारतीयाला असावा तसाच त्यांनाही रास्त अभिमान होताच. ऑस्ट्रेलियात ते भारतामधून आले आहेत हे कळल्यावर त्यांना लोक विचारत, 'तुम्ही इंडियन्स झाडाच्या ढोलीत राहाता ना ?' त्या काळात ऑस्ट्रेलियात भारतीय फारसे गेलेले नव्हते म्हणे. एके ठिकाणी विचारले, 'तुम्ही कपाळावर रेड मार्क का नाही लावला ?' मेलबोर्नमध्ये विचारले, 'तुमच्या देशात रस्त्यावरून साप फिरतात म्हणे ?'

आता १९९० मध्ये मी अमेरिकेला चालले होते. अमेरिकेला जाणे म्हणजे मला फारच थोर वाटत होते. सुखसमृद्धीच्या सागरात मी निघाले होते. अनेक विचार मनात येत होते. अमेरिकन वेस्टर्न फिल्ममध्ये पाहिलेले, भली थोरली हॅट घालून, टाइट पँट घालून घोड्यावरून येणारे काऊबॉईज, जेव्हा तेव्हा पिस्तूल काढून भराभर मुडदे पाडण्याचे त्यांचे कसब म्हणजे अमेरिका. काही फिल्म्समध्ये आणि नॅशनल जिओग्राफीक या मासिकात पाहिलेले आणि वाचलेले रेड इंडियन्स, त्यांची घरे, त्यांचे गाव अमेरिका म्हटल्यावर आठवले. रेड इंडियन्स आणि काऊबॉईज याशिवाय मग बेस्ट सेलर्स वाचून ठाऊक असलेली अमेरिका म्हणजे व्हॅली ऑफ द डॉल्स, गॉडफादर वगैरे वगैरे..... अशी मी काही दिवस स्वप्नाळू डोळ्यांनी आणि चकित

चेहऱ्यानं वावरताना पाहून सारे म्हणत, 'अमेरिकेला निघालीय म्हणून तसं झालंय तिचं.'

मी ॲलकॉट या लेखकाचे वाक्य मनाशी घोळवत होते, 'जो मन आणि डोळे उघडे ठेवून प्रवासाला निघतो त्याचा प्रवास कधीच निष्फळ होत नाही.'

अमेरिकेत गेल्यावर तिथल्या लोकांची भारताबद्दलची कल्पना हळूहळू माझ्या ऐकण्यात येऊ लागली. ती अशी –

एक बाबा माझ्याशी बोलताना अमेरिकन स्टाईलने मोठ्यांदा हसून 'हनी' म्हणाला आणि मी भारतीय असल्याचे कळल्यामुळे मला विचारता झाला-

'डू यू स्पीक हिंडू ?' मला आधी कळलेच नाही. मग लक्षात आल्यावर मी त्याच्याच स्टाईलने हसून म्हटले, 'नो नो, आय डू नॉट स्पीक हिंडू. आय ॲम हिंदू.' त्यावर 'ओ दॅटस् वंडरफुल्ल' म्हणाला. कुठलीही गोष्ट-मग ती स्वतःला कळो वा न कळो-अमेरिकनांना वंडरफुल किंवा इंटरेस्टिंग किंवा नाईस् वाटत राहते.

तिथे एका छोट्या शहरातल्या सार्वजनिक ग्रंथालयात गेले होते. ज्ञानभांडार. त्या भांडाराचे रक्षक आणि काळजी घेणारे म्हणजे ग्रंथपाल. ग्रंथ हे गुरू आणि त्या गुरूंच्या सहवासात अष्टौप्रहर राहाणाऱ्या या शिष्या. मी भारतीय आहे म्हटल्यावर काउंटरवरील बाई म्हणाली, 'भारतीय आहेस मग इंग्रजी कसं बोलू शकतेस ?' दुसरी मला म्हणाली, 'हो का ! किती इंटरेस्टींग ! मला भारताची माहिती आहे. कारण माझा भाऊ सहा वर्षे कुवैटला होता.' बाईचे भारताविषयीचे ज्ञान एकूण थोरच होते. मी नर्व्हसली हसून म्हणाले, 'हो का ? ओ दॅटस् ग्रेट.'

एकूण अमेरिकेत गेल्यावर तिथल्या लोकांचे माझ्या प्रिय भारत देशाविषयीचे ज्ञान, त्यांना माझ्या देशाविषयी असलेली माहिती आणि कुतूहल याबद्दलचे अनेक अनुभव मला संपूर्ण प्रवासात आले. बऱ्याच वेळा मला अगदी दाट संशय यायचा की मी इंडियन आहे असे सांगितल्यावर समोरच्याला नक्की वाटत असावे की ही 'रेड इंडियन' आहे. कारण बऱ्याच अमेरिकनांना तोच शब्द परिचयाचा आहे. हजारो वर्षांपासून इथे रेड इंडियन्स राहातात. सुमारे पंचवीस हजार वर्षांपूर्वी आशियामधून जे लोक स्थलांतर करून अमेरिकेत स्थायिक झाले त्यांचे हे वंशज आहेत असे मला तिथल्याच एका ग्रंथालयात वाचायला मिळाले. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या 'रेड इंडियन्स' वरच्या पुस्तकातही फुडगॅदरर्स आणि हंटर्स म्हणून होपी इंडियन्स, हवासुपाई इंडियन्स, अनासाझी इंडियन्स, नवाजो इंडियन्स अशा अनेक जमातींचा एकत्रित उल्लेख करताना 'इंडियन्स' असाच केलेला दिसतो. त्यामुळे इंडियन

म्हटल्यावर आपण, 'खासी, तोडा, गावडा, वारली वगैरे जंगलातल्या आदिवासींकडे पाहातो तशा कुतूहलाच्या आणि सहानुभूतिपूर्ण नजरेने समोरचा माझ्याकडे पाहातोय असे वाटायचे. कसेसेच व्हायचे. ओशाळल्यागत हसून मी पुन्हा सांगण्याचा प्रयत्न करायचे की, मी अमेरिका पहाण्यासाठी इंडियामधून म्हणजे हिंदुस्थानामधून नुकतीच इथे आलीय. ते ऐकून काहींचा चेहरा बदलायचा. काहींच्या चेहऱ्यावर मात्र मी रेड इंडियन आहे असे वाटून जे भाव उमटलेले असायचे त्यात माझ्या नव्या माहितीने काहीही बदल झालेला आढळून यायचा नाही. मला या गोष्टीचे जरा दु:खच व्हायचे. पण परदेशात अशा गोष्टी मनाला लावून घ्यायच्या नसतात असे म्हणून मी स्वत:ला समजावीत असे.

तिथल्या भारतीय रेस्टॉरंटमध्ये अत्यंत प्रेमाने भारतीय जेवण जेवायला वारंवार येणारे एक गोरे जोडपे मी काही वेळा पाहिले. टिपिकल अमेरिकन दिसणारा तो आडदांड उंचापुरा दाढी वाढलेला गृहस्थ मोठ्या चवीने जेवायचा. तो ऐटीत ऑर्डर देई, 'थॉली फॉर बोथ ऑफ अस.' मग थाळी आली की त्याच्या 'आनंद भोजनाला' सुरुवात होई. वाघ जशी आपली शिकार प्रथम काळीज, मग फुफ्फुसे असा मऊ भाग आधी मग मांसल भाग अशी टप्प्याटप्प्याने खातो तसा तो प्रथम सारे लोणचे चाटूनपुसून खाऊन टाकत असे. मग पापडाचा फडशा, त्यानंतर सगळी आमटी सूपसारखी पिऊन टाकत असे. मग सगळी भाजी चाखत माखत खाऊन टाके. मग गुंडाळा करून चपाती आणि शेवटी भाताची पाळी येई. त्याची ओळख झाली. एकदा तो म्हणाला, 'आय लाइक दोज क्यूट लीटील डोनटस्.' मला कळले नाही. पाहाते तर वडा सांबाराच्या दोन डिश समोर आल्या. त्याने आधी सगळे सांबार अत्यंत चवीने पिऊन टाकले आणि मग सावकाशपणे एकामागून एक क्यूट लीटील डोनटस् संपवले. त्यांचे हे चिनी कोर्सेससारखे भारतीय जेवण चालू असताना तो गप्पाही मारत होता.

'मला भारतीय फिल्म्स खूप आवडतात.' – माईक

'ओ, दॅटस् व्हेरी इंटरेस्टींग.' – मी.

'व्हाय डू यू रन अराऊंड द ट्रीज ?' – माईक

माझा चेहरा गोंधळून प्रश्नार्थक. आधीच अमेरिकनांचा अॅक्सेंट कळत नाही. बऱ्याचदा समोरचा इंग्लिश भाषा बोलतो हेही सुरुवातीला मला कळायचे नाही. पुढे सवयीने त्यांचे इंग्रजी कळू लागले. पण फार मन लावून ऐकावे तेव्हाच ते कळे.

'व्हाय डू यू रन ऑल द टाइम अराऊंड द ट्रीज इन इंडिया ?'

तरीही मला काही केल्या त्याचा प्रश्न कळेना. त्याने जरा जास्त स्पष्ट केले.

'इज देअर अ रिच्युअल इन लव्ह अफेअर्स टू रन अराउंड द ट्रीज ? यू मस्ट हॅव डन लॉट ऑफ दीज ट्री रनींग व्हेन यू गॉट मॅरीड.'

माझ्या डोक्यात प्रकाश पडला. माईकने टी. व्ही. चॅनेलवर हिंदी छायागीते पाहिली होती. भारतात प्रेम करताना झाडांभोवती पळण्याची रीत आहे, किंबहुना तो एक आवश्यक विधी आहे अशी त्याची ठाम समजूत. कलेचा असाही परिणाम असतो हे तेव्हा कळले.

लिंडा ही हुषार अमेरिकन विद्यार्थिनी. सर्वसामान्यांहून वेगळी. स्कॉलर. वाचन उत्तम. सामान्य ज्ञानही चांगले.

एकदा तिने मला विचारले, 'भारतात बायका सती जातात ना ?'

प्रश्नाचा रोख ध्यानात न आल्याने मी तिचे भारताविषयीचे ज्ञान पाहून जरा कौतुकभरल्या नजरेने तिच्याकडे पाहिले. अरे वा! भारताबद्दल हिला जरा सखोल माहिती दिसतीय असे मला वाटले. तोवर तिने पुढचा प्रश्न विचारला,

'विल यू ऑल्सो परफॉर्म सती ?'

सर्वांत लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे अमेरिकेत एकदा टी. व्ही. पाहात बसले होते. टी. व्ही. ची एक टीम प्रत्यक्ष सैन्याने तळ ठोकलेल्या जागी गेली होती.त्या सैन्याचे तिथले राहाणे कसे आहे, त्यांच्यासाठी काय काय सोयी आहेत, तिथे नेलेली शस्त्रास्त्रे आणि त्यांच्या सान्निध्यात राहाणारे अमेरिकन सैनिक. वार्ताहर चकचकीत उन्हांत घामाने निथळणाऱ्या एका विशी-बाविशीच्या तरण्या बांड उंच्यापुऱ्या सैनिकांशी बोलत असताना दाखवला गेला. सैनिकाच्या अंगावर आजूबाजूच्या वाळवंटी वातावरणात सामावून जातील अशा रंगाचे व चित्राचे कपडे होते.

इंटरव्ह्यूअरने विचारले – 'सद्दाम हुसेनबद्दल तुला काय वाटते ?'

निर्विकार चेहऱ्याने सैनिकाने उलट प्रश्न केला – 'हू इज ही ? नेव्हर हर्ड ऑफ हिम.'

आमचा सामान्य शिपाई जेव्हा चीनशी लढायला युद्धभूमीवर गेला होता, पाकिस्तानशी, बांगलादेशाशी युद्ध करायला रणभूमीवर सिद्ध होता तेव्हा तो कुणाशी युद्ध करतोय, त्या युद्धाला जबाबदार कोण हे त्याला नक्कीच ठाऊक होते.

अमेरिकेतल्या सर्वसामान्याला अमेरिका म्हणजेच संपूर्ण जग वाटते. बाहेरचे जग त्याला फारसे माहीत नसते. याउलट भारतातल्या कारकुनालाही अमेरिका कुठे आहे, तिचा राष्ट्राध्यक्ष कोण, सध्या तिथे कुठली महत्त्वाची घडामोड झाली हे

ठाऊक असते. एकूणच पाहिले तर जागतिक घडामोडींबद्दल शिक्षित भारतीय माणसाला कुतूहल असते. त्या कुतूहलापोटी तो वृत्तपत्रे वाचतो. (अमेरिकेत मतदान करणाऱ्यांची आणि वृत्तपत्रे वाचणारांची संख्या फार कमी आहे असे म्हणतात.)

थोडक्यात अमेरिकनांच्या सामान्य ज्ञानाबद्दल माझे मन फारच शंकित झाले आहे. आणि सर्वच प्रवासी थापाडे असतात हे विल ड्युरान्टचे मत गृहीत धरूनसुद्धा अमेरिकेच्या प्रवासात मला आलेल्या अनुभवांचे शब्दांकन करण्याचे मी नक्की ठरवून टाकले आहे.

❖❖❖

# सुजन कसा

उन्हाळा सुरू होता तरी पहाटे अत्यंत आल्हाददायक वाटायचे. संत्र्याच्या शेकडो बागा रसरशीत, चमकदार नारिंगी रंगाच्या टपोऱ्या फळांनी लहडल्या होत्या. त्यांचा वास साऱ्या वातावरणात भरून राहिलेला असायचा. अशा रम्य पहाटे रेडलँड शहराच्या रस्त्यावरून फिरणे हा एक अनुभवच. रस्त्यांच्या दुतर्फा साठ-साठ फूट उंचीचे पामवृक्ष. काळेशार, सरळसोट, दूरवर जाऊन नजरेआड होणारे रस्ते. त्या रस्त्यांच्या कडेला विजेचे खांब म्हणूनही ५० फूट उंचीची पाम वृक्षांची खोडेच उभी केलेली. ते पाहताना वाटे, इतक्या उंच खांबांवर चढून दुरुस्ती हे लोक कसे बरे करत असतील? भोवताली कौलारू टुमदार घरे आणि पोपटलेली हिरवळ पांघरून बसलेली हिरवी अंगणे. त्यात उडणारे स्प्रिंकलर्स. मध्ये एखादा डेरेदार वृक्ष आणि छोटीशी पण खूप प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांनी नटलेली बाग. कौलांवर पडलेली कोवळी किरणे. सारे वातावरण फार सुरेख वाटायचे. आणि या सर्वांवर ताण करणारी मन प्रसन्न करून सोडणारी गोष्ट म्हणजे समोरून येणाऱ्या, फिरायला बाहेर पडलेल्या कुणीही अमेरिकनाने आपल्याला पाहून तोंडभर हसून 'गुडमॉर्निंग, हॅव अ नाईस डे' असे प्रसन्नपणे म्हणणे. अंगावर कुणी गुलाबपाणी शिंपडावे तसे वाटायचे, ते हसणे आणि अभिवादन.

कुणाची नव्याने ओळख झाली किंवा कुणी ओळखीचा भेटला तर 'हॅलो' म्हणायची परदेशात पद्धत आहे एवढेच मला ठाऊक होते. इथे मात्र ओळखीचा भेटला की विचारी, 'व्हॉट इज गोईंग ऑन ?'

कुणी असे विचारले की मी अत्यंत प्रामाणिकपणे दिवसभराच्या सगळ्या घडामोडी सांगायचे. एवढे आपुलकीने विचारतोय तर सांगायला नको का? पण अशा वेळी समोरचा अमेरिकन अत्यंत गोंधळून चकित मुद्रेने माझ्याकडे पाहायला

लागायचा. माझे सारे बोलणे संपेपर्यंत अस्वस्थपणे उभा राहायचा. काही काळानंतर एका दयाळू गृहस्थाने मला सांगितले,की असे कुणी विचारले की खरोखरच दिवसाचा वृत्तान्त द्यायचा नसतो.

'मग काय उत्तर द्यायचे?'

'व्हॉट इज गोईंग ऑन ?' विचारल्यावर उत्तर द्यायचे, 'नथिंग मच रिअली.' ही एक पद्धत आहे. त्याला पद्धत म्हणूनच उत्तर द्यायचे असते. आणि नंतर आपण पुन्हा विचारायचे,'हाऊ इज इट गोईंग फॉर यू?'

असे केवळ पद्धत म्हणून किंवा मॅनर्सचा भाग म्हणून इथली मंडळी बऱ्याच गोष्टी सवयीने करतात. तुम्हाला अमेरिकन आयुष्यात रुळायचे असेल तर असे मॅनर्स माहीत असणे फार आवश्यक असते.

इथे वावरताना कुणी शिष्टपणे वागताना सहसा आढळत नाही. समोरचा ओळखीचा असो वा नसो; अमेरिकन त्याच्याकडे पाहून मनमोकळे या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत हसतो आणि 'हॅव अ नाईस डे' अशी सदिच्छा व्यक्त करतो. किंवा 'टेक इट इझी' असा फार प्रेमळ वाटणारा सल्ला देऊन निघून जातो. हॉटेलमध्ये जाणेही त्यामुळे सुखद असते. लांब चेहरा करून कंटाळवाण्या सुरात वेटर 'क्या चाहिये ?' असे विचारत नाही. तुमच्यापाशी आल्यावर आधी तो मोठे हास्य करतो. मग स्वतःचे नाव सांगतो. प्रसन्नपणे विचारतो किंवा विचारते, 'हाय गाईज, हाऊ आर यू डुईंग ?' मेनू कार्ड येण्याआधी कुठल्याही हॉटेलमध्ये आधी हा प्रश्न येतो. माझ्या कानाला आधी ते 'गाईज आऊ यू डुईंग' एवढेच ऐकू येई. नंतर पूर्ण वाक्य कळले. तुमच्यात आणि त्यांच्यात एक मित्रत्वाचा संबंध लगेच प्रस्थापित होतो. असा प्रश्न इथे प्रत्येकजण विचारतो. दुकानात कॅशिअर विचारेल, पेट्रोल पंपवाला विचारतो, सुपर मार्केटमधली सुपरवायझर विचारते, पोस्टातला क्लार्क विचारतो. समजा कुणी नाहीच विचारला तर आपण दुसऱ्या व्यक्तीला हा प्रश्न भेटल्या भेटल्या विचारणे आवश्यक असते. कारण हा सोशलायझिंगचा भाग आहे. आणि पुन्हा महत्त्वाचे म्हणजे असे विचारणे हे मॅनर्स आहेत. आणि कुठल्याही संभाषणाचा शेवट कुणी एकाने तोंडभर हसून 'हॅव अ नाईस डे' असे म्हणून करायचा. मग त्यावर मोठे गालभर हसून समोरच्याने 'यू टू' असे म्हणायचे. तेही 'युचू' ऐकू येते. दोन्ही पार्टीकडून अशी ठराविक शाब्दिक देवाणघेवाण झाल्याशिवाय कुठलेही संभाषण ऑफिशिअली संपवता येतच नाही.

एक गोष्ट लक्षात येते की ही माणसे काही वेळा सकारण आणि बहुतेक

वेळा अकारण सारखी आपली हसत असतात. टी. व्ही. पाहातानाही हाच अनुभव. मुलाखत असो, एकपात्री प्रयोग असो वा चर्चा असो- टीव्हीवर प्रत्येकजण सारखा का हसतोय हेच खूपदा कळत नाही. कुठल्याही चॅनेलचे बटण दाबले, की पहिल्या काही सेकंदांत एक हसणे ऐकू येते. भाषेपेक्षा त्यांना देवाणघेवाणीसाठी हसणे हे जास्त प्रभावी माध्यम वाटत असावे.

एकदा सिग्नलपाशी आमची गाडी उभी राहिली. मागे भल्याथोरल्या टेंपोत एक आफ्रिकन कुळकुळीत काळी मुलगी आणि तिची तीन वर्षांची छोटी होत्या. (टेंपो चालवणे इथे स्टेटस सिम्बॉल) ऐनवेळी तिला ब्रेक चटकन् लावून वेगनियंत्रण करता आले नाही. आमच्या गाडीला धडक देऊन तिची गाडी थांबली. चांगला हादरा बसला. झालेल्या अपघाताने मी तर बधिर झाले होते. ट्रॅफिकच्या रांगेतून आम्ही गाडी बाजूला पेट्रोल पंपावर घेतली. त्या निग्रो टेंपो ड्रायव्हर पोरीसही बोलावले. दोन्ही गाड्या उभ्या राहिल्या. बाकीची रहदारी सिग्नल मिळाल्यावर सुरू झाली. कुणाला थांबायला वेळच नसतो. त्यामुळे सहानुभूती दाखवायला उभे बघे इथे दिसत नाहीत. सिंपथी वॉचर असा त्याच्यासाठी शब्द आहे. निग्रो मुलगी खाली उतरली. झालेल्या प्रकाराने ती खूप घाबरलेली होती. आमच्या गाडीतली लिंडा खाली उतरली. तिचा गोरा चेहरा भीती, संताप, चीड यांनी तांबडाबुंद झाला होता. दोघी आपापल्या गाड्यांना किती लागले आहे ते पहायला आधी धावल्या. कारण गाडी यांचा दुसरा जीव. माझ्या बाजूचे दार धडकेने गच्च झाले होते. लिंडा उतरताना मला ओरडून म्हणाली, 'त्या गाडीचा नंबर टिपून घे.' अमेरिकेत असे प्रसंगावधान प्रत्येकात दिसले. मग त्या दोघींत संभाषण झाले ते असे :

निग्रो ड्रायव्हर मुलगी : ओ (हसणे) आय ॲम व्हेरी नर्व्हस.

कॉकेशिअन ड्रायव्हर लिंडा : यस मी टू.

हे म्हणताना सर्व दात दिसतील असे हास्य.

निग्रो स्त्री ड्रायव्हर : ओ आय ॲम ट्रेम्बलिंग. (मग पुन्हा हॅ हॅ हॅ-हसणे.)

कॉकेशिअन स्त्री ड्रायव्हर : या (हसून) मी टू. कॅन आय हॅव यूवर लायसन नंबर प्लीज ?

निग्रो ड्रायव्हर : ओ सर्टनली. (हसणे) बट आय हॅव नो ड्रायव्हिंग लायसन्स. (पुन्हा हसणे)

मग मी नर्व्हस होऊन ट्रेम्बल होतेय म्हणणाऱ्या त्या काळ्या मुलीने अगदी सयमसूचकतेने अत्यंत वेगाने आपल्या गाडीतून चक्क कॅमेरा बाहेर काढला. हेही

इथल्या मंडळींचे एक वैशिष्ट्य. कायम व्यवहारीपणा. परिस्थिती काहीही असो. क्षणार्धात आमच्या गाडीचे पाठीमागून वेगवेगळ्या अँगल्सने तीन फोटो काढले आणि घशातल्या घशात हसत ती म्हणाली, 'तुमचे फारसे नुकसान झालेले दिसत नाही. माझ्याकडे आता त्याचा पुरावाही आहे. पण तुम्ही क्लेम करा. मी नुकसान-भरपाई देईन.'

मग त्या दोघी एकमेकींकडे पाहून तोंडभर हसल्या. एकमेकींना 'बी गुड' आणि 'टेक इट इझी' म्हणाल्या आणि आपापल्या गाड्यांत बसल्या. या सारख्या का हसताहेत ते मला कळेना. लिंडा म्हणाली –

'हे साले ब्लॅक क्रिमिनल माइंडचे आहेत. सध्या इकडे बरीच कुटुंबे शिफ्ट झाली आहेत. वैताग.'

मॅनर्स म्हणा किंवा पद्धत म्हणा किंवा औपचारिकता म्हणा, पण इथे राहणाऱ्याला अमेरिकन गुणीजनांचे हे असले अनेक गुण आत्मसात करावे लागतात.

सतत हसणे या गुणाच्या जोडीला अमेरिकनांचा दुसरा भीती वाटण्याजोगा गुण म्हणजे आत्यंतिक स्वच्छतेची आवड. मी भारतात वाढलेली. त्यामुळे थोडासा तरी अस्वच्छपणा आजूबाजूला हवासा वाटे. त्याशिवाय काही गंमत नाही, अशा जगण्यात रंगत नाही. पण छे! इथे प्रत्येक घरी साफसफाईची उपकरणे आणि फवाऱ्याचे प्लॅस्टिक डबेच जास्त. बाथरूममध्ये ती साफ करण्यासाठी वेगवेगळ्या आकाराचे दहा ब्रश. बेसिनसाठी वेगळे, आरशासाठी वेगळा, टबसाठी वेगळा, नळांसाठी वेगळा असे साफ करण्याचे फवारे, जंतुनाशके आणि ढीगभर टिश्यू पेपर्स. देसाईबाई २८ वर्षे अमेरिकेत राहिल्या आहेत. भारतात येताना बॅगभर टिश्यू पेपर्स घेऊन येतात म्हणे. शरीराच्या सफाईपेक्षा बाथरूमची साफसफाई यांना महत्त्वाची. त्या चकाचक बाथरूममध्ये पाऊल ठेवण्याचीही हिंमत होत नसे. आपण आंघोळ केली तर अंगावरच्या धुळीने बाथरूम मळकट होईल असे वाटे. घरात लाकडी सामान व पितळी दांडे, कड्या जे असेल ते चकचकीत करण्यात यांचा सारा रविवार जातो. त्यासाठी फर्निचर पॉलिश स्प्रे, ब्रास पॉलिश, वॉल पॉलिश स्प्रे. सगळ्यांत महत्त्वाची स्वच्छता लॉनची. लॉन मोहरते ती सारखी आपली कापायची. 'मिरॅकल ग्रो' चे फवारे मारायचे. कुठल्याही घराबाहेर लॉनवर एक पान पडलेले कधी दिसत नसे. अनेक वृक्ष सभोवती असून तेथल्या लॉनवर पाचोळा कसा नसतो याचे मला फार आश्चर्य वाटे. मला वाटते पान पडले की ही मंडळी ब्लोअर घेऊन जीव खाऊन

धावत असावीत.

आयुष्याचे तुझे ध्येय काय ? असा प्रश्न विचारला, तर कुणीही अमेरिकन पटकन सांगेल, 'लॉन स्वच्छ ठेवणे व त्यात 'डेझी' न उगवू देणे.' दुर्लक्षित लॉन कशी ओळखायची ? तर त्यात डेझीची पिवळी बारकी फुले उगवली असली की. जातिवंत अमेरिकनाला बट्टा लावणारी एकच गोष्ट आहे असे माझ्या ध्यानात आले. ती कुठली तर आपल्या अंगणातल्या लॉनमध्ये डेझीचे फूल उगवणे. कारण ही गोष्ट प्रत्येक अमेरिकनाला अगदी मरून जाण्याइतकी भयंकर वाटते.

# लक्ष्यवेधी लक्षवेध

उन्हाळा सुरू होता. इथे लोक उन्हाळ्यावर खूश. कारण हा ऋतू असतो बागेतील, बार्बक्यूज, आठवड्याची सुट्टी समुद्रकाठी घालवण्याचा आणि आखूड चड्ड्या आणि गॉगल्स घालून फिरण्याचा. ही कॅलिफोर्नियाची प्रतिमा आहे. बैलाचे चित्रसुद्धा गॉगल्ससह. चड्ड्यांवर रंग निऑनचा, टी शर्टवर भडक मोठे चित्र आणि त्यावर बोधवाक्ये, 'या टी शर्टमधल्या वस्तूचे आकारमान दिसते त्यापेक्षा मोठे आहे' किंवा 'सर्व सामान्य कशासाठी व्हायचे ?' (ऑब्जेक्टस अंडर धिस शर्ट आर लार्जर दॅन दे ॲपिअर किंवा व्हाय बी नॉर्मल.) इथे गॉगल्सना सनग्लासेस म्हणायचे असते. उघड्या गाड्यांमधून प्रचंड मोठ्यांदा संगीत लावून फिरायचे असते. इथे सगळे प्रॉबेबली असते. धूसर असते आणि हवेतले बोलायचे असते, ठाम नाही. त्यामुळे संभाषण असे -

- आपली कालच दुपारी झेरॉक्स ऑफिसमध्ये मि. जॉन्सनच्या केबिनमध्ये भेट झाली.

- ओ यस् प्रॉबेबली वी मेट यस्टर्डे.

किंवा

- मला आपला चेहरा आणि नाव नीट आठवले आहे. आपण मि. डग्लस ना?

- ओ यस् प्रॉबेबली आय ॲम.

तुम्ही सदर्न कॅलिफोर्नियामधले आहात हे लोकांच्या लक्षात यावे म्हणून अधूनमधून 'हेऽऽ ड्यूड. व्हॉट्स हॅपनिंग ?' असे ओरडावे लागते किंवा तुमच्या संभाषणात पुढील वाक्प्रचार अत्यावश्यक असतात : (१) मॅन, दॅट्स रॅडिकल. कुणी आऊट ऑफ द वे काही केले असेल तर, (२) ओसम, (३) ह्युमंगस,

(४) गो रॉजर्स, शेवटच्या वाक्‌प्रचारामुळे तुमच्या मनात गोंधळ उडेल म्हणून जरा स्पष्टीकरण करते. फुटबॉल हा इथे देशाच्या पातळीवरचा खेळ आहे. ते ज्या खेळाला फुटबॉल म्हणतात त्या खेळाचा ज्याला आपण फुटबॉल म्हणतो त्याच्याशी काहीही संबंध नाही. त्यांचा फुटबॉल दुष्ट चेहेऱ्याच्या 'ड्युड्स' नी युक्त असतो. ही मंडळी निसर्गाची चूक म्हणून जन्माला आल्यासारखी मिरवतात. ही मंडळी निव्वळ शक्तिप्रयोगाने इतरांना जमीनदोस्त करण्याच्या कलेत अत्यंत पारंगत असतात. खेळातील ही सर्वांत महत्त्वपूर्ण बाजू असते. बाकीचे सगळेच दुय्यम असते. ह्या खेळाचे नियम फार गुंतागुंतीचे आहेत व मला ते अद्यापही समजले नाहीत. माझ्या सर्व अमेरिकन मित्र- मैत्रिणींनी वारंवार ते मला समजावून सांगण्याचे निष्फळ प्रयत्न केले. पण ते मला अद्यापही समजलेले नाहीत. असो, पण प्रत्येक मोठ्या शहराची स्वतःची फुटबॉल टीम असते. द सनफ्रान्सिस्को फोर्टीनाइनर्स, शिकागो, बुल्स, डॅनुव्हर ब्रॉंकोज, फिनिक्स कार्डिनल्स, ह्युस्टन ऑईलर्स आणि लॉस एन्जलीसचे रेडर्स. तुम्हाला यांपैकी एखाद्या टीमचे फॅन असणे अत्यावश्यक असते. आणि तुम्ही खरेखुरे दक्षिण कॅलिफोर्नियावाले असाल तर तुम्ही रेडर्सचे फॅन किंवा रॅम्सचे फॅन. (लॉस एन्जलीस मोठे शहर असल्याने त्याचे फुटबॉलचे रेडर्स आणि रेम्स असे दोन संघ आहेत.) ओहियोमध्ये सिनसिनाटी नावाचे शहर आहे. त्यांच्या टीमचे नाव सिनसिनाटी बेन्गॉल्स आहे. हे ऐकून मी फार गोंधळून गेले. कलकत्ता आणि सिनसिनाटीचा काही संबंध अथवा साम्य माझ्या लक्षात येईना. फक्त दोन्ही नावांची सुरुवात सी या इंग्रजी वर्णाक्षराने होते एवढेच साधर्म्य. मग कुणीतरी मला सांगितले की ते (टीम) वाघाइतकेच **'फेरोशिअस'** असतात. आणि वाघांची एक जात बंगाली वाघ म्हणून ओळखली जाते. हे समजल्यावर मी एवढेच म्हणू शकले –

'ओ आय सी !'

लोकांचे लक्ष आपल्याकडे कोणकोणत्या प्रकारे वेधून घेणे शक्य असते या गोष्टीचा कॅलिफोर्नियातल्या मंडळींनी निश्चितच प्रचंड अभ्यास केलेला असावा असे मला तिथे राहताना पदोपदी जाणवायचे.

या गोष्टीचे ट्रेनिंग इथे एक तर अगदी बालपणापासूनच मिळत असावे किंवा लक्ष वेधून कसे घ्यावे ही कला उपजत त्यांच्या रक्तामध्येच असावी.

लहान पोरांत हे बाळकडू कसे असते याचा उत्तम नमुना समोरच्या घरात मला दिसला. यांच्या घरावर आडनावाची पाटी होती 'मुर्कोव्हस्की.' पण हे अमेरिकन सिटीझन होते. या घरातली बाई कायम लॉन मुव्हरने लॉन कापून व्यवस्थित करताना

दिसायची. घरचा कर्ता सकाळी ८ वाजताच गाडी काढून कामाला निघून जायचा. तो निघताना लहान बाळाला घेऊन बायको टाटा करायला बाहेर यायची. नवराबायको एकमेकांना 'गुडबाय हनी, हॅव अ नाईस डे' वगैरे करायचे. मग त्या माणसाने रिव्हर्समध्ये गाडी बाहेर काढायला सुरुवात केली की बापाची बदमाशी त्या बाळाच्या लक्षात यायची. 'ही मूर्ख माणसे माझे अस्तित्व विसरून जातात म्हणजे काय?' मग आपल्या अस्तित्वाची जाणीव करून द्यायला ते पोर किंचाळत सुटायचे. हा प्रकार रोज घडायचा. बरं रागवायची सोय नाही. बाई संतापून पण शक्य तेवढ्या खालच्या आवाजात 'लुक हिअर, डोन्ट क्राय' असे पुन्हा पुन्हा सांगत राहायची. शेवटी बाप उतरून त्याला 'गुडबाय हनी' म्हणायचा. मग ते पोरगं गप्प बसायचं.

तरुण पोरंपोरी आईबापांना ही जाणीव वेगळ्या प्रकारे करून देतात. प्रत्येक गोष्टीत 'स्वतःचा हक्क' म्हणून भांडतात. आईबापांशी भांडण करून एक उत्तम घरातला पोरगा बाहेर पडला. हॅम्बर्ग खात, कोक पीत वडिलांच्या बंगल्यासमोरच रस्त्यावर तो उभा राही. त्याच्या डाव्या हातात पाटी असे :

'आय विल वर्क फॉर फुड.' बरं, पोरे चुकीची वागली तर त्यांना शिक्षा करता येत नाही. कायद्याने इथे तो गुन्हा आहे. हे प्रत्येक अमेरिकन पोर उत्तमपणे जाणून असते. इथेच जन्माला येऊन अमेरिकन सिटीझन झालेली भारतीय आईबापांची पोरे तर या गुणात जास्तच पुढे. बाटगा मुसलमान जास्त कडवा, तशातला प्रकार. भारतीय आईबाप 'काय झाले पोराला रागावले, मारले तर. आम्ही नव्हतो मार खात आमच्या आईवडिलांचा?' म्हणून पोरांवर ओरडले, त्यांना मारले तर ही पोरे थेट पोलिस स्टेशनवर जाऊन आपल्या आईबापांची सरळ 'चाईल्ड ॲब्युज'ची कम्प्लेंट नोंदवतात.

मोठ्या माणसांचे मार्ग वेगळे. पण उद्दिष्ट तेच. लक्ष वेधून घेणे. तुम्हालाही इथे नर्व्हस ब्रेक डाऊन हा प्रकार करून पाहाता येईल. लक्ष वेधण्याचा हा हमखास प्रकार. ऊठसूट प्रत्येकाचा, विशेषतः स्त्रियांचा इथे सारखा आपला नर्व्हस ब्रेक डाऊन होत असतो. याबाबतचे शिक्षण कुणाही डॉक्टरकडून, सोशल वर्करकडून किंवा अमेरिकन मैत्रिणीकडून सहज घेता येते. हा प्रकार सोपा आणि सहजी जमण्यासारखा आहे. करून पाहण्याजोगा आहे. यामुळे अनेक संभावितांचे लक्ष व सहानुभूती दोन्ही वेधून घेता येते. माझी एक मैत्रीण अमेरिकेत असते. बऱ्याच दिवसांत नवऱ्याने तिच्या आईला पत्र पाठवले नाही, बर्थ डे ग्रीटिंग पाठवले नाही, हिने आठवण करूनही! झाले, हिचा नर्व्हस ब्रेक डाऊन झाला. नवरा रजा घेऊन

कधी नव्हे ते घरी तिच्याभोवती. मित्र-मैत्रिणी भेटायला आणि तिच्या मनावरचा ताण कमी करण्यासाठी वीस डॉलर्स घेऊन रोज एका मानसोपचार तज्ज्ञाची तिच्या घरी फेरी. एवढे सारे एका नर्व्हस ब्रेक डाऊनमुळे मिळू शकते.

'आय ॲम नॉट द टाईप टू कम्प्लेन' असे भोवती चार-दोन माणसे असताना कायम कम्प्लेंट करत राहायचे. आपण कसे सोशिक आहोत हे सांगत आपल्याबद्दल सतत रडायचे. ही एक लक्षवेधी कला इथे आढळून येते.

घरातल्या माणसाला इतर कुटुंबीयांसमोरच अत्यंत गंभीर चेहऱ्याने थंड सुरात सांगायचे, की 'आय नीड टू टॉक टू यू' की त्या ऐकणाऱ्याचे धाबे दणाणतेच. पण साऱ्या कुटुंबाचा मध्यवर्ती आणि महत्त्वाचा घटक हे बोलणारी व्यक्तीच त्या क्षणी बनते. घरी कुणी येणार असेल तर पतिपत्नी एकमेकांना, 'तू हे फारच छान करतोस. गेल्या वेळी सगळ्यांनीच किती स्तुती केली' असे सारखे म्हणायचे.

घरात लक्ष वेधून घेण्याचे आणि बाहेर समाजात लक्ष वेधून घेण्याचे प्रकार अत्यंत वेगळे. त्यासाठी काही ठरलेल्या फ्रेजेस वापराव्या लागतात.

'यू आर टू वंडरफूल फॉर वर्ड्स.'

आय बिलीव्ह... इथे कुणी ठामपणे किंवा नक्की बोलत नाही. तसे बोलणे शिष्टाचाराला धरून नसावे.

प्रॉबेबली आय विल डू दॅट... सगळ्या शक्यता. ठाम बोलायचे नाही. कमिट करायचे नाही.

इथे एक गोष्ट प्रत्येक अमेरिकन नागरिक होऊ इच्छिणाऱ्या नवशिक्याने लक्षात ठेवायला हवी, ती म्हणजे संभाषण चारचौघांत किंवा एकादोघांत असो, हळू आवाजात बोलून दुसऱ्या व्यक्तीच्या कानावर ताण पडू न देणे हे इथे सामाजिक अन्यायाचे लक्षण आहे. त्यामुळे बोलायचे कायम उच्च रवाने. हा जरा शिष्टसंमत शब्द आहे म्हणून वापरला. पण खरे पाहाल तर बोलणे सारे बेंबीच्या देठापासून असते. ओरडणे, किंचाळणे, आरोळ्या मारल्यागत बोलणे इथे सामाजिकतेचीच एक बाब आहे. त्याचबरोबर दुसरी बाब तितकीच महत्त्वाची. फार लक्ष देऊन ऐकण्याची. दुसऱ्या व्यक्तीच्या कानावर ताण पडू न देण्याचा प्रामाणिक प्रयत्न प्रत्येक अमेरिकन करीत असतो. तसेच दुसऱ्या व्यक्तीच्या स्वरयंत्रावर ताण पडू नये याची काळजी घेणे हेही एक सामाजिक बंधन असावे. त्यामुळे प्रत्येक अमेरिकन दुसऱ्याच्या घशाची जास्त काळजी करतो. त्याच्याशी कुणीही बोलायला लागले, की समोरच्याला सारखे मधे मधे थांबवून तो स्वतःच त्याचे वाक्य अट्टहासाने पुरे करतो.

मी ऐकलेले एक संभाषण इथे नमूद करते.

- बायको कुठे आहे?

- माझी पत्नी काऊंटी हॉस्पिटलमध्ये आहे आणि

- आणि ती प्रेग्नंट आहे. ओ दॅट्स वंडरफुल.

- नो. नो. माझी पत्नी काल सकाळी ऑफिसला निघाली-

- आणि तिला अपघात झाला. अरेरे फार वाईट झाले.

- माझ्या पत्नीला काऊंटी हॉस्पिटलमध्ये इंटीरिअर डेकोरेटर म्हणून काल जॉब ऑफर मिळाली.

❖❖❖

# जय स्वतंत्रते

स्वतःच्या हक्कांबद्दल जसा प्रत्येक अमेरिकन फार जागरूक असतो तसाच स्वतःच्या स्वातंत्र्याबद्दलही तो अतिशय संवेदनाशील आहे. स्वातंत्र्यदेवतेचा तो भव्य देखणा पुतळा पिढ्यान्‌पिढ्या प्रत्येक अमेरिकनाच्या मनात ही स्वातंत्र्य-भावना तेवत ठेवत आला असावा.



जय स्वतंत्रते

स्वातंत्र्य म्हणजे काय असे कुणा अमेरिकनाला विचारा. तो फारसा विचार करणार नाही. फार तात्त्विक, वैचारिक व्याख्या करण्याच्याही फंदात पडणार नाही. कारण एकूणच या मंडळींना क्लिष्टपणा, गुंतागुंत आवडत नसावी. त्यामुळे प्रत्येक गोष्ट सोपी करण्याकडे त्यांचा कल असतो. आपले आयुष्यही सोपे करून जगणे त्यांना आवडते. त्यामुळे त्यांची 'मनात येईल तसे वागणे' म्हणजे स्वातंत्र्य अशी स्वातंत्र्याची व्याख्या आहे.

हे स्वातंत्र्य सुरू होते पेहेरावापासूनच. प्रत्येकजण मनाला येईल ते कपडे घालतो. बंधन नाही. कुणी काही म्हणेल का? कुणाला काय वाटेल? असा विचारही नाही. कुणी गुलाबी किंवा पोपटी फ्लोरोसंट रंगाची फक्त अर्धी चड्डी घालतो, कुणी उघडाबंब अनवाणी वावरतो. चड्डीच्याच रंगाचा डोळ्यांवर गॉगल

(अमेरिकन भाषेत ग्लासेस) आणि त्याच रंगाची डोक्यावर टोपी. तर कुणी अंगावर फक्त खूप रंगीबेरंगी चित्रे असलेली सलवारीसारखी घोळदार विजार घालून वावरताना दिसतो. कपडे हे शरीराचे संरक्षण करण्यासाठी आहेत यावर त्यांचा विश्वास दिसत नाही. तसेच सुयोग्य पोशाखामुळे एकूण व्यक्तिमत्त्वात चांगला बदल दिसू शकतो याबद्दलही त्यांना शंका असावी. बरे, पुरुषच असा पोशाख करतात असे नाही. स्त्रियाही या पोशाखी स्वातंत्र्याबद्दल तेवढ्याच जागृत दिसल्या. कॅलिफोर्नियात तर हे दृश्य सर्रास दिसते. परिणामतः अनेक फूड शॉप्सवर आणि रेस्टॉरंट्सवर पाट्या होत्या - 'नो शर्ट्स, नो शूज, नो फूड'. शर्ट व बूट न घालाल, योग्य पोशाख नसेल तर अन्न मिळणार नाही.' अशी धमकीच होती. अर्थात त्याला कुणी जुमानत नव्हते आणि रेस्टॉरंट्समध्ये उघडेबंब चड्डीवाले अनवाणी पायांनी बसून जेवणावर यथेच्छ ताव मारताना दिसले.

या स्वातंत्र्याच्या नावाखालीच भर हमरस्त्यावर बाजूच्या हिरवळीत एक तरुण छोटीशी शॉर्ट घालून झक्कपैकी ऊन खात लोळत होता. कोण काय म्हणेल ते म्हणो.

या देशात प्रत्येकजण स्वतःचे स्वातंत्र्य आणि सुख पाहतो, हे पदोपदी प्रकर्षाने जाणवायचे. फिरायला जायच्या रस्त्यावरच एक मोठी शाळा होती. प्रथम जेव्हा पाहिले तेव्हा विचित्र वाटले. शाळेतली मुले, मुली च्युईंगगम खात दप्तरे पाठीला अडकवून गप्पा मारत खिदळत चालली होती. पण त्यांच्या अंगावर वेगवेगळे पोशाख होते. पोरींच्या अंगात तंग झगे, आखूड, मांड्या दाखवणाऱ्या शॉर्ट्स व टी शर्ट, खोल गळ्याचे उत्तान भडक ब्लाऊज व स्कर्ट होते. पोरांच्या अंगात फक्त रंगीत बनियन व हाफ पँट तीही फ्लोरोसंट रंगाची. कुणाच्या अंगात फुलाफुलांचा भडक शर्ट व तसलीच विजार. वाटले, शाळेत गॅदरिंग किंवा सोशल असावे. दुसऱ्या दिवशी, तिसऱ्या दिवशीही नव्हे आठवडा होऊन गेला तरी पोशाखात बदल नाही. शेवटी न राहवून कुतूहलाने चौकशी केली की यांना युनिफॉर्म नाही का घालावे लागत? युनिफॉर्म घातला नाही तर यांना शाळेत शिक्षा नाही का करीत? तेव्हा जे उत्तर मिळाले ते ऐकून मी थक्कच झाले. इथे शाळेत विद्यार्थी युनिफॉर्म घालतच नाहीत. कारण कुठलेही कपडे घालण्याच्या त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधन आलेले त्यांना आवडत नाही. त्यामुळे शाळांना युनिफॉर्मच नाहीत. म्हणजे शाळेत येताना मुलांनी आपला सामाजिक दर्जा, आर्थिक दर्जा व इतर भेदभाव विसरावेत, एका समान पातळीवरून सर्व विद्यार्थ्यांनी ज्ञान ग्रहण करावे, तिथे श्रीमंत-गरीब, उच्च-नीच,

काळा-गोरा, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव नसावेत या उदात्त हेतूने प्रत्येक शाळेत शिक्षणातील समानतेची पहिली पायरी म्हणून गणवेश घालण्याचा आग्रह धरला जातो तो हेतूच इथे व्यक्तिस्वातंत्र्यापुढे गौण मानला गेला होता.

मुलांनाही हे स्वातंत्र्याचे वारे लहानपणापासूनच लागते. शाळेत जसे गणवेशाबाबत त्यांना स्वातंत्र्य हवे तसेच दैनंदिन जीवनात वागण्यातही हवे. एका पिक्चर हाऊसमध्ये पिक्चर पाहताना काही टारगट पोरे वाह्यातपणा करीत होती. अतिशय दंगा करीत होती. त्यांच्या शेजारीच पिक्चर पाहण्यासाठी आलेले एक जज्ज बसले होते. पोरांचा आचरटपणा सहन न होऊन त्यांनी पोरांना गप्प रहायला सांगितले. झाले, पोरांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेत थोरांनी उपदेश करणे बसले नाही. बाचाबाची सुरू झाली. पोरांचा उद्धटपणा आणि आगाऊपणा जज्ज महाशयांना सहन करणे अशक्य झाले. त्यांनी संतापाने एका मुलाच्या थोबाडीत मारली. तर पोरांनी चक्क त्या जज्जावर केस केली. त्यांचे म्हणणे असे, की सार्वजनिक ठिकाणी दंगा करणे चूक आहे हे आम्ही मान्य करतो. पण कुठल्याही चुकीसाठी शिक्षा करणे हे कायद्याचे काम आहे. या गृहस्थांनी कायदा कसा हातात घेतला? आणि ही केस त्या मुलांनी जिंकली. असे हे स्वातंत्र्य!

या स्वातंत्र्याचा इथे अतिरेकच झालेला दिसतो. एक चोर चोरी करायला एका बंगल्यात शिरला. वरच्या मजल्यावर पाईपवरून चढत असताना बुळबुळीत झालेल्या पाईपवरून तो खाली घसरून पडला आणि त्याचा पाय मोडला. तर या चोराने 'हाऊस सॅनिटेशन' पाळले नाही अशी केस त्या घरमालकावर केली!

स्वातंत्र्याच्या या टोकाच्या अट्टहासापायीच इथे अल्पवयीन कुमारी मातांसाठी वेगळ्या शाळा काढाव्या लागतात, नव्हे लागल्या आहेत. ११-१२ वर्षांच्या निरागस चेहऱ्याच्या गोड कोवळ्या पोरी गरगरीत पोटं घेऊन शाळेत येतात. अशा एका पोरीच्या आईशी बोलण्याची संधी मिळाली.

मी : ही पोर इतकी लहान आहे, की ती स्वतःची देखभालही योग्य प्रकारे करू शकत नाही. अशा परिस्थितीत दुसऱ्या एका लहान जिवाला जन्म देऊन ती त्याची काळजी कशी घेऊ शकेल, याचा विचार आई म्हणून तुम्ही केलाय का?

मुलीची आई : तिला मूल हवे आहे. तो तिचा निर्णय आहे.

मी : अहो, निर्णय घेण्याचे तिचे वय आहे का? तुम्ही तिला सल्ला द्या. समजावून सांगा.

मुलीची आई : छे, छे. तिचे निर्णय घ्यायचे स्वातंत्र्य तिला आहे. त्याच्या

आड मी येणार नाही.

स्वातंत्र्य या शब्दाची, त्याच्या अर्थाची खूप मोठी गल्लत हे लोक करताहेत असे मला त्या क्षणी फार तीव्रतेने वाटले. फार उदास उदास वाटले. ती शाळा पाहून आणि त्या मुलीच्या आईचे वक्तव्य ऐकून मला त्या दिवशी, 'बाई ग, पोरीच्या जन्माला आली आहेस, जपून वाग. दिवेलागणीच्या आत घरी ये. तू नाकळती आहेस म्हणून सांगितले,' म्हणणारी आणि पोरीकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवणारी भारतीय आई आठवत राहिली.

मनात येईल ते करा. मनात येईल तसे जगा. कुठलेही बंधन मानू नका. फक्त स्वतःसाठी जगा ही यांची जीवनधारणा आहे. या विषयावर एका मासिकाचा निघालेला विशेषांक पाहण्यात आला. नाव आता आठवत नाही. त्या मासिकात अनेक मंडळींच्या कहाण्या होत्या. फ्रेड वयाच्या एकतिसाव्या वर्षी कंटाळला. त्याला वाटले पोर्तुगालला जावे. बायको व दोन लहान मुलांचा कुठलाही विचार न करता तो शिक्षकाची नोकरी घेऊन पोर्तुगालला कायमचा निघून गेला. फ्रेडने आपल्या मनाचे ऐकले, तो सुखी झाला असे एक आर्टिकल होते. दुसऱ्या एका मुलाखतीत चाळीस वर्षांच्या एडीने सांगितले, की मला समुद्र सफरीवर जाण्याची प्रबळ इच्छा झाली. मी बायकोला सांगितले, की तू आणि पोरे स्वतःचे पहा. पोरे मोठी आहेत. स्वतःचे पाहतील. घरदार सारे विकून त्या पैशातून मी एक सुरेख कॅरेबियन विकत घेतला आणि समुद्र सफरीवर निघून गेलो. मला त्यांची कधीच उणीव भासली नाही. माझे स्वप्न मी पुरे करतो आहे यात मला आनंद आहे.

अशा स्वरूपाच्या इतरही काही कथा, लेख, मुलाखती त्या मासिकात होत्या. ते सारे आनंदी आणि सुखी झालेले अमेरिकन आहेत आणि प्रत्येकाने हेच करायला हवे असे संपादकाचे म्हणणे.

एकूण काय स्वातंत्र्याचा अर्थ स्वान्तःसुखाय प्रत्येकाने जगावे. फक्त स्वतःचा विचार करावा. नवऱ्याने बायकोचा, बायकोने नवऱ्याचा विचार करू नये. आईबापांनी पोरांच्या भवितव्याची चिंता करू नये. पोरांनी आईबापांच्या सुखाची काळजी करू नये. ज्याने त्याने आपापले पाहावे.

पिसाचा मनोरा जसा झुकला आहे तसाच हल्ली अमेरिकेतला स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा झुकला आहे म्हणतात. तो शरमेने तर झुकला नसेल?

❖❖❖

# देखणे फिरणे

शहरभर पीच, प्लम, ॲपल, संत्री, लिंबू, पेअरची लगडलेली झाडे. खालीही फळांचा सडा. जिकडे नजर जाईल तिथे फुलारलेली नाना रंगांची, विविध आकाराची फुले. सुरेख कौलारू बैठी घरे. रेखीव शहर. रचनाबद्ध मांडणी. दूरवर जाणारे सरळसोट रस्ते. मोटारींसाठी हायवे. सारे स्वच्छ, रम्य आणि सुंदर. शहरात अनेक ठिकाणी संत्र्याच्या भल्या थोरल्या बागा. ठिबक सिंचन पद्धतीने पाणी देण्याची व्यवस्था असलेल्या ह्या बागांमध्ये प्रत्येक झाडाला अक्षरशः शेकड्यांनी फळे लागलेली दिसत. रस्त्याच्या दुतर्फा त्यांच्या किंमतीचे फलक होते. रस्त्यावर गाड्या थांबवून मळ्यातली अगदी ताबडतोब तोडलेली फळे लोक विकत घेतात.

या शहराचे नाव रेडलॅण्डस्. सदर्न कॅलिफोर्नियात लॉस एन्जलीस या मोठ्या शहरापासून सुमारे २०० मैल दूर असलेले हे शहर. १९८८ मध्ये हे शहर संत्र्याच्या बागांनी लहडलेले होते. जिकडे पहावे तिकडे नारिंगी रंगांची शेकडो फळे लेवून उभी असलेली डेरेदार झाडे दिसायची. त्यावेळी फळे तोडायचे काम हाताने होत असे. आजच्या सारख्या यंत्रांनी नाही. हळूहळू कामगार, मजूर मिळेनासे झाले. बागा सुकू लागल्या. मळ्याच्या मालकांनी व्यवसाय बंद केला. आजही शहरात तुरळक तुरळक संत्र्यांच्या बागा दिसतात. पण ती सुकलेली, खुजी, मलूल झाडे, बागेत जमिनीवर सारीकडे सुकल्या फळांचा सडा अशा केविलवाण्या स्वरूपात दिसतात.

सकाळी उठून मी फिरायला बाहेर पडायची. छान थंडी असायची. रस्ते अगदी स्वच्छ. सकाळी साडेसहा वाजण्याचा सुमार. दुतर्फा बैठे बंगले. कौलारू. बाहेरून करड्या-पिवळ्या किंवा तपकिरी रंगाचे. त्यांच्या सभोवती हिरव्याकंच रंगाची हिरवळ. दुतर्फा कमरेएवढ्या उंचीचे गुलाब. त्यांना प्रत्येकी ५० / ६० फुले लागलेली असायची. मेपल ट्री किंवा सूचिपर्णाचे वृक्ष शोभेसाठी बहुतेक आवारांत

दिसायचे. पिअर्स, ॲप्रिकॉट, पीच, प्लम इत्यादी फळांनी लहडलेली झाडेही त्या बंगल्याच्या आवारात दिसत. आश्चर्य म्हणजे या झाडांचे इवले पानही त्या हिरवळीवर पडलेले दिसत नसे. प्रत्येक बंगल्याभोवती बाग. शिवाय जागोजाग उत्तम बागा. त्यात अनेकरंगी फुलझाडांच्या भरगच्च ओळी. रस्त्याकडेची पिवळी, तांबडी झाडे. घरावर सोडलेल्या तांबूस हिरव्या वेली. चौफेर रंगांची उधळण वाटायची. सफरचंदाची लाल फळांनी लहडलेली झाडे. कुठे निळीजांभळी द्राक्षे. फिरण्याच्या वेळीच ॲटोमॅटिकली सुरू होऊन बंद होणारे स्प्रिंकलर सुरू होत. शांतपणे चालत असावे तर जवळूनच भस्सकन एखादा स्प्रिंकलर सुरू होऊन आपल्यावर पाण्याचा शॉवर उडे. काही घरांतून कुत्री भयंकर आरडाओरडा करायची. मला पाहून त्यांना काही तरी विचित्र वाटत असावे. रस्त्याने चालणारा माणूस पहायची या कुत्र्यांना अजिबात सवय नसावी. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांवर हरवलेल्या मांजरांचे वर्णन करणाऱ्या मालकाच्या पत्त्यासह ठोकलेल्या पाट्या दिसायच्या. पाट्या पुठ्ठ्याच्या असायच्या. मला वाटे, एखादे मांजर ह्या वर्णनाप्रमाणे आढळले तर गाडीतून उतरून मांजराला पकडून, पाटीवरचा पत्ता टिपून घेऊन, तो शोधून काढून मांजराला त्याच्या मालकाकडे पोहोचवण्याचा उपद्व्याप किती अमेरिकन करीत असतील? दुसरा विचार मनात येई की, वृद्ध आईबापांना वृद्धाश्रमात टाकणारे, वयात आलेल्या पोरापोरींना, तुमचे शालेय शिक्षण आम्ही केले. पुढचे आयुष्य तुमचे तुम्ही पहा; आमचे कर्तव्य संपले, असे निर्विकारपणे सांगणारी ही मंडळी मांजरांच्या बाबतीत एवढी हळवी कशी? अमेरिकन माणसाने हळवेपणा हा गुण प्राणिमात्रांवर भूतदया करण्यासाठीच खास राखून ठेवलेला आहे. मनुष्यमात्रावर त्याचा उपयोग करताना कुणी हाडाचा अमेरिकन सहसा दिसणार नाही.

आपल्याकडे रस्त्यांची नावे इतिहासपुरुष, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक यांपैकी मंडळींचीच दिलेली दिसतात. पुन्हा ती काही वर्षांनी बदलत बसतात. माणसे ज्या वेगाने कमी मृत्यू पावतील त्याच्या प्रमाणात रस्त्यांचे नामकरणविधी होत रहातात. त्यामुळे जनतेची स्मरणशक्ती अत्यंत तीक्ष्ण राहाते. रस्त्याचे जुने नाव, त्यानंतरचे नाव व पुन्हा नव्याने बदललेले नाव हे सारे ते सवयीने लक्षात ठेवतात. परंतु लोककल्याणाचा हा सोपा मार्ग अमेरिकनांना मात्र पसंत नाही. त्यामुळे रस्त्यांची नावे लिंकन, फोर्ड, जग्वार अशी एक तर मोटार गाड्यांची असतात किंवा फुलांची, झाडाची, फळांची असतात. काही ठिकाणी तर ॲव्हेन्यू व स्ट्रीटस्‌ना फक्त क्रमांकच असतात. त्यामुळे राज्यकर्ते बदलले, राजकारणी

बदलले, साहित्यिक मेले, सामाजिक कार्यकर्त्यांची प्राणज्योत मालवली तरी ॲव्हेन्यू क्रमांक ३२ हा बत्तीसच राहतो.

सकाळी फिरण्यात माझे अनेक बाबींचे प्रबोधन व्हायचे. एके ठिकाणी नेबरहूड वॉचची पाटी दिसली. हा काय प्रकार आहे म्हणून कुतूहल वाटले. खाली लिहिले होते —

'आम्ही कुणाही शेजाऱ्याकडे संशयास्पद हालचाल अथवा ट्रेसपासिंग दिसले तर लगेच पोलिसात वर्दी देऊ.'

मला वाटले ही सूचना चोरांसाठी होती. 'बाबांनो, आम्ही जागृत आहोत आमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे चोरी करण्याचा प्रयत्न करू नका, म्हणजे याचा सरळ अर्थ असा की, अशी पाटी लावून आपला शेजारधर्म जाहीर करणे इथे आवश्यक असते. त्याअर्थी एक तर तो पाळला जात नसावा अथवा गृहीत धरला जात नसावा. आमच्याकडे पहा. दुसऱ्याकडे काही गडबड दिसली, चोरीचा संशय आला तर आम्ही सारे सोडून आधी त्याचा बंदोबस्त करणे आमचे नैतिक कर्तव्यच समजतो. त्यात डांगोरा पिटण्यासारखे काही विशेष आपण करतो आहोत असे कुणाला वाटत नाही.

फिरताना रस्ता ओलांडणे ही जीव मुठीत धरून करायची गोष्ट आहे – असते हे मुंबईत ठाऊक. इथे प्रकार वेगळाच. क्रॉस करण्याआधी रस्ता ओलांडायच्या साईन्सच्या ठिकाणी ३/४ फूट उंचीच्या खांबावर एक बटण असते ते दाबायचे. त्याबरोबर समोरच्या सिग्नलवरती 'GO' अशी अक्षरे व नंतर निरक्षरांसाठी चालणाऱ्या माणसाचे चित्र दिसते. एरव्ही बटण दाबले की, आधी 'चालू नका' 'Don't Walk' अशी अक्षरे येतात. मग काही सेकंदांत 'GO' अशी सूचना येते. आजूबाजूला पाहावे तर दोन्ही बाजूला गाड्यांची रांगच रांग थांबलेली दिसते. आपण बिनधास्तपणे ऐटीत रस्ता ओलांडायचा की नंतर लगेच पुन्हा मोटारी घोंगावत सुसाट सुटतात. मला अगदी थोरच वाटे. आपल्यासाठी ह्या मोठ्या मंडळींना गाड्या थांबवून आपल्या जाण्याची वाट पहात उभे राहावे लागते म्हणजे किती छान असे वाटे.

इथे कुठलाही रस्ता पहा. गाड्यांची बेसुमार गर्दी. पण फक्त गाड्याच. हातगाड्या, सायकली, रिक्षा अशी विषम वेगाची वाहने नाहीत. या गाड्या पाहून वाटले माझ्या देशात बेसुमार लोकसंख्येचा प्रश्न आहे तसा इथे मोटारींच्या संख्येचा आहे.

फिरताना हातात वृत्तपत्रे घेऊन घराकडे परत निघालेले फक्त वृद्ध दिसायचे. कोपऱ्यावर बऱ्याच ठिकाणी आपल्याकडच्या पेट्रोल पंपाच्या आकाराची फूड शॉप्स असायची. मी तिथे शिरायचे. चहा, कॉफी आणि कोक ही पेये तिथे मिळतात. आठ औंस, सोळा औंस, बत्तीस औंसचे कागदी पेले जवळ ठेवलेले असतात. दुधाचे छोटुकले डबे असतात. क्रोमर म्हणायचे त्यांना. जेमतेम दोन चमचे दूध असते त्यात. साखरेच्या पुड्या. साखर ढवळण्याचे स्टरर. जितक्या औंसाचा ग्लास आपण बटन दाबून भरून घेऊ तेवढे पैसे द्यायचे. तुमच्यावर कुणी लक्ष ठेवत नाही. विश्वासाचा मामला. वृत्तपत्रांची पत्र्याची पेटी असते. प्रत्येक नावाच्या वृत्तपत्राची पेटी वेगळी. लॉस एन्जलीस टाईम्स, रेडलॅण्ड न्यूज... इत्यादी. किंमतीचे नाणे टाकायचे व एक वृत्तपत्र घ्यायचे. चहा, कॉफी, पिऊन वृत्तपत्र घेऊन परत जाणारे अशी मंडळी संख्येने फारच अल्प दिसत.

काही वेळा फिरत मी डाऊनटाऊनला जायचे. डाऊनटाऊन म्हणजे शहराचा मध्यवर्ती भाग. सरकारी, व्यापारी कचेऱ्या, खूप डिपार्टमेंटल स्टोअर्स व वेगवेगळी शॉप्स असलेले मॉल या डाऊनटाऊनमध्ये असतात. निवासस्थाने मात्र या डाऊनटाऊनपासून दूर उपनगरात असतात. इथे जायचे म्हणजे आपल्याला सहज ४/५ मैलांची पायपीट. कारण इथे पब्लिक ट्रान्सपोर्ट नाही. प्रत्येकाने स्वतःच्या गाडीने फिरावे. त्यामुळे एकेका कुटुंबात ३/४ गाड्या दिसायच्या.

फिरताना मला नेहमी दृष्टीस पडणारी आणि तोंड भरून हसून गुडमॉर्निंग म्हणणारी ठराविक मंडळी होती. इथे प्रत्येकजण आपल्या घरातला कचरा मोठ्या कॅनमध्ये आठवडाभर साठवतो. कचरा म्हणजे गार्बेज. आठवड्यात एक गार्बेज डे असतो. त्या दिवशी हे कॅन्स रस्त्यावर आणून ठेवतात. ते कॅन्स उचलायला एक गाडी येते. तिच्यातून प्रचंड यांत्रिक हात बाहेर पडून हे पाच फुटी कॅन्स गाडीत रिते करतो व कॅन जागी पुन्हा ठेवतो. ही गाडी चालवणारा प्रेमळ चेहऱ्याचा भरघोस मिशांचा व प्रचंड जबड्याचा ड्रायव्हर मला न चुकता अभिवादन करे.

फिरण्यात माझा दुसरा मित्र बनला पोस्टमन. प्रत्येक घरासमोर मधमाशी पालनासाठी करतात तसे किंवा चिमण्यांचे पिंजरे असतात त्या आकाराच्या सुंदर नक्षीने सजवलेल्या टपालपेट्या होत्या. पोस्टमन गाडी त्या तीन फूट उंचावर असणाऱ्या पेटीशी थांबवून ठेवलेले टपाल काढून घेई व आणलेले टपाल ठेवून देई. मालकाने आपल्या पेटीत टपाल ठेवले असेल तर ते पोस्टमनला कळावे म्हणून पेटीचा फ्लॅग उभा करून ठेवायचा. पोस्टमन टपाल काढून फ्लॅग आडवा करून जाई.

फ्लॅग आडवा दिसला की समजावे तो येऊन गेला. तर हा असा उत्तम फोर्ड गाडीतून टपाल घेत व देत फिरणारा पोस्टमन मला रोज दिसे आणि अगदी ओळखीचे हसून पुढे जाई.

तिसरा सकाळचा मित्र वर्तमानपत्रांचे आपल्या 'मित्सुबिशी' गाडीतून वितरण करणारा पेपरवाला. प्लॅस्टिकच्या पिशवीत बांधलेले सुमारे शंभर पानांचे वृत्तपत्र तो प्रत्येकाच्या हिरवळीवर मॅचमध्ये चेंडू फेकावा त्या कौशल्याने फेकायचा. माझ्याकडे पाहून रोज आनंदाने भला थोरला पंजा गाडीबाहेर काढून टाटा करायचा.

कधी फिरताना फळांनी वाकलेले लिंबाचे झाड दिसे. कधी ओळखीची फुले भेटत. जास्वंद, बोगनविला, कण्हेर दिसली की मला आपल्या देशातली मंडळी भेटली म्हणून फारच आनंद वाटायचा.

एकदा खूप लांब गेले. एक ओढा लागला. सारे निसर्गचित्र अगदी ओळखीचे वाटले. म्हटले जरा बसू या या ओढ्याकाठी. जरा वेळ बसले. ऊन तापायला लागले तशी उठून परत निघाले तर समोर चक्क कडू इंद्रावणीची वेल दिसली. तिला दहापाच फळेही लागली होती. फळे निरखून पाहिल्यावर आणि त्यांचा वास घेतल्यावर तर खात्रीच पटली की, ही कडू इंद्रावणच आहे. आपल्याकडे ही वेल सर्वत्र दिसते. पण राजस्थानात तर खूप मोठ्या प्रमाणात आढळते. कडू इंद्रावण मला चक्क कॅलिफोर्नियातल्या रेड लॅण्डस् शहरी दिसावी याचे मला तो सारा दिवस राहून राहून अप्रूप वाटत होते.

एके दिवशी प्रचंड वादळी वारा सुटला. बराचवेळ निसर्गाचे तांडव चालू होते. नंतर सारे शमले. दुसऱ्या दिवशी फिरायला बाहेर पडले तर सारेच दृश्य बदललेले. सुसंस्कृत, घरंदाज आणि सालंकृत तरुण स्त्री अचानक लक्तरे नेसून मळक्या पिंजारल्या केसांनी समोर उभी राहावी तसे वाटले. सारी कळाच पालटून गेली होती. रस्त्यांची रया गेली होती. निलगिरीच्या साली, पाने, नारळाच्या झावळ्या, काही वृक्षांच्या फांद्या, झाडझाडोरा साऱ्या रस्त्यावर पसरला होता. झाडे छिन्न झाली होती. बागा पार चुरगाळून गेल्या होत्या. फार फार उदास करणारे सारे वातावरण होते. मी बराच वेळ चालत राहिले.

परतीच्या वाटेवर फिरले. तेव्हा पहाते तो मोठमोठ्या तांबड्या पिवळ्या गाड्या रस्त्यावर होत्या. त्यांना क्रेन्स होत्या. ओव्हरऑल घातलेली माणसे क्रेन चालवत होती. मोठ्या फांद्या लीलया उचलल्या जात होत्या. रस्त्यावर स्त्रिया, पुरुष मोठमोठाले ब्लोअर घेऊन रस्ता साफ करीत होते. अत्यंत वेगाने सारी कामे चालू

होती. गाड्यांना मोठमोठे ब्रश लावून रस्ते साफ होत होते. सारे शिस्तबद्ध. घर जवळ येऊ लागले तसे लक्षात आले, अरेच्चा, इथले तर सारे दृश्य पार बदलून गेले आहे. जातानाची धूळधाण पार लुप्त झाली होती. चित्रकाराने नुकतेच जलरंगात प्रसन्नचित्र रंगवावे तसे सारे ओल्या पेंटिंग्जसारखे दिसत होते.

मला वाटले निसर्गाने केलेल्या मोडतोडीवर इतक्या कमी कालावधीत मात करण्याची किमया माझ्या देशात कधी बरे घडेल?

❖❖❖

# हिरवळ आणिक गाडी तेथे

प्रेम करणे हा अमेरिकनांचा स्थायी भाव. प्रत्येकजण स्वत:वर सर्वांत जास्त प्रेम करतो आणि त्या खालोखाल आपल्या लॉनवर आणि गाडीवर प्रेम करतो. लॉन आणि गाडी हे प्रत्येकाचे अगदी 'वीक पॉईंट.' त्यासाठी ते कुठल्याही टोकाला जाऊ शकतात असे दिसून आले.


'हिरवळ आणिक पाणी तेथे सुचती मजला गाणी' अशी कवीची भाववृत्ती कशी, कधी फुलून येते याची बा. भ. बोरकर यांनी खूण दिली आहे. अमेरिकनांची वृत्ती एका बाबतीत कवीशी जुळती आहे. इथे जिकडे तिकडे हिरवळ दिसते. अमेरिकेतल्या वाळवंटी भागातच मी राहिले होते. पण त्या वाळवंटातही जिकडे तिकडे हिरवळ. प्रत्येकाच्या घरापुढे, पाठीमागे हिरवळ. फूटपाथच्या कडेला हिरवळ, चौकात हिरवळ, बागेत हिरवळ. ती सारी हिरवाई पाहून थक्क व्हायला झाले. यांनी म्हणे या वाळवंटात दूरवरून मोठाल्या पाईपने पाणी आणून ही हिरवळ केली आहे. म्हणून लॉस एन्जलीसच्या ग्लेन्डेल या उपनगरात तर चक्क ३०० एकर जमिनीवर लॉन वाढवली आहे. अनेक टेकड्यांवर ही हिरवळ पसरवली आहे. सभोवती ८ फूट उंचीचे कुंपण घातले आहे. ३०० एकर हिरवळीच्या या प्रदेशात काय काय आहे? तर २८ इमारती, २०,००० झाडेझुडपे, ८० मैल लांबीची जमिनीखालची पाण्याची पाईप लाईन. इथे ७५० कर्मचारी आहेत. आणि इथे १,००,००० व्यक्तींना पुरण्यात आले आहे. याचे नाव आहे 'मेमोरियल पार्क ऑफ फॉरेस्ट लॉन.' मृत्यूनंतरही या मंडळींचे लॉनवेड जात नाही. ते लॉन पांघरूनच जमिनीखाली अंतिम निद्रा घेतात.

इथे कुणी कुणाच्या लॉनवरून चालत नाही. कारण ज्याला त्याला आपली लॉन प्राणप्रिय आहे, असते. जातिवंत अमेरिकन माणूस आपल्या लॉनची खूप

काळजी घेतो. लॉनसाठी वेगवेगळी टॉनिक्स मिळतात. त्यांतले एक 'मिरॅकल ग्रो.' त्यामुळे लॉन देखणी, तरतरीत होते. लॉनवर एखादा वाळलेला छोटा भाग निर्माण झाला की यांच्या काळजात फार कालवाकालव होते. तो तेवढा वाळवंट-तुकडा पुन्हा हिरवा करण्यासाठी ते जीवाचे रान करतात. आपली लॉन दुर्लक्षित दिसू नये म्हणून ही मंडळी फार जपतात. लॉनमध्ये डेझीची पिवळी छोटी फुले उमलू न देण्यासाठी डोळ्यांत तेल घालून असतात. लॉनच्या गवताचे इथे असंख्य प्रकार पहायला मिळाले. आपल्या हिरवळीवर डेझीचे फूल उगवणे हे त्यांना धर्मभ्रष्ट होण्याइतके दुःखद वाटते. लॉनचे हे वेड 'वेड' या संज्ञेपलीकडे गेले आहे असे मला वाटले. कारण एके दिवशी टी. व्ही. वर बातमी पाहिली. एका माणसाने एका लहान पोरीला पिस्तुलाने गोळी घातली होती. त्याला कारण विचारण्यात आले की,

'बाबारे, तू असे का केलेस?'

त्याने उत्तर दिले, 'ती माझ्या लॉनवरून चालत गेली म्हणून.'



**अमेरिकनांचे कार प्रेम**

लॉनचे हे वेड जसे टोकाचे आहे तसेच गाडीचेही. प्रत्येकजण आपली गाडी जास्तीत जास्त देखणी कशी दिसेल याच्या सतत काळजीत असतो. बायको सुंदर असण्यापेक्षा गाडी सुंदर असणे हा यांच्या प्रौढीचा विषय. आपली गाडी कायम लेटेस्ट मॉडेलची असावी असा यांचा कटाक्ष. त्यासाठी तो कायम आटापिटा करत असतो. अर्धे वर्ष संपले, की पुढच्या वर्षाच्या मॉडेल्सच्या गाड्या रस्त्यावर दिसू लागतात. मग चालू वर्षात घेतलेली तुमची गाडी 'आऊट डेटेड' होते.

बरं, गाड्या किती? नुसती कुटुंबात माणशी एक गाडी, एवढीच मोजदाद नसते. सुट्टीला कॅम्पिंगसाठी रानावनांत जायला एक कॅम्पर, साऱ्या कुटुंबाला मिळून कुठे जायचे तर त्यासाठी टेम्पो वगैरे वगैरे. 'दंतकथा' या कवितेत विंदा करंदीकर म्हणतात, अमेरिकेतला एक एकाक्ष कुबेर वर्षभर स्वतःच्या मोटारी आणि अंगावरचे केस मोजतो, पण जास्त कोण हे त्याला कळलेले नाही. मला खात्री आहे विंदांच्या कवितेतल्या ह्या एकाक्ष कुबेरासारखे अनेक कुबेर अमेरिकेत आहेत.

एकदा खूप धुक्यात आम्ही कुठलेसे प्रेक्षणीय स्थळ पाहण्यासाठी गेलो होतो. स्थळाजवळची वाट अरुंद होती. दोन गाड्या जात असताना अगदी किंचितसा धक्का लागला. नेमका कुणाचा कुणाला हे ठाऊक नाही. पण दोन्ही गाड्यांचे मालक उतरून तशा थंडी-धुक्यात वादावादी करीत होते. माणसे कुटुंबवत्सल होती. गाड्यांत बायका-पोरं होती. थंडी मी म्हणत होती. दोघेही हमरातुमरीवरच आले होते. पोरांना थंडी लागेल याचीही त्यांना चिंता नव्हती. बरे, गाडी घासून नुकसान किती झाले होते? एक बारीकसा ओरखडा एका गाडीवर पडला होता. तोही चट्दिशी न दिसणारा. शोधून काढावा लागत होता. प्रचंड धुके आणि थंडी. समोर नीट दिसत नव्हते. बाकी बायकापोरे गोठली होती. गाडीतले छोटे बाळ कुडकुडत होते. पण यांचा वाद संपेना. इन्शुअरन्स क्लेम करण्यासाठी एकजण दुसऱ्याकडे इन्शुअरन्स क्लेम नंबर मागू लागला. तो दुसऱ्याकडे नव्हता. शेवटी मान्य झाले. नंबर दिला. आपण म्हटले असते, एवढासा ओरखडा आहे ना, असू दे.

नव्या नव्या मॉडेल्सच्या गाड्या खरेदी करण्याची इथे शर्यतच असते. दोन गोवेकर जसे एकमेकाला भेटले की विचारतात, काय आज कुठले मासे खाल्ले? तसे दोन अमेरिकन एकमेकांना भेटले की नव्या मॉडेलच्या गप्पा मारतात. नेल्सन बर्गमन हा ज्यू अमेरिकन आमचा मित्र झाला. त्याच्या बापाचा 'बिवर्ली हिल'ला भलाथोरला बंगला आणि हा पोरगा मात्र पॅटन स्टेट हॉस्पिटलमध्ये चक्क चाकरमान्या होता. एवढ्या मोठ्या बापाचा मुलगा आणि नोकरी करतो म्हणजे मला कमालच वाटली.

त्याला अशी नोकरी करणे कमीपणाचे कसे वाटले नाही? शिवाय लोक काय म्हणतील? मी असे म्हटल्यावर तो फक्त अमेरिकन स्टाईलने गमतीने खदखदा हसला. वैयक्तिक स्वातंत्र्याचा हा परिणाम. 'सोशल स्टेटस' च्या बेगडी कल्पनेतली ही माणसे जखडलेली नाहीत. प्रत्येकाची 'मन की खुशी, दिल का राजा.' बडे बापका बेटा म्हणून मी नोकरी करणे माझ्या बापालाही कमीपणाचे वाटत नाही.' तो हसून म्हणाला. तर असा हा नेल्सन बर्गमन आम्हाला एकदा सिग्नलपाशी दिसला. तो त्याच्या गाडीत, आम्ही आमच्या! पुढे मागे चिक्कार गाड्या उभ्या होत्याच. तरीही खूप खाणाखुणा करून त्याने आम्हाला गाडीची काच खाली करायला सांगितली. वाटले, की याला काही तरी नक्की फार महत्त्वाचे बोलायचे आहे. अमेरिकन गाड्यांच्या काचा खाली करणे कष्टप्रद नाही. तिथे काहीच कष्टप्रद नसते म्हणा. दाराच्या हँडलवर असलेले बटन दाबले की गाडीच्या साऱ्या दारांच्या काचा आपोआप खाली जातात. आम्ही घाईने काचा खाली केल्या. तेही नेल्सन काय सांगतोय ते ऐकण्याचे कुतूहल आणि उत्सुकता होती. जीव कानामध्ये एकवटले. तर तो ओरडून त्याच्या काचेतून गाडीमधून विचारता झाला,

'टोयाटोचे एक्याण्णवचे मॉडेल पाहिलेस? अिट इज अमेझिंग.'

हे एक्याण्णव साल उजाडायला चांगले आठ महिने बाकी होते.

डेट्रॉइटला जगप्रसिद्ध फोर्ड मोटर कंपनी आहे. कुठलीही कंपनी असली तरी त्या कंपनीत तयार होणाऱ्या गाड्यांची लेटेस्ट मॉडेल्स, त्यांची संपूर्ण माहिती आणि कंपनीचा इतिहास दाखवणाऱ्या फिल्म्स, फोटो यांचे एक प्रदर्शनच असते. कंपनी आपल्या खर्चाने सर्व युनिटस् प्रवासकांना दाखवते. बरोबर गाईड देते. कितीही गर्दी असली तरी ताटकळावे लागत नाही. मला आपल्याकडे बंगलोरला एच. एम. टी. चा कारखाना पाहातानाची आठवण झाली. संपूर्ण इतिहास, माहिती व नवी मॉडेल्स ठेवलेली प्रदर्शनं तिथे का बरे भरवत नाहीत?

प्रत्येक शहरात वेगवेगळ्या कंपन्यांच्या नानविध प्रकारच्या गाड्यांची झुंड विक्रीसाठी उभी असते. आपल्याकडे गावात आठवड्याला गुरांचा बाजार भरतो तसा इथे मोटारींचा बाजार असतो. रंगबेरंगी, चकचकीत देहाच्या, विविध आकाराच्या देखण्या शेकडो मोटारी. प्रत्येकावर भल्या थोरल्या आकारात किंमत लिहिलेली असते. किंमत पाहून आश्चर्य वाटते. अगदी ८०० डॉलर्स पासून ते २ ते ३ हजार डॉलर्स. इथल्या मध्यमवर्गीयांचा पगार लक्षात घ्या. साधारणपणे अडीच ते ३ हजार डॉलर्स. म्हणजे चक्क एका महिन्याच्या पगारामध्येच त्याला बऱ्यापैकी

गाडी घेणे परवडते. अगदी २५ वर्षांपूर्वीची एक जुनी गाडी घ्यायची तर आपल्याकडे मध्यमवर्गीयाला किती वर्षांचा पगार साठवावा लागतो बरे?

सतत नवनव्या गाड्या खरेदी करण्याची या मंडळींना प्रचंड हौस. तर काहीजणांना दर सहा महिन्याला एक जुनी गाडी घ्यायची, ती ताबडायची. मग पुन्हा सहा महिन्यांनी वेगळ्या कंपनीची वेगळ्या मॉडेलची गाडी घेण्याची हौस. विकी हेच करते हे मला जेव्हा कळले तेव्हा मी कुतूहलाने विचारले,

– 'मग जुनी गाडी विकतेस?'

–' छे, खुशाल कचऱ्यात टाकून देते. जंक.'

एकूण इथल्या मोटारगाड्या बरीच वर्षं टिकाव्या या दृष्टीने बांधल्याच जात नसाव्यात. तात्कालिक उपयुक्तता हाच दृष्टिकोण.

ज्या मोटारगाडीचे रूप पाहून आपण चकित व्हावे ती इथे जुना कचरा समजली जाते. वेग, यंत्रबद्धता आणि नव्याचे आकर्षण ही त्यांच्या जीवनाची त्रिसूत्री आहे.

❖❖❖

# ज्ञानगंगेचा प्रवाह

'तू पाकिस्तानाहून आलीयस का? तुझा पोषाख फार गॉर्जस आहे!' एक मंजुळ प्रश्न.

'ओ थँक्यू. पण मी भारतामधून आले आहे.' माझे नम्र उत्तर -

'असं का? कधी आलीस अमेरिकेत?' पुढचा प्रश्न.

'दोन तीन दिवस झाले.'

'मग तरी तू इंग्रजी कसे काय बोलतेस!'

'माझ्या देशावर पूर्वी बराच काळ इंग्रजांचे राज्य होते.'

बाईचा चेहरा फार मोठे कोडे सोडवत असल्यासारखा विचारात पडला.

हे संभाषण ए. के. स्मायली पब्लिक लायब्ररीमध्ये काऊंटरवरच्या बाईशी घडले. रेड लॅन्डस् शहरातली ही लायब्ररी शहराच्या मध्यवर्ती भागात आहे. शाही इमारत. संगमरवरी खांब व फरशा. जागोजागी पुतळे. भोवताली सर्वत्र फडताळे. भव्य पायऱ्या चढून गेल्यावर चकचकीत पॉलिश व पितळी कलाकुसरीचा प्रचंड दरवाजा. तो ओलांडून आत रिसेप्शनिस्टला ओलांडून गेले की संदर्भ विभाग. त्यात साहित्य, भाषा, शास्त्र, इतिहास, भूगोल इ. नाना विषयांवरचे विश्वकोश खंड आणि शब्दकोश. पुन्हा प्रत्येक विषयावरची लेखकांची, पुस्तकांची, मासिकांची सूची. तो संदर्भ विभाग पाहून थक्क व्हायला झाले.

शेजारी लहान मुलांसाठी पुस्तकांचा विभाग होता. त्यात असंख्य पुस्तके, मासिके होतीच. पण त्याचबरोबर चित्रकला व कलाकामाचे वर्ग चालू होते. फिक्शनचा मोठा विभाग होता. त्याहूनही शेजारी प्रचंड विभाग नॉनफिक्शनचा होता.

साऱ्या अमेरिकेतून प्रसिद्ध होणारी महत्त्वाची वृत्तपत्रे वाचण्यासाठी

पाठीमागे व्हरांडा होता. त्यात रोजची वृत्तपत्रे व नियतकालिके सभोवताली छोटे छोटे कप्पे करून उभी केली होती. आरामशीर बसता येईल अशा खुर्च्या व टेबले होती. अनेक मंडळी वाचत होती. बाहेर बाग व लॉन होती. त्यात खुर्च्या टाकून वृत्तपत्रे वाचत बसण्यासाठी सुंदर सोय होती. वृद्ध, तरुण मंडळी वाचनात गढली होती. मधोमध अर्नेस्ट हेमिंग्वेचा ब्राँझचा पुतळा उभा होता.

लायब्ररीतील सर्वांत महत्त्वपूर्ण गोष्ट वाटली ती न्यूयॉर्क टाईम्स इंडेक्स. त्याचे अनेक भाग होते. त्यात स्तंभ, पान क्र., वृत्तपत्राची तारीख विषयवार दिली होती. न्यूयॉर्क टाईम्समध्ये वेगवेगळ्या विषयांवर आलेल्या लेखांचे तपशील व सारांशही होता. त्यामुळे तुम्हाला वृत्तपत्र धुंडाळावे लागत नव्हते. मला प्रकर्षाने वाटले की ही पद्धत आपल्याकडे सुरू करणे किती बरे उपयुक्त ठरेल. वृत्तपत्रांचा व त्यात आलेल्या मजकुराचा महत्त्वपूर्ण वापर या पद्धतीनेच अभ्यासकांना शक्य नाही का होत?

वृत्तपत्रांचा वापर दीर्घकाळ अभ्यासकांनी वेगवेगळ्या संदर्भासाठी करावा अशीच इथली वृत्तपत्रे आहेत. इथले सारेच भव्य, मोठ्या प्रमाणावर. त्याला वृत्तपत्रे अपवाद कशी असणार? रविवारचा लॉस एन्जलीस टाईम्स ५०४ पृष्ठांचा. म्हणजे



अमेरिकेतील जाडजूड वर्तमानपत्रे

माझ्या कल्पनेतली भलतीच पृष्ठसंख्या. त्यावर वितरण प्रतींचा आकडा छापलेला होता १२, २१, १८९. ज्ञानगंगेचा रतीब घरोघरी मोठ्या प्रमाणात घालणाऱ्या या ५०४ पानी वृत्तपत्राची किंमत होती एक डॉलर.

एवढा मजकूर तरी काय देतात? आणि त्यासाठी किती माणसे काम करतात अशी दोन कुतूहले मनात उभी राहिली. दुसरे कुतूहल लवकर पुरे झाले. पहिल्या पानावरच नावांची जंत्री होती. मॅनेजिंग एडिटर्स, असिस्टंट मॅनेजिंग एडिटर्स, डेप्युटी असिस्टंट मॅनेजिंग एडिटर्स, कॉन्ट्रीब्युटींग एडिटर्स, सिंफ्थेटीक एडिटर्स, एनकरेजिंग एडिटर्स, रिसर्च एडिटर्स... पुढे मला वाचताना दम लागला आणि माझा उत्साह संपला.

अमेरिकनांना साहित्यकृतीचा व साहित्यिकांचा संपूर्ण आस्वाद लेखकाचा फोटो पाहिल्याशिवाय घेता येत नाही अशीही माझी खात्री पटली. कारण पाच पन्नास स्तंभ व त्यावर साऱ्या स्तंभलेखकांचे फोटो कशासाठी ठाऊक नाही. पुन्हा रोज तेच फोटो पहायचे वाचणाऱ्यांनी. स्तंभलेखक स्तंभाचे विषय वाचकासाठी रोज नवेनवे देऊ शकतो. फोटोतील नावीन्य कसे टिकवणार? तोचतोचपणा कसा घालविणार? असो.

वृत्तपत्रात अनेक विभाग. व्यावसायिक मत नावाचा मोठा विभाग. त्यात अर्थ, वैयक्तिक गुंतवणुकी, त्यावरची भाष्ये, मुलाखती, शेअरमार्केट, त्याचे ॲनालिसिस. क्लासिफाईड जाहिरातींसाठी या रविवार वृत्तपत्रात ८६ पाने होती. पुस्तकांच्या परीक्षणांना बरीच पाने. २७ पाने इनलँड एम्पायर नावाचा विभाग. रिअल इस्टेट विभागासाठी २६ पाने. त्यात बिल्डरच्या मुलाखती. अमेरिकेतील घरांच्या अडचणी व प्रश्न, बागकाम, गृहसजावट इ. होते. स्थानिक बातम्या, हवामान, संपादकीय पाने, मतमतांतरे म्हणून १४ पाने होती. रोजचा पेपर एकूण १२२ पानांचा निघे व प्रतींची संख्या १५ लाख.

इथल्या आणि आपल्याकडच्या वृत्तपत्रांच्या मजकुरामध्ये एक ठळक फरक जाणवला. आपल्याकडे कुठलेही वृत्तपत्र उघडा ९० टक्के मजकूर राजकारणावर असतो. मुख्यमंत्री किती वेळा दिल्लीला गेले, खासदार कुठे दौऱ्यावर? कुणा मंत्र्यांनी कुठले उद्घाटन केले आणि मंत्र्याच्या विरोधातल्या इतर बातम्या, कुणा मंत्र्याला काढून टाका याबद्दल मोहीम, यांनीच रकाने भरलेले असतात. इथे मात्र राजकारण दहा टक्के आणि इतर बातम्या ९० टक्के होत्या.

सामान्य माणसाचे जीवन जर आपण अभ्यासले तर लक्षात येते की प्रत्येक

सामान्याच्या जीवनात राजकारणाला फारच कमी महत्त्व असते. वृत्तपत्रे ही सर्वसामान्यांसाठी असतात. मग सामान्यांच्या आयुष्यात ज्या गोष्टीला फारे महत्त्व नाही त्या गोष्टींना वृत्तपत्रांनी एवढे महत्त्व का द्यावे हा प्रश्न आमच्या वृत्तपत्रांना कधी पडलेला दिसत नाही. यांच्या वृत्तपत्रात मात्र एखादा लेखक कोणती नवी कादंबरी लिहितो आहे ही सुद्धा बातमी येते. घरांच्या समस्या, काऊंटी हॉस्पिटलमधल्या घटना यांच्या बातम्या येतात. एवढेच कशाला शहरातला वीज पुरवठा दीर्घकाळ खंडित झाला तर त्यावर वृत्तपत्रामध्ये अग्रलेख आलेला मी पाहिला. प्रत्येकाला आपल्या रोजच्या जीवनातल्या घडामोडीचा ताजा तपशीलच या वृत्तपत्रांमधून मिळत राहातो. आपल्या वृत्तपत्रांनीही या गोष्टींचा विचार करण्यासारखा आहे. टिळक-आगरकरांची वृत्तपत्रकारिता आजही प्रमाण मानायची का? त्या काळी स्वातंत्र्य हा सर्वांत मोठा राजकीय हेतू आणि वृत्तपत्रांपुढचे मोठे आव्हान होते. वृत्तपत्रांतून लोकांच्या राजकीय भावनांना प्रज्वलित करणे आवश्यक होते. आज परिस्थिती बदलली आहे. त्यावेळचीच मूल्ये, धोरणे आणि वृत्ती वृत्तपत्रांनी ठेवणे चुकीचेच आहे असे अमेरिकेतील वृत्तपत्रे वाचताना पुन्हा पुन्हा मनात आले.

वृत्तपत्रातील जाहिरातींचे प्रचंड म्हणा किंवा अतिप्रचंड प्रमाण पाहून वृत्तपत्राच्या आर्थिक बाजू किती भक्कम असतील याची कल्पना कुणालाही सहजपणे यावी. ८६ पाने जाहिराती, केवळ जाहिराती. त्या देणारे आणि त्या वाचणारे दोघेही धन्यच.

अमेरिकेत वृत्तपत्रांच्या खप वाढविण्याच्या प्रयत्नांची कल्पनाही अभिनवच बरं का. एके दिवशी घरी फोन आला.

'हॅलो मी एल. ए. टाईम्सचा रिप्रेझेन्टेटिव्ह बोलतोय...' मग धडधडा सारी वैशिष्ट्ये सांगितली गेली आणि शेवटचे वाक्य 'तुम्ही हे वृत्तपत्र रोज घ्या.'

'सॉरी, आम्हाला नको आहे सध्या.'

'मग आठवड्यातून तीन वेळा घ्या.'

'नको. थँक्यू.'

'मग प्रत्येक रविवारी घ्याच.'

'नाही हो. सध्या आम्हाला गरजच नाही.'

'ठीक आहे, मग उद्यापासून फ्री सॅम्पल पाठवतो.'

पुढे काही म्हणायच्या आत दुसऱ्या बाजूने फोन बंदही झाला.

❖❖❖

# अमेरिकन टी. व्ही. चा अवर्णनीय अनुभव

एका बुद्धिजीवी प्रोफेसरला एके दिवशी अचानक चक्क 'जिनी' भेटतो. तो म्हणतो, 'मी तुला खूप श्रीमंत करीन. आपण इथे एक नवे शहर उभे करूया. त्यातले सगळे आपल्या मालकीचे.'

प्रोफेसर हसतो. म्हणतो, 'मनात येईल ते असे वाटेल तेव्हा हल्ली काही निर्माण करता येत नाही. त्यासाठी संबंधित खात्याची परवानगी आवश्यक असते. त्या परवानग्या सहजी मिळत नसतात.' जिनी आणि त्याचे बोलणे दोन्ही गोष्टी अर्थहीन समजून तो उडवून लावतो.

आपल्यावर हा प्रोफेसर अविश्वास दाखवतो आहे. आपल्या अस्तित्वाबद्दलच शंका घेतो आहे, याचा जिनीला फार राग येतो. रागाने तो प्रोफेसराचे एक गुटगुटीत गाढव बनवतो.

प्रथम हा बदल प्रोफेसराच्या लक्षात येत नाही. तो नेहमीप्रमाणे घरी जातो. थेट आपल्या खोलीत जातो. कोचावर बसतो. पलंगावर विश्रांती घेतो. घरात एक गाढव शिरले आहे, या कल्पनेने घरातले भयंकर अस्वस्थ होतात. नाना उपायांनी त्या गाढवाला मारून घरातून हाकलून देतात.

मग प्रोफेसरचा जिनीवर विश्वास बसतो. तो जिनीकडे जाऊन माफी मागतो. पश्चात्ताप व्यक्त करतो. जिनी त्याला पुन्हा माणूस करतो. साऱ्या प्रकाराने हैराण झालेला, थकलेला प्रोफेसर पुन्हा घरी परततो. त्याचा एकूण अवतार पाहून घरातल्यांना वाटते की, हे गृहस्थ कुठे तरी भयंकर दारू प्यायले आणि झोपून राहिले होते. आज नशा उतरल्यावर घरी आले आहेत.

प्रोफेसर झाला प्रकार सांगतात. कुणाचाही विश्वास बसत नाही. गाढव झाल्यावर स्वतः केलेले प्रमाद प्रोफेसर मान्य करतात. मित्र, शत्रू व घरचे वैतागतात. कुणीतरी सरळ त्यांच्यावर केस करते.

झालेली कथा प्रोफेसर कोर्टात सांगतात. कोर्टही विश्वास ठेवत नाही. प्रोफेसरला केलेल्या गुन्ह्याची शिक्षा होणार एवढ्यात जिनीच कोर्टात अवतरतो. आपल्या मायाजालाने चमत्कार करून दाखवतो. कोर्ट प्रोफेसरला निर्दोष सोडते.

पुन्हा एका पार्टीत जिनी माणसाच्या रूपात प्रोफेसरला भेटून जुनीच ऑफर परत एकदा देतो. गाव उभे करण्याची व श्रीमंत होण्याची. ही ऑफर प्रोफेसर स्वीकारतो. पण एकच विनंती करतो,

'तू जिनी म्हणून भेटल्यापासूनच्या आत्तापर्यंतच्या माझ्या सर्व स्मृती पुसून टाक.'


गेल्यावर दोन तीन दिवसांतच अशी काही सुंदर नाट्यीकरणे मला टी. व्ही. वर पाहायला मिळाली. शिवाय टी. व्ही. ची काही चॅनेल्स फक्त पहाटे ३ ते ४ बंद. बाकी वेळ चालू. तर काही चॅनेल्स चोवीस तास चालू. पेपर व्ह्यू म्हणून एक चॅनेल. त्यावर दिवसभराचा सारा प्रोग्राम कळतो. शिवाय दुकानांमध्ये दर आठवड्याला टी. व्ही. च्या सर्व कार्यक्रमांची १०० ते १२५ पानी पुस्तिका मिळते. त्यात सुरुवातीस चांगले लेख असतात. विषय असतो, 'या आठवड्यात टी. व्ही. वर काय पाहाण्यासारखे आहे?' चित्रपट, मालिका व त्यांचे थोडक्यात कथानक असते. पुस्तिकेची किंमत ६९ सेंटस. ही किंमत अशी बाटा कंपनीने ठेवलेल्या किंमतीसारखी आडनिडी का ते मला कळले नाही.

काही चॅनेल्सवर नव्या-जुन्या फिल्म्स २४ तास चालू असतात. यांच्या मालिका भयंकर कंटाळवाण्या. विषय सगळे काकोडकरी कादंबऱ्यांचे. सोप ऑपेरा म्हणे. ह्या फार लोकप्रिय मालिका आहेत. 'सान्ताबार्बारा' सारख्या काही तर ३ ते ४ वर्षे झाली तरी चालूच आहेत. कलात्मकदृष्ट्या शून्य.

'चिअर्स' नावाची खास अमेरिकन सायं मालिका पाहण्याचा योग आला. त्यातल्या डॉक्टरीणबाई सांगतात, 'माझा आदर्श नवरा मला बोअरिंग वाटतो. मी ज्या बारमध्ये जाते तिथला बारमन सॅम मला आवडतो. कारण तो 'बॅडबॉय' या वर्गात मोडतो. नवरा कंटाळवाणा वाटतो, कारण तो फार चांगला, 'गुडबॉय' आहे. प्रेक्षकांच्या मते 'चिअर्स' मालिका फार प्रेक्षणीय असते.

प्रत्येक विषयासाठी वेगळा चॅनेल. स्पोर्टस् चॅनेलवर सुंदर बुल फाइट पाहाण्याचा योग आला. डिस्कव्हरी चॅनेलवर वाईल्ड लाईफ, साहसे, संशोधन यावरचे अप्रतिम कार्यक्रम. मुलांसाठी एका चॅनेलवर जनरल फिल्म्स, दुसऱ्या चॅनेलवर क्रिएटिव्ह फिल्मस्, तिसऱ्या चॅनेलवर डिस्ने प्रोग्रॅम्स. स्त्रियांसाठी लाईफ टाईम नेटवर्क. एक चॅनेल ब्लॅक एन्टरटेनमेंटचा. एम. टी. व्ही. वर म्युझिक कॉन्सर्ट्स

व कलावंतांच्या मुलाखतीचा.




**२४ तास टी. व्ही. चालू**

एक गमतीशीर भाग म्हणजे कॅलिफोर्नियात गव्हर्नरची निवडणूक होती. अंतिम फेरी व्हायची होती. कुठली तरी एक मेयरबाई आणि एक कुठला तरी मेयर बाबा टी. व्ही. वर सतत येऊन 'मी पर्यावरणासाठी अमूक केले, तमूकसाठी यंव केलेय,' सांगून भाषणाचा शेवट करीत की, 'मला निवडून द्या.' वैयक्तिक प्रकाराचे माध्यम म्हणून असा टी. व्ही. चा उपयोग मला अनोखा वाटला. पण इथे सर्व माध्यमांची म्हणजे टी. व्ही., रेडिओ, वृत्तपत्रे या साऱ्यांची निवडणुकीच्या प्रचारकाळातली भूमिका थक्क करणारी होती. मॅचचे रंगतदार, रसभरीत निवेदन सांगणाऱ्या निवेदकाची भूमिका ह्या माध्यमांनी स्वीकारलेली नव्हती, तर या खेळात तटस्थपणे दोन्ही बाजू पाहाणाऱ्या रेफरीची जी भूमिका असते ती भूमिका त्यांनी अंगीकारली होती.

टी. व्ही. वरचे बरेच कार्यक्रम पाहताच सतत जाणवायचे की, ही मंडळी नको तेव्हा आणि सतत उगीच हसत असतात. कारण काही नसते. 'बिल क्रॉस्बी' आणि 'सिम्पसन' अशा दोन विनोदी मालिका फार लोकप्रिय होत्या. का ते मला पंधरा प्रोग्रॅम्स पाहूनही कळले नाही. टी. व्ही. प्रोग्राममधली माणसे सतत हसत असतात. पुन्हा बॅक ग्राऊंडला सारखे हास्यध्वनी प्रोड्यूसरने टाकलेले असतात. संधी मिळाली की टाकले एक हसणे. पार्श्वसंगीताऐवजी समूहाचे हास्यध्वनीच वापरायचे. मला वाटते इथल्या प्रोड्यूसर्सकडे वेगवेगळ्या प्रकारचे हास्य डब्यात भरून कायम ठेवण्याची व्यवस्था आहे. दबलेली खसखस, हळू हसणे, खदखदा हसणे, थोड्या समूहाचे हसणे, म्हाताऱ्यांचे हसणे... हसणेच हसणे. ही हसणी किती शब्दांनंतर घालावायची त्याचेही कोष्टक तयार असावे. या साऱ्यांचा अपेक्षित परिणाम होतो का अशी एक दुष्ट शंका माझ्या मनात डोकावली. पण त्याचे निरसन मित्रमैत्रिणींच्या घरी टी. व्ही. पाहाताना झाले. सारे सुरुवातीलाच टी. व्ही. ची बटणे सुरू केली की हसायला सुरुवात करतात.

पाहणारे प्रेक्षकही खूप खदखदून हसत असतात, हे दिसते. पुन्हा जास्त लोकप्रिय कोण? बिल क्रॉस्बी का सिम्पसन अशी स्पर्धाही होती. लोकांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. जाहिरातीतही कुणी तरी गुदगुल्या करते असे प्रसंग वारंवार. मग सगळे खूप हसतात. अगदी प्रेक्षकांसकट. प्रॅक्टिकल जोक्स नावाचा एक भीतिदायक प्रकार. एखाद्या प्रसिद्ध माणसाला टी. व्ही. टीमपैकी कुणी तरी खोटे सांगते. त्याची फजिती होते. ती फजिती टी. व्ही. कॅमेरे गुपचूप टिपतात. मग टी. व्ही. वर लाखो लोक ही फजिती पाहून खदखदून हसतात.

एका अत्यंत विख्यात क्रिकेटियरला त्याच्याच मित्राने फोन केला की, अमूक हॉटेलमध्ये आज फॅन्सी ड्रेस पार्टी आहे. तू बॅलेरिनाचा पोषाख करून ये. तो धिप्पाड निग्रो बापडा पार्टी मूडमध्ये डान्सरचा पोषाख करून उत्साहाने पोहोचला. पण तिथे कसली पार्टी अन् फॅन्सी ड्रेस पार्टी अन् कसले काय? तिथे सारे नेहमीचे वातावरण. सारे उच्चभ्रू लोक हॉटेलिंग करायला येऊन बसलेले. क्रिकेटियर महाशयांची त्रेधातिरपिट उडाली. लाजून शरमेने चेहरा लपवत ते बाहेर पडू लागले. कोणी तरी त्यांना ओळखलेच. रिसेप्शनिस्टही त्यांच्या नावाचा भयंकर उच्चार करून चकित होऊन ओरडली. मग तर क्रिकेटियरना मेल्याहून मेल्यासारखे झाले. ब्ल्यू झालरचा फ्रॉक सावरत ते कसेबसे गाडीत बसणार इतक्यात हॉटेलमध्ये दडलेला टी. व्ही. च्या मंडळींचा संच कॅमेरे व इतर सामग्रीसह बाहेर आला.

'हाय बडी, इट वॉज ए प्रॅक्टिकल जोक.' एकजण म्हणाला. मग तो 'बडी'ही

'ओ दॅट वॉज ए प्रॅक्टिकल जोक?' असे म्हणत सगळ्यांच्या खदखदून हसण्यात सामील झाला. तोवर बायको त्याला न्यायला आली. बावरलेल्या बायकोला, हॉटेल मॅनेजरला व प्रेक्षकांना आधीच कल्पना दिलेली असते. हा प्रसंग टी. व्ही. वर पाहाताच सारे पुन्हा पोट धरून हसत राहिले.

आणखी एक असाच प्रकार म्हणजे घरी घडलेला विनोदी प्रसंग व्ही. डी. ओ. कॅमेऱ्यावर चित्रित करून पाठवणे. त्यातील उत्तम प्रसंगाची कुणी तरी असामान्य व्यक्ती निवड करते. बक्षिस देते. प्रसंग कसे तर बबलगम चिकटून एखाद्याची उडालेली त्रेधा, वेडीवाकडी केलेली तोंडे वगैरे. एकूणच या मंडळींच्या विनोद-बुद्धीने मी बुचकळ्यात पडले. त्यांना कधी कुठली गोष्ट विनोदी वाटेल आणि खूप हसू येईल हे काही सांगता यायचे नाही. अमेरिकेतल्या टी. व्ही. ची दोन वैशिष्ट्ये माझ्या प्रकर्षाने लक्षात राहिली. पहिले वैशिष्ट्य म्हणजे २४ तास चालू असणाऱ्या बातम्या. त्या देताना केलेले विश्लेषण व विवेचन. बातमी देणारा फक्त घडामोडी सांगत नाही. तर त्या घटनेची थोडीशी पार्श्वभूमी - आवश्यक वाटल्यास - सांगतो आणि त्या घटनेवर स्वतःचे भाष्यही करतो. बातम्या सांगणारे अत्यंत नामवंत असे राजकारण, समाजकारण याचे अभ्यासक असतात. विद्यापीठातले राज्यशास्त्राचे विभाग-प्रमुखही असतात. या बातम्या ऐकणे हा एक अवर्णनीय अनुभव होता.

आणि दुसरा अवर्णनीय अनुभव म्हणजे टी. व्ही. वरचे 'विनोदी कार्यक्रम' पाहाणे.

❖❖❖

# अमेरिकन तरुणी

पानगळ सुरू झाली होती. प्रत्येक घरापुढच्या स्वच्छ असणाऱ्या लॉनवर पाल्यापाचोळ्यांचे ढीग कधी नव्हे ते दिसू लागले होते. 'शिशिर ऋतुच्या पुनरागमे एकेक पान गळावया.' मर्ढेकरांची कविता पुन्हा पुन्हा आठवत होती.

शिशिर ऋतुच्या पुनरागमे एकेक पान गळावया
लागता का मज येतसे नकळे उगाच रडावया
झाडीत जी निजली इथे इवली सुकोमल पाखरे
जातील ती उडूनी कुठे निष्पर्ण झाडीतून कापरे.

अचानक विकीचा फोन आला आणि मनाची मरगळ कुठच्या कुठे पळाली. विकी उर्फ व्हिक्टोरिया. ताडमाड उंचीची, हडकुळी, खूप सुंदर आणि सतत हसणारी अमेरिकन तरुणी. वय साधारण तिशीच्या आतबाहेर असावे. व्यवसायाने 'सोशल वर्कर.' तिने संध्याकाळी जेवणासाठी बोलावले होते. संध्याकाळ विकीबरोबर घालवायची या विचाराने मी आनंदले. विकी हा खास अमेरिकन तरुणीचा नमुना. कुणाही अमेरिकन तरुणीबरोबर वेळ कसा आनंदात जातो. तो एक आल्हाददायक अनुभव असतो. विकी समजली की कुठलीही अमेरिकन तरुणी आपल्याला समजू शकते.

सतत खळखळून हसणारी आणि अतिशय मृदू बोलणारी विकी संध्याकाळी मला न्यायला आली आणि सकाळपासून आलेली मनाची मरगळ पार नाहीशी झाली. विकीने कॅलिफोर्निया स्टाईलने अंगावर काहीही कपडे घातले होते. अरेबियन नाईटस् मधल्या चित्रातील बायका घालतात तशी खूप घोळाची आणि पायापाशी घट्ट असणारी सलवार आणि वरती खूप सैलसर पांढरा स्वेटर. जाताना अख्खावेळ विकीच बोलत होती. ती जास्त वेळ हसायची आणि दोन हसण्यांमधला वेळ भरून

काढण्याकरिता बोलायची. तिला कुठले चित्रपट आवडतात, कोण नट आवडतो, कुठली नटी आवडते यावर ती बरेच बोलली. स्ट्रीट प्लेज पहायला मी कुठेही जाते असे म्हणाली. 'हू डीड इट' - (हि, कुणी केले') असा शेवट असलेले 'रहस्यमय स्ट्रीट प्लेज' इथे असतात हे मला तिच्याकडूनच कळले. शर्ली मॅक्लेन ही तिची अत्यंत आवडती नटी. पण एखादी गोष्ट आपल्याला का आवडते याचे कारण तिच्याजवळ नव्हते. किंबहुना तिला ठाऊक नव्हते. कारण ही मंडळी सतत इतकी धावपळीत असतात की कुठल्याही बाबतीत थोडा वेळ काढून शांतपणे विचार करण्यासाठी लागणारा वेळ त्यांच्याकडे नसतोच. त्यामुळे बहुतेक गोष्टी आपण का करतो किंवा आपल्याला का आवडतात हे ठाऊक असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

वाटेत गाडी थांबली, गंभीरपणे तिने सांगितले-

आज स्टार ट्रेक आहे. मी मैत्रिणीला कॅसेट देऊन व्हीडीओ रेकॉर्डिंग करायला सांगून येते. आय डोण्ट वॉण्ट टू मिस इट. दोन मिनिटांत मी परत येते हं.

तीस वर्षांची विकी आणि दहा वर्षांच्या पोरांप्रमाणे तिचा लहान पोरांसाठी असलेला स्टार ट्रेक बघण्याचा अट्टहास. मला फार गंमत वाटली. एकूणच अमेरिकनांचा स्वत:चा असा कलेचा खास प्रांत आहे अशी माहिती मला विकीशी बोलताना मिळाली. ती माहिती अशी-

-सर्वांत सुरेल गायक प्रकार म्हणजे 'रॅप.' यात सूर नसतात, स्वरही नसतो. चाल नसते. एकामागोमाग एक वाक्यं वाचल्यासारखी धडाधड म्हणत राहायची. (तिने मला व्हॅनिला आईस या ग्रुपचे आईस... आईस बेबी जस्त कुल इट डाऊन हे गाणे ऐकवले. लेटेस्ट हीट.)

-सर्वोत्कृष्ट चित्रे म्हणजे 'कॉमिक स्ट्रीप्स.'

-सर्वोत्कृष्ट साहित्य म्हणजे 'नियतकालिकांतल्या गोष्टी.'

-सर्वोत्कृष्ट नाटके म्हणजे 'सोप ऑपेरा.'

-उत्तम संगीत 'ज्झाज.'

-उत्तम वास्तुशिल्प म्हणजे स्काय स्क्रॅपर्स.

अशा प्रकारे अमेरिकेच्या सांस्कृतिक जीवनाशी विकीमुळे माझा खूप जवळून परिचय झाला.

लग्न न करता विकी गेली तेरा वर्षे आपला मित्र विल्यम याच्याबरोबर राहाते. तो इंग्रजीचा शिक्षक आहे. विल्यम आणि विकी सुखात राहतात. विकी खूप काम करते. ती फार महत्त्वाकांक्षी आहे. सोशल वर्कर म्हणून ती तीन नोकऱ्या करते.

त्याशिवाय स्वतंत्र प्रॅक्टीस करते. विकी महिन्याला ४,००० डॉलर्स मिळवते. विल्यम आत्मसंतुष्ट वृत्तीचा आहे. शाळेत शिक्षकाची नोकरी करून जो पगार मिळतो तो त्याला पुरेसा वाटतो. बाकीच्या वेळात तो विकीचे व त्याचे छोटेसे घर सांभाळतो. विकी येण्यापूर्वी तो स्वयंपाक करून ठेवतो. या दोघांनी लग्न केलेले नाही आणि त्याबद्दल ते विचारही करीत नाहीत. कारण त्यांना आयुष्यात कुठलीही कमिटमेंट करणे पसंत नाही.

विवाह संस्थेचा परिचय त्यांनी मोजक्या शब्दांत करून दिला.

(१) लग्नावर शहाणी माणसे विश्वास ठेवत नाहीत. लग्न म्हणजे कमिटमेंट आली.

(२) दोन व्यक्तींमध्ये 'अप्रामाणिकपणा' या कलेचे उत्कृष्ट ज्ञान आवश्यक असणे, ही विवाहित आयुष्याची सर्वांत मोठी गरज असते.

(३) लोक अनेक कारणांसाठी आणि अनेक परिणामांसाठी विवाह करतात. पण केवळ प्रेमासाठी विवाह करणे म्हणजे अनेक दु:खांना आमंत्रण देणे.

विकी आणि विल्यम दोघे खूप प्रवास करतात. वर्षभर पैसे कमवून वर्षाकाठी दूरवर प्रवासाला जातात. स्वत:चा बंगला असावा, मालमत्ता करावी असे त्यांना वाटत नाही. ते भाड्याच्या घरात राहतात. ते दोघे सारा युरोप हिंडले आहेत. इजिप्त, भारत, गल्फ कंट्रीजही त्यांनी पाहिले आहेत. वर्षभराची कष्टाची कमाई सारी संपवून खंक होऊन ते मायदेशी परततात. पुन्हा पुढच्या प्रवासासाठी पैसे साठवायला नोकरी करतात.

जेवताना आपले निळे डोळे विस्फारून विकी तिच्या यंदाच्या देशाच्या भावी प्रवासाविषयी मला उत्साहाने सांगत होती.

विकीची चांगली ओळख झाली होती. मधून मधून गप्पा मारायला तिच्या घरीही ती बोलावे. तिचे घर अमेरिकन घरांचा खास नमुना होता. शहराच्या मध्यभागी म्हणजे उपनगरात नसून डाऊनटाऊनमध्ये तिचे घर होते. एक अभ्यासिका. त्यात मोजके सामान. लिहिण्याचे छान टेबल खुर्ची. कोपऱ्यात मंद प्रकाशाचा उभा दिवा. एक आरामखुर्ची वाचनासाठी. दोन भिंती भरून बुक रॅक्स. त्यावर सोशालॉजी, जिऑग्राफी, हिस्ट्रीची पुस्तके. जागतिक नकाशांची पुस्तके. विश्वकोशाचे खंड. कुंड्यांमधून बरीच इनडोअर प्लॅण्ट्स. हॉल. तो जरा भपकेबाज. पॉश फर्निचर, भिंतीवर उत्तम पेंटिंग्ज. सामानाची फार गर्दी नाही. सगळे मोजके आणि आवश्यक तेवढेच, पण उंची. स्वयंपाकघर सोडून घरभर शेवाळी रंगाचे

कार्पेट. उबदार आणि खूप वैयक्तिक वाटणारी बेडरूम. आणि सर्व सुखसोईंनी सुसज्ज स्वयंपाकघर. त्याजवळ एक कपड्यांची खोली. त्याला 'वॉक इन क्लोजेट' म्हणायचे. म्हणजे ज्या कपाटात आत जाऊन कपडे ठेवता येतात, बदलता येतात असे कपाट.



**अमेरिकन तरुणी आणि मार्जार प्रेम**

घरात बसले की सारखी इकडून तिकडे मांजरे यायची. आपल्या पायाला अंग घासायची. विकीच्या मांडीवर उडी मारून बसायची. ती त्यांना कुरवाळायची. मांजरे हा प्रत्येकाचाच जिव्हाळ्याचा विषय असावा. विकीच्या एकूण संभाषणापैकी १/४ भाग 'मार्जारपुराण' असायचे. मांजरांपैकी कोण खूप लबाड आहे, कोण स्वार्थी आहे हे ती आत्मीयतेने सांगायची. त्यांनी काही फाडले, फोडले, कशाची वाट लावली याचा तपशीलही कौतुकाने द्यायची. त्या मांजरांसाठी आणलेल्या खाद्याच्या डब्यांनी एक मोठे फडताळ भरलेले होते. कारण काय? तर म्हणे प्रत्येकाची आवड

वेगवेगळी आहे. वयाने कमी असलेल्या मांजरांना आवश्यकतेप्रमाणे प्रोटीनरीच फूड, वयाने जास्त असलेल्या मांजरांना कॅलशियमयुक्त आहार.

'इथं लोक मांजरंच का पाळतात? कुणाच्या घरात कुत्री का दिसत नाहीत? कुत्र्यांचा उपयोग घर राखण्यासाठी तरी असतो. मांजरांचा काय उपयोग?' मी विकीला विचारले. विकीच्या भावना जरा दुखावल्या गेल्या असाव्यात. मांजराबद्दल ती खूपच हळवी होती. काही वेळ तिने उत्तर दिले नाही. मीही गप्प. तीही गप्प. वातावरण जरा विचित्रच झाले. विकीच्या सहवासात नेहमी आनंदी, प्रसन्न वाटायचे. ती अशी गप्प प्रथमच झाली. मला वाटले उगीच विचारले. मग जरा वेळाने म्हणाली,

'कुत्र्यांना फार मेन्टेनेन्स असतो. फिरवून आणा, आंघोळ घाला... एवढे सारे करायला इथे वेळ कुणाला असतो? मांजरे कुणावर अवलंबून नसतात. सारे आपले आपण करतात.'

मग ती नेहमीच्या लकबीने खळखळून हसली. आपले निळे डोळे बारीक करून ओठाला विशिष्ट मुरड घालत आपण फार गंमत केलीय अशा आविर्भावात म्हणाली, 'आजच मी ग्रेस (तिचे एक मांजर) च्या डोक्यावरचे सगळे केस चॉप करून टाकले. कारण त्याचे डोके क्लीन ठेवणे मला कठीण जाते.'

पुन्हा खळखळून हसली. कुठल्याही गोष्टीची तिला फारच गंमत वाटते. हा स्वभाव खूपजणांच्यात दिसून आला.

विकीला काय करण्यात सगळ्यांत जास्त आनंद मिळतो?

तर वेडेवाकडे घाट, खोल दऱ्या, झुळझुळते झरे पाहात हिंडणे. झाडांच्या सावलीत शांत झोपणे. ओंजळीने ओढ्याचे पाणी पिणे. पाखरांचे गाणे मनमुराद ऐकणे आणि पार भेंडाळून जाईपर्यंत भटकणे.

विकी मैत्रीला भुकेलेली आहे. पण मैत्रीतही तिला आश्वासन हवे की, तुम्ही तिच्या जीवनात ढवळाढवळ करणार नाही. तिला जीवनाबद्दलचे आकर्षण आहे. तसेच जीवनाचे स्वातंत्र्य अबाधित रहावे हा अट्टहासही आहे.

गाडीचा या मंडळींचा छंद तर गंमतशीरच आहे. इथे प्रत्येक गोष्टीची तात्कालीन उपयुक्तता बघितली जाते आणि नावीन्य पाहिले जाते. विकी दरवर्षी एका वेगळ्या कंपनीची, वेगळ्या रंगाची, आकाराची, शरीरसौष्ठवाची सेकंडहॅन्ड गाडी विकत घेते. वर्षभर अक्षरशः ताबडते. वर्षअखेरीस कचरा म्हणून टाकून देते.

स्वातंत्र्य, गतिमानता आणि आवेग या तीनही गोष्टींचे मिश्रण मला

विकीच्या जीवन-पद्धतीत नेहमी प्रकर्षाने जाणवे.

विकीबरोबरच तिच्या काही कामानिमित्त 'वुमेन्स हेल्थ सेंटर' ला जाण्याचा योग आला.

९ महिने पूर्ण झालेली, गरगरीत पोटाची पण प्रसन्न, हसतमुख अशी विकीची मैत्रीण हॅटी कार्टर ह्यूम तिथे भेटली. प्रचंड पोटामुळे ती बदकासारखे चालत होती. तिची ओळख झाली. मी ऐकून थक्कच. दिवस भरलेली ही बावीस वर्षांची तरुणी चेकअपसाठी चक्क स्वतः ३५ मैल गाडी चालवत आली होती. ती वृत्तीने स्वतंत्र होती. परावलंबित्व तिला मान्य नव्हते.

तिथेच ९३ वर्षांची बेझी नोबल भेटली. आयुष्यात ती तीन वेळा विधवा झाली. आयुष्यभर तिने नोकरी व घर या दोन्ही गोष्टी सांभाळल्या. ४६ वर्षे ती शिक्षिका होती.

विकी म्हणाली, 'तुला पूर्णवेळ घर सांभाळणारी' स्त्री सापडणे जरा कठीण कारण 'हाऊसवाईफ' ही संज्ञा इथे जरा तुच्छ लेखली जाते. प्रत्येक स्त्री तिच्या कुवतीप्रमाणे पैसे इथे कमवते आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनते.'

मला पर्ल बकने १९३३ साली लिहिलेल्या 'द फर्स्ट वाईफ' मधले वाक्य आठवले. 'स्त्रीने (आज्ञा पालन) शिकले पाहिजे. आपण कारण विचारता कामा नये. आपला जन्म आपण बदलू शकत नाही. तो आपण स्वीकारला पाहिजे आणि आपल्या आयुष्यातील कर्तव्ये करीत राहिले पाहिजे.'

ही लेखिकेची वाक्ये १९३३ सालच्या अमेरिकन स्त्रीचे प्रातिनिधिक विचार असतील तर आज १९९० सालची अमेरिकन स्त्री किती तरी बदललेली होती.

एके दिवशी जिमने सिंगापूरला नोकरी पत्करली. कारण काय तर त्याला अमेरिकेचा कंटाळा आला होता. होते-नव्हते ते सारे विकून जिम निघाला. त्याच्याबरोबर त्याच्या व्हिसावर स्थायिक म्हणून विकीला त्याच्याशी लग्न करून कायदेशीर पत्नी म्हणून जावे लागणार होते. आधी सारे ठरले. पण ऐन वेळी विकीने लग्नास नकार दिला. स्वतंत्रपणे आणि कुठल्याही भावनेच्या आहारी न जाता स्वतःचा निर्णय तिने स्वतः थंड डोक्याने घेऊन टाकला. जिम सिंगापूरला आपल्या आधीच्या पत्नीच्या मुलासह निघून गेला. जाताना 'विकी नंतर येईल. आधी माझे स्थिरस्थावर होऊ दे, मग ती येईल' असे मित्रमैत्रिणींना सांगून गेला.

विकी आपल्या ४/५ मांजरांसह एकटी त्यांच्या भाड्याच्या घरात राहू लागली. एके दिवशी आली आणि म्हणाली,

'मी कंडक्टेड टूर्स मधून पेरूला निघालेय.'

'एकटीच?'

'हो.'

'आणि जिम?'

'तो नाही. मीच जातेय.'

मग माया संस्कृती आणि इंका संस्कृतीत कसा फरक आहे, तो प्रत्यक्ष कसा पाहता येईल याबद्दलच ती खूप वेळ बोलत होती. अगदी खूप उल्हसित होऊन सांगत होती. तिचे वाचन सखोल होते, बुद्धीने ती प्रगल्भ होती असे हे बोलणे ऐकताना वारंवार जाणवले. ज्या आनंदात विकी जिमबरोबर प्रवासाला निघे त्याच आनंदात ती निघाली होती. जिमची आठवण नाही, खंत नाही.

ही ताडमाड उंचीची, सडपातळ अंगलटीची, सुरेख, रेखीव चेहऱ्याची आणि सतत हसणारी मृदुभाषी विकी उर्फ व्हिक्टोरिया जिमकडे जाईन जाईन म्हणता अमेरिकेतच राहिली आणि नंतर दुसऱ्या मित्राबरोबर फिरताना दिसू लागली.

❖❖❖

# जन्मसिद्ध हक्क

अमेरिकन लोकांचा असा कुठला श्रेष्ठतम गुण आहे की ज्या गुणाच्या जोरावर हे राष्ट्र त्या थोड्या कालावधीत जगातले एक संपन्न राष्ट्र बनले?

पृथ्वीतलावर जेवढ्या म्हणून उत्कृष्ट वस्तू उपलब्ध आहेत त्या वस्तूंनी भरलेले अमेरिकेमधले मॉल (शॉपिंग प्लाझा). तिथल्या भव्य रस्त्यावरून धावणाऱ्या जर्मन, जपानी, अमेरिकन मेकच्या आलीशान आणि दर्जेदार गाड्या. कुठलीही वस्तू सहजी डझनांच्या संख्येने खरेदी करणारी अमेरिकन मंडळी. स्विमिंग पुलासह सर्व सुखसोईंनी अद्ययावत असणारी घरे आणि सगळ्या ऋतूंमध्ये कायम ओसंडून धो धो वाहणारी श्रीमंती पाहून माझ्या मनात सतत हा प्रश्न उभा राही.

निसर्गसंपत्तीने अमेरिकेवर आपला वरदहस्त ठेवला आहे. सोन्याचे साठे कॅलिफोर्नियात आजतागायत सापडताहेत. इथली जमीन फार सुपीक आहे, अशी अनेक स्वाभाविक दिसणारी कारणे कुणी सांगतील. पण ती खरी कारणे नाहीत. या कारणांपेक्षा अतिशय महत्त्वाचे आणि सर्वांत पहिले कारण म्हणजे अमेरिकन माणसाचा एक गुण - अतिशय कष्टाळूपणा. नुसताच नव्हे तर भयानक कष्टाळूपणा. कष्ट करणे म्हणजे काय आणि या श्रेष्ठतम गुणाची महती कोणती हे फक्त अमेरिकनांनाच कळले आहे. खरोखरच प्रत्येक अमेरिकन माणूस कमालीचा कष्टाळू असतो. दिवस उजाडताच अत्यंत लवकर काम सुरू करून ते उशिरात उशिरा संपवण्यात त्याचा हातखंडा आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे केलेल्या कष्टांचा प्रत्येकाला या देशात उत्कृष्ट मोबदला मिळतो. कष्टांचे चीज होते. कष्ट करणाऱ्याच्या पदरी बाकी काही न पडता केवळ अधिक कष्टच पडतात असे भारतातल्या सारखे इथे होत नाही. उलट कष्ट करणाऱ्याच्या पदरी बाकी सारे पडतेच पण भरपूर पैसेही पडतात.

मटण विक्रेत्यांच्या ट्रेड युनियनमध्ये मी गेले होते. ट्रेड युनियन्स म्हणजे इथे खरोखरीच प्रत्येक ट्रेडच्या युनियन्स आहेत. तिथे मला 'बिल मोरबिक' भेटला. प्रसन्न चेहऱ्याचा आणि भल्यादांडग्या शरीरयष्टीचा बिल युनियनवाला होता. युनियन हा शब्द आम्हा भारतीयांच्या मनात संप या शब्दाशी अत्यंत निगडित झालेला आहे. त्यामुळे युनियन म्हटले की पहिला प्रश्न संपाचा आमच्या मनात टुणकन उडी मारतोच.

मी : हाय, हाऊ आर यु डुईंग ? (असे अमेरिकेमध्ये एकमेकाला प्रत्येकजण विचारतो आणि मगच पुढचे संभाषण सुरू होते.) कुतूहलाने मी बिलला विचारले- 'इथे तुमच्याकडे संपाचे प्रमाण किती आहे?'

बिल : फारसे नाही. (मला धक्काच बसला.)

मी : असे कसे काय?

बिल : इथे एम्प्लॉयर उत्तम पैसे देतो. त्याचा मोबदला कामगार त्याला उत्तम कामाच्या स्वरूपात देतो. संपाची वेळच येत नाही. पैसे उत्तम देतो तो एम्प्लॉयर आणि काम उत्तम देतो तो मजूर. नाही का?

वाक्य संपले की, या कानापासून त्या कानापर्यंत हसण्याची बिलची मजेदार लकब मला अनेकांच्यात अमेरिकेत पुढे आढळली.

एम्प्लॉयर आणि मजुरांची त्यांची व्याख्या ऐकून मी गप्प झाले. पण मनात आले, 'छे, छे... आमची व्याख्या याहून वेगळी आहे. ज्याच्या विरुद्ध रान उठवून सतत संप करायचे तो 'मालक', ज्यांनी सतत संप करीत राहायचे ते 'मजूर' आणि सतत संप कसे होत रहातील याची ज्यांनी दक्षता घ्यायची ती 'ट्रेड युनियन.'

अमेरिकनांची मालक-मजूर युनियनची व्याख्या वेगळी का? तर अमेरिकन माणूस हा स्वभावतःच फेअर माईंडेड आहे. ज्याचा त्याला योग्य मोबदला दिला पाहिजे, असे प्रामाणिकपणे त्याला वाटते. त्यामुळे इथे कुणी कुणाची पिळवणूक करीत नाही. शिवाय इथे सुबत्ताही खूप आहे. त्यामुळे स्वतःचे पोट भरण्यासाठी दुसऱ्याच्या तोंडचा घास काढून घेण्याची गरजही उरत नाही.

बिलशी झालेल्या चर्चेत मला कळले की, या देशात मालक आपल्या कामगारांना उत्तम वागणूक आणि भरपूर पगार देतात, हे खरे. पण भारताप्रमाणे इथे कामगारांना कायद्यानुसार फार काही सवलती दिलेल्या नाहीत. कायद्यात कामगार पुरुष व स्त्रियांसाठी विशेष स्वरूपाच्या तरतुदी नाहीत. मला या गोष्टीचे नवल वाटले. कारण अमेरिकनांच्या स्वभावात बसणारी ही गोष्ट नक्कीच नाही. इथे वावरताना अनेक बाबतींत लक्षात आले की, इथला प्रत्येक माणूस स्वतःच्या

हक्कांसाठी अतिशय जागरूक असतो.

काही टीन एजर पोरी एका हॉटेलमध्ये बर्गर खाण्यासाठी गेल्या. या मंडळींना प्रत्येक खाद्यपदार्थ प्रचंड आकारात आणि प्रमाणात लागतो. त्यांना सगळ्याच बाबत मोठ्या प्रमाणाची हौस असावी. इमारतींपासून ते सँडविचपर्यंत सारे प्रचंड. त्यांचे नेहमीचे लाडके खाणे म्हणजे बर्गर किंवा सँडविच. आणि त्याचबरोबर पेय पेप्सीकोला किंवा सेव्हनअप. पण प्रमाण किती? सँडविच म्हणाल तर एका फुटाचा आणि त्याची रुंदी साधारणतः पोरांची खेळण्यातली बस असते तेवढी. बर्गरमध्ये अनेक प्रकार. कांदा, टोमॅटो व थाऊजंड आयलंड सारखे नावाशी संबंध नसलेले एखादे सॉस आणि त्याच्यामध्ये उकडलेल्या मांसाची बिनचवीची चपटी चकती. ती किती वजनी? तर पाव पौंड. (तिथे अजूनही पौंड, औंस, फूट, यार्ड, मैल वापरतात. दशमान पद्धतीचा त्यांनी स्वीकार केलेला दिसत नाही. कारण ठाऊक नाही.) भोवताली खालून व वरून गोल पाव. बरोबर थंड पेय. घ्यायचे ते सोळा औंस किंवा बत्तीस औंस. चहा गरम पीत नाहीत. तो नेहमी 'आईस टी'च असतो. चव अत्यंत वाईट. फक्त कॉफी मात्र गरम पेय म्हणून प्यायले जाताना दिसते आणि एक मजेदार वाटलेली गोष्ट म्हणजे इथे पाणी, बियर, वाईन कुलर आणि कोल्ड ड्रिंक एकाच किंमतीला मिळते. पिझ्झा हे आणखी एक क्रेझ. त्याचा आकार १८ इंच किंवा २२ इंच. त्यापेक्षा लहान पिझ्झा मिळतच नाही. एकूण यांच्या खाण्याचे सारे प्रमाण बकासुराच्या गाडाभर अन्नाची आठवण करून देणारे आहे.

तर त्या पाव पौंडी बर्गर, एक फुटी सँडविच आणि बत्तीस औंसी पेप्सी-कोला प्यायला आलेल्या किशोरींच्या लक्षात आले की, या हॉटेलवाल्याने आपल्याला जे अन्नपदार्थ दिले आहेत ते अगदी सरळ सरळ शिळेच दिलेले आहेत. आपल्या हक्कांसाठी सदैव जागरूक राहाण्याचे बाळकडू मिळालेल्या त्या किशोरींनी हॉटेलच्या दारातच ठिय्या दिला. येणाऱ्या-जाणाऱ्या गिऱ्हाईकांना थांबवून त्या नम्रपणे ठाम सुरात सांगत की, 'इथे चांगले पदार्थ दिले जात नाहीत. ग्राहकांना वाईट अन्न देतात.' एवढे सांगून येणाऱ्यांना त्या परत पाठवून देत. हॉटेलवाला हताश मनाने आणि केविलवाण्या मुद्रेने हा चाललेला प्रकार पाहात होता. हक्कांसाठी जागरूक असणाऱ्या त्या नव्या मनूच्या शूर शिपायांना अडवण्याचे धैर्य त्या बापड्यात नव्हते.

आमच्या शेजारी राहणारा टॉम एका बड्या दुकानात जाऊन कार्पेट विकत घेऊन आला. घरी आल्यावर त्याच्या लक्षात आले की, आपल्याला हे कार्पेट फारसे आवडलेले नाही. असे प्रत्येकाचेच होते. असे वाटणे हा पुन्हा सवयीचा आणि हक्काचा भाग. सवयीचा एवढ्यासाठी की, एखाद्या प्रचंड दुकानामधून काही तरी

वस्तू खरेदी करणे, मग जाऊन ती बदलून आणणे, मग पुन्हा जाऊन बदललेली गोष्ट बदलून आणणे हा वेळ घालविण्यासाठी आणि मनोरंजनासाठी त्यांनी शोधून काढलेला एक आवडता छंद आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुकानदार ती हसतमुखाने दरवेळी बदलूनही देतो. 'नेतानाच विचार करून न्यायची होती, तेव्हा कळत नव्हते का?' असा वितंडवाद घालत नाही अथवा 'आत्ता वेळ नाही, गिऱ्हाईकांचा टाईम आहे, दुपारी या.' असे उर्मट आवाजात ठणकावून सांगत नाही. आपल्याला मात्र कुठल्याही दुकानात याच उत्तराची सवय असते. टॉम कार्पेट घेऊन दुकानात गेला आणि त्याने ते कार्पेट परत करून त्यापेक्षा भारी किंमतीचे कार्पेट मागितले. प्रथम कार्पेट बदली टॉमने कार्पेटच मागितले, म्हणून दुकानदार आश्चर्यचकित झाला असावा. त्या आश्चर्यातून सावरल्यावर त्याने नम्रपणे टॉमला सांगितले की, यापेक्षा उत्तम कार्पेट आमच्याकडे नाही. जातिवंत अमेरिकन टॉमला हे सहन झाले नाही. साक्षात त्याच्या हक्कावरच गदा आली होती. तो गप्प बसला नाही. नंतरचे दोन आठवडे आपल्या सुरेख होंडा ॲकॉर्ड गाडीवर भलाथोरला फलक लावून तो रोज ऑफिसला जायचा. फलकावर त्या दुकानाचे नाव काळ्या मोठ्या




**हक्काची पायमल्ली सहन करणार नाही**

अक्षरांत लिहिले होते. खाली लिहिले होते की, या दुकानात माल घेऊ नका. ते वाईट माल देतात व बदलायला गेल्यावर सरळ नकार देतात.

आमच्या शेजारच्या रस्त्यावरच्याच लाँड्रीत एका बाबाने शर्ट टाकला. लाँड्रीतून परत आणल्यावर त्या शर्टावर एक डाग पडलेला होता. तर हा गृहस्थ, त्याची बायको व पोरगा दर शनिवारी व रविवारी त्या लाँड्रीच्या दारात बर्गर आणि कोक वगैरे खाणे घेऊन मुक्काम ठोकायचे. प्रत्येकाच्या हातात पाटी असायची- 'याची कस्टमर सर्व्हिस बेकार आहे. याच्याकडे कपडे टाकू नका.' प्रत्येक शनिवार रविवार या कुटुंबाने असे धरणे धरल्यावर त्या लाँड्रीवाल्याने एके दिवशी चक्क दुकान बंद केले.

एकूण कुणाही अमेरिकनाला आपल्या हक्काची पायमल्ली सहन होत नाही. जपानी आईबापांच्या पोटी जन्माला आलेली जपानी बाहुलीसारखी दिसणारी मिशेल अमेरिकन सिटीझन. तिने एका शिखाशी लग्न केले आहे. त्याचे नाव डॉन म्हणाली. आडनाव काय तर चँड. मला कळेना हे कुठले भारतीय आडनाव. तिच्या नवऱ्याशी - डॉनशी ओळख झाली तेव्हा उलगडा झाला की त्याचे मूळचे नाव ध्यानचंद आहे. ही मिशेल जपानी हेल काढून जपानी शब्द वापरून इंग्रजी बोलते. तिला इंग्रजी लिहिता नीट येते. मिशेल काऊंटी हॉस्पिटलमध्ये मेडिकल सोशल वर्कर म्हणून काम करते. रोग्यांशी बोलणे, अडचणी समजून घेणे, त्यांच्यावर नीट उपचार होतात का ते घरी जाऊन पाहाणे या तिच्या कामात बोलीभाषा हेच विचारांच्या देवाणघेवाणीचे एकमेव माध्यम असते. त्यामुळे इंग्रजी बोलता येत नाही म्हणून मिशेलला कार्यकारिणीने कामावरून काढले. अमेरिकन मिशेल फार चिडली. नोकरी हा माझा हक्क आहे, तो कसा काढून घेता? माझ्या रुग्णांना माझी भाषा समजते. त्यांची तक्रार नाही. हा पवित्रा घेऊन स्वतःच्या हक्कासाठी मिशेल हॉस्पिटल विरुद्ध कोर्टात गेली आणि तिने चक्क केस जिंकली.

मी गौरेतर असल्याने मला कार्यालयात दुजाभावाने वागवले जाते म्हणून ग्लोरिया व्हाईट ही काळी बाई कोर्टात गेली आणि केस तिच्या बाजूने झाली. स्वतःच्या हक्कांसाठी अमेरिकन माणसे ताबडतोब कोर्टाचा रस्ता पकडतात. इथे वीज पुरवठा खाजगी कंपन्यांचा असतो. शहरातल्या काही भागातली वीज दोन तास गेली. हक्कांसाठी तत्पर असलेल्या नागरिकांनी कंपनीवर खटला भरला. वृत्तपत्रांनी नागरिकांची बाजू घेऊन अग्रलेख लिहिले. नागरिक केस जिंकले.

एकूण काय कोर्टाची पायरी चढण्याचा शहाणपणा प्रत्येक अमेरिकन आयुष्यात एकदा तरी करतोच.

❖❖❖

# क्रेडिट कार्ड- (तिळा) दार उघड

अमेरिकेतील वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाचा पाया काय आहे? व्यक्तीच्या उत्कर्षाचे रहस्य काय? तर उधारी मिळविण्याची पत. ही पत प्रत्येकाला असते. 'क्रेडिट' हा इथे परवलीचा शब्द. तिळा दार उघड म्हटल्यावर कुठलीही गुहा उघडावी तसे 'क्रेडिट' तुमच्यासाठी कुठलेही बंद दार सताड उघडून देते आणि तेही ताबडतोब.

इथल्या गगनाला भिडू पहाणाऱ्या उत्तुंग इमारती. अतिभव्य रस्ते, डोळे दिपवणारे कारखाने, झगमगणारे शॉपिंग प्लाझा, रम्य बागबगीचे आणि इंद्रपुरीलाही लाजविणारे विलासी जीवन म्हणजे अमेरिका. पण या सगळ्यांपेक्षा माझ्यावर छाप पडली ती त्यांच्या एका वृत्तीची- अहर्निश कष्ट करून स्वतःची पत वाढवणे.

खूप कष्ट करून खूप पैसा मिळवणे इथे कुणालाही शक्य असते. वय, लिंगभेद, शिक्षण, बुद्धिमत्ता, कौटुंबिक स्थिती एवढेच काय पण तुमचा स्वतःचा भूतकाळ ........ काही काही आड येत नाही. त्याचप्रमाणे क्रेडिटवर पैसे मिळवण्यासाठीही इथे कुणालाही कशाची आडकाठी येत नाही. कुठलाही उद्योगधंदा करण्यासाठी कर्ज मिळणे इथे सहजी शक्य असावे. जगामधल्या कुठल्याही देशातला माणूस इथे येऊन उत्तम जीवन जगतो, आयुष्यात स्थिरावतो कसा याचे मला विविध लोक पाहून आश्चर्यच वाटायचे. इटालियन असो, फ्रेंच असो, चिनी, जपानी असो वा जर्मन असो. सडोना नावाच्या नितान्त सुंदर गावी आम्ही गेलो होतो. तिथे ब्लॅक फॉरेस्ट नावाच्या उत्तम मोटेलमध्ये राहिलो. लाल दाढीचा, आडदांड शरीरयष्टीचा धारदार नाकाचा 'हॅन्स' हा जर्मन माणूस या मोटेलचा मालक होता. त्याला धड इंग्रजीसुद्धा बोलता येत नव्हते. आणि जे काही येत होते ते तो जर्मन ॲक्सेंटने

बोलल्याने समोरच्याला कळणे कठीण जाई. 'ट' या वर्णाक्षराचा उच्चार तो 'त' करायचा. 'मस्ट' ला 'मस्त' म्हणायचा. पण हा बाबा दुसऱ्या देशातून येऊन इथे स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय उत्तम प्रकारे करू शकला याचे एकमेव कारण 'क्रेडिट'. इथे मिळणारे क्रेडिट हे जादू घडवू शकते हे हॅन्सशी ओळख झाल्यावर मला अगदी ठामपणे पटले.

इथे अनेक देशांमधून लोक येतात. या सुवर्णनगरीत राहतात. भरभराट पावतात. चार्ली चॅप्लीनसारखा परफॉर्मिंग आर्टिस्ट किंवा पी. जी. वुडहाऊससारखा लेखक अमेरिकन सिटीझन का व्हावा? आपला देश सोडून या देशात स्थायिक व्हावे असे या थोर व्यक्तींना का वाटावे? इथे भरपूर पैसा आणि भरपूर प्रसिद्धी कुणाही गुणवंताला मिळते. कुठल्याही एका कलेत श्रेष्ठ असणारा माणूस या देशाचा असेल तर अमेरिकन जनता त्याला अक्षरश: डोक्यावर घेते. असे इतर कुठल्या देशात घडते बरे?

थोर रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की याने अमेरिकेवर 'द सिटी ऑफ यलो डेव्हील' नावाचे सुरेख पुस्तक लिहिले आहे. अवघ्या दीडशे पानांच्या या पुस्तकात गॉर्कीसारख्या श्रेष्ठ लेखकाने फ्री अमेरिकेबद्दल म्हटले आहे, 'हा फार इंटरेस्टिंग देश आहे.' आपले बरेच साहित्य गॉर्कीने अमेरिकेत विकले व प्रचंड पैसे कमावले. न्यूयॉर्कहून १९०६ मध्ये आपला मित्र एल. बी. क्रेझिन याला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो, 'इथे प्रत्येक गोष्ट डॉलरमध्ये मोजली जाते... इथे सारे इतके अमेरिकन आहे की, कुणीही कशासाठी थांबत नाही...मला खात्री आहे मला इथे खूप पैसे कमावता येतील आणि ते सर्वांत महत्त्वाचे आहे.' फ्रेंडस ऑफ रशियन पिपल' नावाची संस्था गॉर्कीने सोवियतांना न्याय व स्वातंत्र्य मिळवून देण्यास मदत करण्यासाठी अमेरिकेत स्थापली होती. त्या संदर्भात हे पत्र आहे.

अनेक भारतीयही या देशात येऊन सुखसमृद्धीचे जिणे जगतात. 'अमेरिका इज अ लँड ऑफ ऑपॉर्च्यूनिटीज' असे मला युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, रीव्हरसाईड या ठिकाणी स्टॅटिस्टिक्सचे प्रोफेसर असलेले डॉ.गोखले म्हणाले. गोखले पुण्याच्या फर्गसन कॉलेजात शिकले होते. इथल्या सगळ्या मराठी मंडळींबाबत एक गोष्ट जाणवली ती म्हणजे ही माणसे 'असीमित संधी' च्या या देशात येऊनसुद्धा पुन्हा चाकरमानीच राहिली होती. बिपिन नावाचा एक गुजराथी तरुण शिकण्यासाठी युनिव्हर्सिटीत ॲडमिशन घेऊन आला होता.

मी : काय पीएच. डी. करायचा विचार आहे का?

बिपिनभाई : छे. अमेरिकेसारख्या श्रीमंत देशात येऊन शिकत बसायचे? मग इंडियात काय वाईट?

मी : अरेच्चा! मग तू इथल्या विद्यापीठात कशासाठी शिकायला आला आहेस?

बिपिनभाई : ते आपले अमेरिकेत यायला निमित्त.

मी : मग काय करायचा विचार आहे?

बिपिनभाई : फास्ट फूड सेंटर काढणार. इथे धंदा करायला क्रेडिट लगेच मिळते. धंदा उत्तम चालतो.

मी : आणि दिवाळे निघाले तर? (ही मराठी विचारपद्धत हं.)

तो फारच गमतीने हसला. काय वेड्यासारखा प्रश्न विचारते आहे ही बाई? असा भाव त्याच्या चेहऱ्यावर होता.

इथे काही काळ राहिल्यावर लक्षात आले की, दिवाळे निघणे ही शरमेची गोष्ट कुणालाही वाटत नाही. उलट ती अभिमानाची आणि कौतुकाची बाब आहे. आपल्याला जे यश मिळते ते लायकीवर अवलंबून असते. पण इथे मिळणारे यश तुमची 'पत', तुमचे क्रेडिट किती यावर अवलंबून असते. आमच्याकडे दिवाळे निघणाऱ्याची गत काय विचारता? छोटा कारखानदार असो, कुणी मध्यम वर्गीय असो - दिवाळे निघाले म्हणजे तो अक्षरशः आयुष्यातून उठतो. समाजात त्याला स्थान राहात नाही. स्वतःच्या घरात तोंड दाखवायला जागा उरत नाही. इथे मात्र दिवाळे निघणे ही उद्योगपतींना किंवा उद्योजकांना एक सहज घडणारी नैसर्गिक क्रिया वाटते. 'बॅड डे.' एक दिवस जरा वाईट उगवतो एवढेच. त्याच्या सामाजिक स्थानावर त्याचा शून्य परिणाम होतो.

इथले सारे व्यवहार चालतात ते 'क्रेडिट कार्ड' या छोट्याशा जाड कागदाच्या तुकड्यावर. रोकड कुणी जवळ बाळगत नाही. 'कुणीही कधीही 'ड्रग्ज' साठी पिस्तूल वा चाकूचा धाक दाखवून ती तुमच्याकडून काढून घेऊ शकते.' असे उत्तर मला एका तरुणीने थंड सुरात दिले. त्यामुळे इथे सारे आर्थिक व्यवहार क्रेडिट कार्डावरच. ज्याची त्याची पत असेल त्याप्रमाणे प्रत्येकाकडे ठराविक रकमेचे क्रेडिट कार्ड असते. ही क्रेडिट कार्डे बँका, वित्त संस्था, मोठ्या निर्मिती संस्था इत्यादींची असतात. मी एक सुंदर चामडी मनीपर्स विकत घेतली. त्यात पैसे ठेवायला अरुंद छोटा कप्पा होता. तो भारतात आल्यावर इथल्या दहाच्या, शंभराच्या नोटांसाठी कुचकामी ठरला. त्या पर्समध्ये क्रेडिट कार्डे ठेवण्यासाठी मात्र दहा कप्पे होते. तेही भारतात

आल्यावर निकामी ठरले.

जी काही थोडी फार कॅश जवळ बाळगतात ती बँकेतून चोवीस तास कधीही काढता येते. बँकेचे व्यवहार कर्मचारी येऊन चालू असोत वा नसोत तुम्हाला पैसे काढायला प्रत्यवाय नाही. बँकेबाहेर एक पेटीवजा यंत्र असते. त्यात आपले बँकेचे कार्ड घालायचे. रकमेच्या आकड्यांची बटणे दाबायची. यंत्राचे एक छोटे झाकण उघडून तुमची कॅश बाहेर पडते. शिवाय यंत्रात ताबडतोब ऑर्डर येते. 'आज पुन्हा पैसे काढायचे आहेत का?' किंवा 'तुमच्या एकूण बॅलन्सची स्लीप तयार आहे ती घ्या.' आता आपल्याकडे अशी पद्धत मोठ्या शहरांतून सुरू झालीय म्हणे. पण मला तरी अजूनही बँकेत पैसे काढायला गेल्यावर पितळी शिक्क्यावरचा नंबर न्याहाळत लाकडी बाकावर कमीत कमी वीस मिनिटे बसावे लागते.

इतरांचे स्वातंत्र्य आणि खाजगीपणा जपणारा अमेरिकन नागरिक, जो पैसे काढत असेल त्याच्या मागे खेटून उभा राहाणार नाही. दहा पावले मागे उभा राहील. बाकीची रांग त्या दुसऱ्या माणसापासून सुरू होते.

बँक ऑफ अमेरिकेची इमारत फार छान होती. स्त्री-पुरुष कर्मचाऱ्यांचा पोषाख सारखाच होता. फिक्कट निळा शर्ट आणि डार्क नेव्ही ब्ल्यू रंगाची पँट. स्त्रिया त्या वेषात छान दिसत होत्या. पुन्हा प्रत्येकजण अगदी हसतमुख होता. भारतात मला बँकेत त्रासलेले चेहेरेच पाहायची सवय. बँक ऑफ महाराष्ट्रमधला कॅशियर माझ्या अंगावर खेकसला होता तेव्हा मी म्हटले,

मी : अहो, मी माझेच पैसे मागतीय. तुमचे नाही. खेकसू नका.

त्यावर तो काही तरी पुटपुटला. माझा संताप अनावर झाला.

मी : हे पहा, मला या क्षणापासून माझे तुमच्या बँकेचे खाते बंद करायचे आहे.

यावर मात्र तो कधी नव्हे ते हसला. तो हसताना मी प्रथमच पाहिला.

कॅशियर : बंद करायचं तर करा ना. तुम्हाला कुणी आडवलंय?

तो किंचितसा हसून निर्विकार सुरात म्हणाला.

अमेरिकेत सारा मामला वेगळाच. बँकवाले जणू वाटच पाहात असतात की, आपल्याकडे कर्ज मागायला कोण येतंय?

एकदा आम्ही मोठी फॅमिली टूर आखली. लॉस एन्जलीसजवळच्या रेडलँड नावाच्या शहरी राहाणारा माझा धाकटा भाऊ ज्या दिवशी प्रवासाला निघायचे त्याच दिवशी सकाळी आला. म्हणाला,

-ताई, एक अडचण आलीय. काल ऊर्मीच्या गाडीचा मोठा हप्ता भरावा लागला. त्यामुळे पैसे कमी पडतील. आपण असे करू, बँकेतून लोन घेऊ. येतेस माझ्याबरोबर?

कर्ज काढून सहलीला जायचे? 'ऋण काढून सण करायचा?' माझ्या मराठी मनाला पटेना.

-छे रे. एवढे कर्ज बिर्ज काढून मजा करायला जायचे काय नडले आहे? आपण जाणे रद्द करू या. जवळपास शहरातच फिरून येऊ, गंमत करू.

-नाही, नाही. एवढे ठरवलेय तर जाऊ या ना. चल. बाकीचे प्रवासाची तयारी करतील तोपर्यंत आपण बँकेत जाऊनसुद्धा येऊ.

कर्जासाठी अर्ज करायचा. तो मंजूर होणार, मग ते पैसे घेऊन प्रवासाला निघायचे म्हणजे नक्कीच बराच काळ जाणार अशी माझी धारणा. नाना प्रकारचे फॉर्म्स, सॅलरी सर्टिफिकेट, अमुक दाखला-तमुक दाखला, गॅरेंटर सारे सारे आले. फॉर्म नीट भरले नाहीत तर आठवड्याने ते अपुरे आहेत असा शेरा मारून क्लार्ककडे पडून राहाणार. आणखी आठवड्याने सांगणार की, आवश्यक ती सारी प्रमाणपत्रे तुम्ही दिलेली नाहीत. पुन्हा पुन्हा खेटे मारून पडेल चेहऱ्याने विचारायचे, 'साहेब, माझ्या कर्जाचे काय झाले?' तेव्हा इस्त्रीच्या चेहऱ्याचा साहेब सांगणार, 'फाईल अजून माझ्याकडे आलेली नाही तुमची.' हे सारे मला ठाऊक होते. त्यामुळे अत्यंत साशंक मनाने मी भावाबरोबर बँकेत जाण्यासाठी बाहेर पडले.

पार्क केलेल्या गाडीतच बसून मी रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्या अलिशान गाड्या, फ्लोरोसंट गुलाली, गुलाबी, पोपटी, जांभळ्या रंगाचे सनग्लासेस घातलेली मंडळी न्याहाळत होते. एकजण फक्त रंगीत चड्डी आणि रंगीत सनग्लासेस घालून रस्त्याकडेच्या हिरवळीत सनबाथ घेत चक्क उघडाबंब पडला होता. दोहो बाजूंनी गाड्या जात येत होत्या. मनात येईल ते करणे हा यांचा जन्मसिद्ध हक्क असल्याने त्याचे वागणे इथे विचित्रपणात मोडत नव्हते. ८/१० मिनिटांत भाऊ आनंदी चेहऱ्याने परतला.

-काय रे? काय झाले बँकेत?

-कर्ज मंजूर होऊन पैसे मिळाले. आता निघूया ॲरिझोनाला.

मी थक्क झाले. मी म्हटले,

-अरे बाबा, आपल्या बँकेत कर्ज देताना फक्त उठाबशा काढायच्या तेवढे बाकी ठेवतात. बाकी सारे करायला लावतात. हा कदाचित क्रेडिट कार्ड संस्कृतीमुळे

दिसणारा फरक असावा.

प्रवासात वाटेत पैसे संपले. चिंता नाही. आपले खाते असणाऱ्या बँकेची शाखा प्रत्येक शहरात असते. रात्री-अपरात्री जाऊन आपले कार्ड यंत्रात टाकून पैसे काढता येतात. खिशात पैसे असतील तरच खरेदीला जायचे. अंथरुण पाहून हातपाय पसरायचे हे तत्त्व कुणाही अमेरिकनाला पटणार नाही. जेवढी क्रेडिटकार्डं जवळ असतील तेवढ्या खरेद्या करता येतात. फ्रीज, वॉशिंग मशीन वगैरे वस्तू तर चक्क घरी न्यायच्या. हप्ता वर्षभराने सुरू होतो. वाहव्वा! मला आवडलीच ही पद्धत.

जगातले साऱ्या पद्धतींचे भोजन इथे उपलब्ध. इटालियन, फ्रेंच, मेक्सिकन, चिनी, थाई... फक्त रशियन भोजनाचे हॉटेल काही मला दिसले नाही. कम्युनिस्ट हा शब्द इथे फारच वाईट समजला जातो. या भोजनगृहातही सारीकडे क्रेडिट कार्ड पद्धती. टीप फक्त रोकड द्यायची.

पेट्रोल पंपावर क्रेडिट कार्ड चालते. हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी क्रेडिटकार्ड चालते. म्हणजे बहुतेक सगळी मानवी जीवनातली देवाणघेवाण क्रेडिट कार्डावर चालते.

मी जेन नावाच्या मेडिकल सोशल वर्करचे काम करणाऱ्या मैत्रिणीला म्हणाले, 'इथले आयुष्य किती सुरक्षित आहे. तुमची बँकेत किंवा समाजात पत किती यावर तुमचे जीवन सुरळीतपणे चालू शकते.'

जेन - भ्रम आहे तुझा. इथे कुठल्याच गोष्टीची सुरक्षितता नाही. एका रात्रीत माणूस कफल्लक होऊ शकतो. वीस वर्षे एका कंपनीत काम करणारा माझा नवरा एके दिवशी सरळ कामावरून कमी केला गेला. युद्धकाळी लागणाऱ्या विमानातल्या कंपनीत तो इंजिनिअर होता. युद्धच नाही म्हणून कंपनी गाळात जायला लागल्यावर मॅनेजमेंटने माणसे कमी केली. त्याचा जॉब स्पेशलाईज्ड आहे. त्यामुळे इतरत्र जॉब नाही. गेली चार वर्षे तो बेकार आहे.

मी : पण आधी नोटीस दिली असेल ना? आणि पेन्शन?

जेन : उद्यापासून तुम्ही कामावर येण्याची गरज नाही एवढेच इथे सांगितले जाते. आणि ते कधीही कुणालाही सांगितले जाऊ शकते.

मी अमेरिका सोडताना शेवटच्या काही महिन्यांत आखाती युद्ध सुरू होण्याची चिन्हे दिसू लागली. प्रेसिडेन्ट बुशने आखातात सैन्य, डॉक्टर्स, नर्सेस पाठविल्या. लढाऊ विमाने, जहाजे, शस्त्रास्त्रे जाऊ लागली. हे सारे टी. व्ही. वर पाहाताना मनात आले-जेनच्या नवऱ्याला पुन्हा नोकरीवर घेतले असेल.

❖❖❖

# गराज सेल

चोरबाजार ही एक मोठी आकर्षक गोष्ट असते. अनेक चकित करून सोडणाऱ्या गोष्टी तिथे पाहायला मिळतात. मनाच्या कोपऱ्यात काही वस्तू खरेदी करण्याची आपली हौस वर्षानुवर्षे निपचित पडून असते. काही वेळा वस्तू दुर्मिळ असते म्हणून घेणे शक्य नसते, तर काही वेळा त्या वस्तूची किंमत अवाढव्य आहे, आपल्या आवाक्यातली नाही या निराश विचारापोटी आपण आपली हौस अशी खोल मनात गाडून टाकलेली असते.

सपाटे यांच्या घरी मी हातात पणत्या घेतलेल्या यक्षिणींच्या दोन पितळी अत्यंत रेखीव सुबक मूर्ती अनेक वर्षे पाहात होते. जेव्हा स्वतःचा संसार थाटून घर सजवले तेव्हा त्या सुमारे दीड ते दोन फूट उंचीच्या देखण्या मूर्ती मला फार तीव्रतेने आठवल्या. मनातून जाईचनात. त्यांच्याशिवाय घराची सजावट अपूर्ण वाटायला लागली. शेवटी मनाचा हिय्या करून सपाटेंकडे त्या मूर्ती मागायच्या ठरवून त्यांच्याकडे गेले. तेव्हा कळले की, ते शहर सोडून गाशा गुंडाळून निघून गेले आहेत. माझ्या मनातून त्या मूर्ती काही जात नव्हत्या. अनेक एम्पोरिअम्स, पितळी मूर्तींची दुकाने धुंडाळली. मिळाल्या नाहीत. एका केरळच्या हस्तकला दुकानात साधारण तशा मूर्ती एकदा दिसल्या. पण किंमत अक्षरशः आईबापांची. परवडावे कसे? आणि पुढे अचानक तशाच मूर्ती मला कोल्हापूरला चोरबाजारात मिळाल्या. आणि किंमत चक्क वजनावरच केली त्या जुनेपुराणेवाल्याने. मूर्तीचे वजन अमूक किलो. किलोचा भाव एवढा, मूर्तीची किंमत तमूक. वाहव्वा. मी आनंदाने ताबडतोब त्या मूर्ती विकत घेऊन टाकल्या.

अमेरिकेत आपल्यासारखे चोरबाजार नाहीत. पण त्यांचे भावंड शोभावे असा एक प्रकार दिसला. गराज सेल. प्रत्येक अमेरिकन मिळालेले पैसे संपवण्यासाठी

सतत खरेदी करत असतो. मानवाच्या मूलभूत गरजा फार कमी आहेत म्हणून अनावश्यक गोष्टींचा संचय करू नका हे 'मितव्यय' या आपल्या निबंधात थोर अमेरिकन विचारवंत 'हेन्री डेव्हिड थोरो' ने सांगितले आहे. ते जरी या मंडळींना फारसे पटत नसले, तरी त्यातले सत्य निखालस आहे. त्यामुळे अमेरिकनांच्या बहुतेक खरेद्या अनावश्यक वस्तूंच्याच होतात. जीवनोपयोगी नसलेल्या वस्तू घरात वाढतात. मग त्या गॅरेजमध्ये साठवल्या जातात. गॅरेजेस खचाखच भरून जातात. त्यामुळे कुणीही अमेरिकन शहाणा आपली गाडी गॅरेजमध्ये कधीच ठेवीत नाही. तो ती रस्त्यावरच पार्क करतो. गॅरेज भरते, पण खरेद्या चालूच राहातात. मग नव्याने खरीदलेल्या वस्तू ठेवायला जागा उरत नाही. यावर कल्पक अमेरिकनांनी ताबडतोब उत्तम शक्कल काढली. 'गराज सेल!' येथे 'गरज' नव्हे तर, 'गॅरेज' ही शोधाची जननी दिसते.

गॅरेजमध्ये जास्त वस्तू साठल्या की एखाद्या शनिवारी वा रविवारी त्याचा सेल लावायचा. म्हणजे नेमके काय करायचे, तर जवळच्याच हमरस्त्यावरच्या झाडांवर पुठ्ठ्यावर लिहिलेले बोर्ड स्टॅपलरने पिना मारून लावून टाकायचे. त्यावर घराचा लहानसा पत्ता. उदा. १०९ फोर्ड स्ट्रीट. कोणत्या दिवशी किती वाजता सेल आहे ते लिहायचे. त्यावर एक महत्त्वाची सूचनाही असते. 'नो अर्ली बर्डस्!' उत्साहाने सकाळी लवकर उठवायला येऊ नका. सेल संपल्यावर स्वतः जाऊन हे बोर्ड काढून आणणारे शिस्तप्रिय अमेरिकन पाहून कौतुक वाटते. या गराज सेलचे तीन प्रकार आहेत.

(१) प्रत्यक्ष गॅरेजमध्ये सामान किंमतीसह मांडून ठेवणे, हा गॅरेज सेल.


(२) यार्डमध्ये गॅरेजमधले सामान आणून पसरून ठेवणे व त्यावर किंमती लिहिणे हा यार्डसेल.

(३) शहर सोडून जाताना गॅरेजमधल्या वस्तूंसह घरातल्या वस्तूंचाही सेल लावणे, हा मुव्हिंग सेल.

आसक्ती, ममत्व हे प्रकार इथे अस्तित्वातच नाहीत. कधीतरी उपयोगी येईल म्हणून चिंधीसुद्धा जपणाऱ्या माझ्या भारतीय मनाला फार आश्चर्य वाटले. ही मंडळी सगळे सगळे निर्विकारपणे विकतात कशी? आपल्या प्रत्येकाच्या घरी किती तरी अनावश्यक वस्तू असतात. जुने फर्निचर विकायचे तर आधी ते विकत घेणाऱ्या कुणाला शोधून दादा-बाबा करून घरी बोलवायचे. त्याला 'टायम' भेटेल तेव्हा तो येणार. खूप घासाघीस करून रक्कम ठरवून सामान न्यायला गाडी घेऊन

येतो म्हणून तो निघून जाणार, ते चार दिवसांनी उगवणार. तोपर्यंत आपण भयंकर अस्वस्थ. पूर्वी आई जुने कपडे बोहारणीला द्यायची. जुनेपुराणे घ्यायला जुनेपुराणेवाला यायचा. ही संस्थाही आता नाहीशी होत चालली आहे. पुन्हा त्या जुन्या झालेल्या वस्तू विकण्याची व्यवस्था. घरात नको असलेले पण उत्तम स्थितीतलेही सामान असते. त्यासाठी आपल्याकडेही हा गराज सेल फार उपयोगी ठरेल.

गराज सेलचा अनावश्यक वस्तू विकून गॅरेजमध्ये पुन्हा खरेदी करावयाच्या अनावश्यक वस्तूंसाठी जागा करणे हा एकमेव हेतू नाही. सोशलायझींग हा दुसरा एक महत्त्वाचा हेतू त्यामागे आहे. एखाद्या कुटुंबाने गॅरेज सेल लावला की, ते आपल्या सगळ्या मित्र-मैत्रिणींना, निकटवर्तीयांना फोन करून आमंत्रण देतात. तिसरा हेतू मनोरंजन. सर्वांत कमी महत्त्वाचा शेवटचा आणि चौथा भाग असतो तो म्हणजे या सेलपासून होणाऱ्या उत्पन्नाचा. फार फायदा मिळावा वगैरे अपेक्षा नसतेच. त्या दिवशी सकाळपासून घरात धामधूम. सारे सामान मांडायचे. त्याच्यावर किंमतीच्या चिठ्ठ्या लावायच्या आणि मग बिअर पीत आरामखुर्च्या टाकून येणाऱ्या मंडळींची वाट पाहात बसायचे.



## अनावश्यक वस्तूंची विक्री

हळूहळू घराबाहेर गाड्यांच्या रांगा लागतात. बोलावलेले लोक येतात. काही मंडळी रस्त्यावर लावलेल्या पाट्या वाचून येतात. खोक्यात भरून ठेवलेली पुस्तके

कुणी चाळत बसतो. लहान मुलांच्या खेळण्यांकडे पोरे धाव घेतात. बायका क्रोकरी पाहातात. पुरुष मंडळी गाडी दुरुस्तीचे सामान, फर्निचर, लॅम्प पाहातात. थोडी घासाघीस होते. फार ताणून न धरता मालक आनंदाने ती वस्तू देऊन टाकतो. जुन्या भल्या मोठ्या अमेरिकन मेकच्या गाड्यांमधून मेक्सिकन कुटुंबे गराज सेल पाहायला येतात. ही कुटुंबे जास्त करून कपडे आणि बूट विकत घेतात. या गराज सेलमध्ये ढिगाने कपडे विकायला असतात. एक नूर आदमी तर दस नूर कपडा या हिशेबाने अमेरिकन कपडे विकत घेत असले पाहिजेत ! स्त्री-पुरुष आणि मुलांचे निदान शंभर तरी कपडे एका घरात गराज सेलमध्ये किमान असतातच. आम्ही अशा गराज सेलमधून जमिनीपासून सीलिंगपर्यंत उभा करता येणारा स्टॅण्डिग लॅम्प आणला. साधारण १४-१५ फूट उंचीचा होता. सोनेरी मुलामा लावलेल्या त्या लॅम्पला काचेची गुलाबी रंगाची मोठी तीन फुले वेगवेगळ्या अंतरावर होती. आत बल्ब बसवण्याची जागा होती. मोठी छान वस्तू होती. अवघा बारा डॉलर्सना मिळाला. तोही नवा कोरा पॅकिंगसकट. दुकानात याची किंमत ५४ डॉलर्स होती.

या गॅरेज सेलमध्ये बऱ्याचदा पॅकिंग न उघडलेल्या वस्तूही विकायला ठेवलेल्या पाहून मला आश्चर्य वाटायचे.

हा गराज सेल फार कमी कालावधीसाठी असतो. साधारणतः सकाळी ८-३० ते १०-३० वाजेपर्यंत किंवा १० ते १२ वाजेपर्यंत असा अवघा दोन तासांचा सारा मामला. मग पुन्हा उरलेल्या वस्तू गॅरेजमध्ये जातात. गराज सेलमध्ये गोळा झालेली कॅश संध्याकाळी कशी खर्च करायची हेही लगेच ठरून जाते. आणि गराज सेल संपला की, आनंदाने सगळे पुन्हा खरेदी करून गॅरेजमध्ये मोकळी झालेली जागा भरायच्याच उद्योगाला लागतात. बहुतेक प्रत्येक अमेरिकन कुटुंब अशा प्रकारचा गराज सेल अत्यंत निष्ठेने वर्षानुवर्षे करत असते.

मी एकदा गप्पा मारताना कॉकेशिअन अमेरिकन जॅकला विचारले, 'तुम्ही मंडळी रोज जाऊन सारखे काहीतरी खरेदी करून का आणत असता?'

त्याने माझ्याकडे खूप आश्चर्याने पाहिले.

'तू काय म्हणालीस स्वीटी?' (स्त्रियांशी बोलताना हल्ली 'स्वीटी' कम्पलसरी म्हणण्याचा रिवाज आहे मग ती ९० वर्षांची असो किंवा नऊ).

मी पुन्हा विचारले, 'तुम्ही अमेरिकन लोक सारखी खरेदी का करत असता? आणि तीही विनाकारण?'

तो काही क्षण थोडा गोंधळला. थोडासा विचार करून त्याने ताडकन् सांगितले, 'गराज सेल करण्यासाठी!'

❖❖❖

# असे जिणे यांत्रिकवाणे

राहावे कसे ? यावर थोर अमेरिकन विचारवंत हेन्री डेव्हीड थोरो याने भाष्य केले आहे. तो म्हणतो, 'त्रिवार साधेपणा हवा. माझे म्हणणे असे की, तुमच्या चीजवस्तू व व्यवहार दोन किंवा तीन असू देत. पण त्या हजार किंवा शंभर असू नयेत. दहा लाखांऐवजी सहाच मोजा, आपले हिशेब हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच ठेवा.' थोरोने धोक्याची सूचनाही दिली आहे आणि स्पष्टपणे भाकित केले आहे की –

'छानछोकीपणा, विलास आणि अविचार ह्यांच्यापायी केलेल्या खर्चामुळे कोणत्याही तऱ्हेचा हिशोबीपणा न राखल्यामुळे, तसेच कोणतेही महान उद्दिष्ट पुढे नसल्यामुळे देशातल्या लक्षावधी कुटुंबांप्रमाणेच राष्ट्राचीही धूळधाण झाली आहे.'

पण साधी रहाणी अथवा चीजवस्तू व व्यवहार दोन किंवा तीन असणे अमेरिकन माणसाला अजिबात पसंत नसावे. प्रत्येक वस्तू महागडी आणि यांत्रिक असावी यावर त्याचा कटाक्ष असतो. एका चीजवस्तूऐवजी किंवा व्यवहाराऐवजी अनेक चीजवस्तू आवश्यकता न पाहाता बाळगणे हा त्यांचा स्थायीभाव.

अनेक अनावश्यक वस्तू अमेरिकन माणसाच्या स्वयंपाकघरात आणि गॅरेजमध्ये ठेवलेल्या दिसतात. गॅरेज तर खरेदी करून आणलेल्या शेकडो अनावश्यक वस्तू ठेवण्यासाठीच इथे मुख्यत: वापरले जाते. कुणीही हाडाचा अमेरिकन आपली गाडी गॅरेजमध्ये ठेवण्याचा वेडेपणा करून उच्च परंपरेला बाध आणीत नाही. अनेक महागड्या आणि यांत्रिक वस्तू गॅरेजमध्ये खच्चून भरलेल्या असतात, गाडी मात्र रस्त्यावरच दवात, धुक्यात, बर्फात उभी असते. बऱ्याचजणांच्या गॅरेजमध्ये गाडीऐवजी बोट उभी असते. पण गाडी मात्र बाहेर रस्त्यावरच उभी करणे प्रत्येकाला आवडते.

गॅरेजमध्ये वापरात न येणारे अनावश्यक सामान ठेवण्याची पद्धत आहे तर घरात व विशेषत: स्वयंपाकघरात सटीसहामासी क्वचित कधी वापरात येणारे अनावश्यक सामान ठेवण्याची प्रथा आहे.

अमेरिकनांचे घर पाहाल, तर लक्षात येते की एकूणच इथे प्रत्येकजण नबाबी ऐटीत राहातो. अत्यंत आधुनिक आणि अत्यंत श्रीमंत रहाणी म्हणजे काय असे कुणी विचारले, तर अमेरिकन घर दाखवायला हरकत नाही.

यांच्या घरात कुठली सुखसोय नाही? शिवाय आहेत त्या साऱ्या सुखसोयी यांत्रिक. ही मंडळी एकूणच फार गॅजेटमाईंडेड आहेत. आणि इथल्या उपकरणांचा एक वैशिष्ट्यपूर्ण गुण म्हणजे इथली यांत्रिक उपकरणे व्यवस्थित सुरू होऊन योग्य ते काम देतात. मला हे कौतुकास्पद वाटले. कारण आपल्याकडे मिक्सरचे बटण दाबले, की चित्रविचित्र घाईघुईयो असे आवाज येतात. पाती फिरतात. पण मिक्सरमध्ये वाटणासाठी घातलेले पदार्थ तसेच. पंखा सुरू केला की गार हवेची वाट पाहात थांबावे तर पंख्याची पाती पुतळ्यासारखी स्तब्ध उभी राहातात. मग बोटाने, पेन्सिलने किंवा पेनने काही काळ पाते जोरजोरात फिरवायचे. मग तो टेबलफॅन कुचकुचत सुरू होतो. इलेक्ट्रिक शेगडी अन्न शिजवण्यापेक्षा शॉक बसण्यासाठी जास्त उपयोगी पडते. गिझरमधून उन्हाळ्यात गरम आणि थंडीत थंडगार पाणी येते, असे पाहाण्याची मला लहानपणापासून सवय. पण इथे सारा मामला वेगळाच. एक सेंट यंत्रात टाकला की च्युईंगमच्या गोळ्या खरोखरच बाहेर येतात. शीतपेयाच्या यंत्रात पैसे टाकले की हवे तेच पेय बाहेर येते. कुठल्याही यंत्राचे बटण दाबले की ते अगदी सुरू व्हायची वाटच पाहात असल्यासारखे तत्परतेने सुरू होते.

गॅजेटमाईंडेड अमेरिकन मंडळी बिनगिअरच्या ॲटोमॅटिक गाडीमधून घरात अलिबाबासारखा प्रवेश करतात. गाडी घरापाशी आली की गाडीतली कळ दाबायची. तिळा दार उघड. की घराच्या दर्शनी भाग असलेल्या गराजचे दार आपोआप उघडले जाते. हळूहळू ते दार व्यवस्थितपणे वर गेले की गाडी आत शिरते. दार उघडले की आपोआप गराजमधले दिवेही लागतात. गाडी आत लावली की, उतरण्यापूर्वी पुन्हा गाडीतली ड्रायव्हरच्या आरशापासली कळ दाबायची. गराजचे दार आपोआप पुन्हा बंद होते. त्याबरोबर दिवेही बंद होतात. काही अमेरिकन अजूनही आपल्या गाड्या गॅरेजमध्ये ठेवतात ते या अशा पद्धतीने.

गॅरेजमधून घरात जायला दार असते. तिथून आत शिरल्यावर घर पाहून थक्क व्हायला होते. अमेरिकन स्वयंपाकघरात म्हणाल ती सोय आहे. मायक्रोवेव्ह

कुकींग कपाट. त्यात चहाच्या पुड्या, पाणी. साखर घालून सहा कप ठेवा व बटन दाबा. दोन मिनिटांत वाफाळलेला चहा. कॉफीमेकर सुरूच असतो. दिवसभर हवी तेव्हा स्वादिष्ट फिल्टर कॉफी. कॉफीच्या बिया दळायला मशिन, फ्रीज, कोल्ड स्टोअरेज ही सारी मोठी यंत्रे पण. पत्र्याचा डबा उघडायलासुद्धा यांना मशिन लागते, बाटलीचे बूच उघडायला मशिन, ज्यूस काढायला मशिन, पुन्हा एक कामासाठी एक मशिन अमेरिकनांना चालत नाही. जेवण करायला मायक्रोवेव्ह असेल तरी पुन्हा कुकींग रेंज असतेच आणि शिवाय इलेक्ट्रिक कुकरही असतो. अडायला नको.

आम्हाला खूप आग्रहाने शँडलर कुटुंबाने जेवायला बोलावले. सारे जेवण पत्र्याच्या बंद डब्यात किंवा कार्टनमध्ये तयारच विकत आणले होते. बाईंनी डबे इलेक्ट्रीक टीन कटरने उघडले. कार्टन फोडली. ज्या थाळीत जेवायचे त्याच थाळीत वाढून घेऊन मायक्रोवेव्हमध्ये गरम केले. झाले यांचे जेवण तयार. पुन्हा फार माणसे आहेत, तर भांडी धुवायची कटकट नको म्हणून जेवण कागदाच्या थाळीत. पेय कागदी पेल्यातून. जेवण झाले की ताट, पेले गोळा करून आमचे आम्हीच कचऱ्यात टाकायचे. जेवल्यावर तोंडभर हसून म्हटले, 'फूड वॉज लव्हली.' आणि ते ऐकून शँडलरबाईही विनयाने म्हणाल्या, 'ओ ऽ ऽ थँक्यू.' जेवणासाठी कुठलेही कष्ट न घेता पाहुण्यांकडून धन्यवाद घेण्याचे या स्त्रियांचे कसब मला कौतुकास्पद वाटले.

कचरा हा प्रकारही खूप इंटरेस्टींग आहे. दिवसभरात साठणाऱ्या डझनभर बाटल्या, दीड डझन पत्र्याचे छोटे डबे, दुधाचे कॅन, ज्यूसच्या बाटल्या, बटरचे जार, तांदूळ व पिठाच्या सुंदर कापडी पिशव्या आणि मीठ-मसाल्यांचे मोकळे शेकर, आईस्क्रीमचे जार, फ्रान्सहून येणाऱ्या दह्याचे आकर्षक प्लॅस्टिकचे रंगीत चित्रांचे डबे, सारे मोकळे झाले की तो कचरा. रोजचा पेपर १२८ पानांचा. तोही वाचून झाला की कचरा. रद्दी म्हणून विकता येत नाही. वाण्याकडच्या पुड्यांचा दोरासुद्धा उपयोगी पडतो म्हणून जपून गुंडाळून ठेवणाऱ्या भारतीय मनाला हे कसे हो रुचावे? त्याला गार्बेज म्हणायचे तर हे गार्बेज टाकायला चार फूट उंचीची बादलीच्या आकाराचे खाली चाके असलेले प्लॅस्टिकचे जाड डबे प्रत्येकाच्या घरी. घरातले गार्बेज टाकायला काळा डबा व बागेतले गार्बेज टाकायला हिरवा डबा. पॉलिथिनच्या सुंदर गार्बेज बॅगमध्ये रोजचे गार्बेज गोळा करायचे आणि गार्बेज कॅनमध्ये टाकायचे. एक गार्बेज-डे असतो. त्या दिवशी प्रत्येकाने आपापले गार्बेज कॅन रस्त्यावर नेऊन ठेवायचे. एक मोठी गाडी येते. घरासमोर थांबते. एक प्रचंड यांत्रिक हात बाहेर येतो. कॅन उचलतो. गाडीमागे ट्रॉलर असतो. त्याच्या एका तोंडात काळा कॅन रिता होतो.

दुसऱ्या तोंडात हिरवा.

एके दिवशी आम्ही कॅन घराबाहेर ठेवायला विसरलो तर नंतर शहरभर आमच्या होंडा ॲकॉर्ड गाडीत कचरा भरून फिरावे लागले. खूप टेन्शन निर्माण झाले. अख्ख्या शहराचा कचरा गोळा करून झालेला होता. त्यामुळे दुसऱ्याच्या घरासमोर कचरा ठेवण्याचा प्रश्नच नव्हता. शेवटी तो कचरा पॉलिथीनच्या पोतेवजा पिशव्यांत भरून आम्ही शेजारच्या शहरात गार्बेज डे होता तिथे नेऊन ठेवला. वेळेत न केलेल्या गोष्टीसाठी इथे एवढे रामायण घडते.

आम्ही भारतीय बायका मात्र आमचे आयुष्य एवढे निरस आणि यांत्रिकी मुळीच बनवत नाही. आमच्या बाईने कचरा टाकला नाही म्हणून तिला रागावणे, फ्लॅटमध्ये कचरेवाला आला नाही म्हणून बोंबाबोंब करणे किंवा बंगल्यासमोर कचराकुंडी असल्याने प्रत्येक कचरा टाकायला येणाऱ्याला शिव्या घालणे ही सारी एक्साईटमेंट या बिचाऱ्यांनी घालवली आहे.

आमचा स्वयंपाक अत्यंत घटनाप्रधान असतो. आमचे स्वयंपाकघर फार सुसज्ज असते. गॅस गेला तर म्हणून किंवा गॅस वाचवायला आम्ही स्टोव्ह वापरतो. वीज गेली तर वाटण्याची अडचण नको, म्हणून मिक्सरच्या जोडीला आम्ही पाटावरवंटाही ठेवतो. यंत्रयुग व अश्मयुग आमच्या स्वयंपाक घरात हातात हात घालून वावरते. आमच्या स्वयंपाकाला अनेक वैचित्र्यपूर्ण आकारांची भांडी आवश्यक असतात. त्यामुळे स्वयंपाक करणे कंटाळवाणे न होता एक रंजक प्रक्रिया होते, अमेरिकन बायांच्या हे लक्षात येत नाही.

हे झाले घरच्या गृहिणीच्या सोयीविषयी. एकूण घरात गरम होणे व थंड होणे या दोन्ही क्रिया असणारी व्यवस्था असते. फायरप्लेस आणि धुरांडे डेकोरेशन म्हणून प्रत्येक घरात ठेवण्याची इथे स्टाईल आहे.

रेडिओला अलार्म असतो, घड्याळही असते. सकाळी सहाच्या बातम्यांचा अलार्म लावून बातमीप्रिय अमेरिकन गुबगुबीत कम्फर्ट (रजईवजा) पांघरुणात झोपी जातो. थंडीत हीटरने घर गरम राहाते तर उन्हाळ्यात थंड एअर कंडिशनरने. रात्री उठावे लागले तर इलेक्ट्रीसिटीवर चार्ज होणारी बॅटरी भिंतीवर होल्डरला प्रत्येक खोलीत अडकवून ठेवलेली असते. टेलिफोनला आन्सरिंग मशीन असते. तुम्ही घरात नसलात तरी अडत नाही. आन्सरिंग मशीन सांगते की, तुम्ही घरात नाही. तेव्हा आपला निरोप व टेलिफोन नंबर सांगा. तुम्ही घरी आल्यावर बटन दाबले की, निरोप मिळतो. फोन केलेल्या व्यक्तीचे बोलणे रेकॉर्ड झालेले असते.

बाहेरगावी जायचे असेल तर बर्गलर अलार्म सिस्टीम घरात असतेच. म्हणजे यदाकदाचित चोर आलाच तर जोरात सगळ्या घंटा वाजू लागतात. शिवाय चोराला ठकवायलाही गॅजेटस आहेत. दोन दिवस बाहेर गेलात तरी चिंता नाही. ॲटोमॅटिक सिस्टीमने ठराविक वेळी सगळ्या घरातले दिवे चालू होतात. ठराविक वेळी बंद होतात. चोराला वाटते, घरात सगळी मंडळी आहेत. गाडी चोरीला जाऊ नये म्हणून गाडीतही बर्गलर अलार्म सिस्टीम असते. गाडी बंद करून पार्क करून तुम्ही कार्यालयात किंवा शॉपिंगला गेलात आणि तुमची गाडी चोरायचा कुणा चोराला मोह झाला आणि त्याने गाडी उघडायचा प्रयत्न केलाच तर प्रचंड आवाजात भोंगा ओरडू लागतो.

एकूणच अमेरिकन माणूस गॅजेटमाईंडेड आहे. लॉटरीच्यावरचा नंबर स्क्रॅप करायला १ डॉलरच्या तिकिटाबरोबर तो ५० सेंटचा ॲटोमॅटीक स्क्रॅपर घेतो. साधी औषधे तीनवेळा घ्यायची तर तो डिजीटल डबी गोळ्यांसाठी वापरतो. त्यात डबीच्या ३ कप्प्यांत सकाळी-दुपारी-संध्याकाळी घ्यायच्या गोळ्या असतात. बिपर वाजून त्या वेळेला गोळ्या घेण्याची डिजीटल डबी आठवण करते. नेमका कप्पा त्या वाजण्याच्या सुमारास उघडून त्यावेळच्या गोळ्या घेता येतात. एकदा आमच्या काकूने डायबिटीसची गोळी घेतलेली विसरून पुन्हा घेतली आणि तिची शुगर एकदम खाली गेली होती. अन् आमच्या तोंडचे पाणी पळाले होते. आमच्या देशात अशा सोयी हव्या.

सर्व सुखसोयी या यांत्रिक देशात तुमच्या दाराशी असतात. सर्व सेवा उपलब्ध. सर्व्हिस इंडस्ट्री. जेवण करायचा कंटाळा आला तर 'सिझर्स पिझा'ला फोन करायचा. थोड्याच वेळात दारात गाडी आणि हातात पिझाची बॉक्स असलेला माणूस हसतमुखाने दरवाज्यात बेल दाबत उभा. कुणी आजारी असेल तर फुलांचा गुच्छ नेऊन देण्याची सर्व्हिस उपलब्ध. लवकर बरे व्हा किंवा तत्सम वाक्य लिहून फुलांची परडी पेशंटकडे. तुम्हाला वेळ घालवायला नको. तुम्ही दुःखी आहात तर सांत्वनासाठी सायकीॲट्रिस्टला बोलवा. औषध उपचार व त्यासाठी असणाऱ्या सेवा इत्यादींसाठी मेडिकल सोशल वर्कर असतो. घर बदलायचे तर सर्व सेवा उपलब्ध. त्यांच्या आयुष्यात मला काही त्रुटी आढळल्या. त्यावर चौकशी करता मला कळले की, काही महत्त्वाच्या बाबींवर संशोधन चालू आहे.

(१) घराला, गाडीला किंवा पर्सला बर्गलर अलार्म लावण्याऐवजी जर चोरासाठीच बर्गलर अलार्म शोधून काढला तर हा चोर आहे हे अलार्म वाजल्यावर

सगळ्यांना कळेल.

(२) बटन दाबले की घरातला कचरा नाहीसा व्हायला हवा. तो गार्बेज बॅगमध्ये गोळा करणे, ती बॅग गार्बेज कॅनमध्ये टाकणे, ते कॅन ठराविक वारी लक्षात ठेवून दरादरा रस्त्यावर ओढत नेणे आणि एखादे वेळेस ते नेण्याचे विसरले तर प्रचंड टेन्शन घेणे वाचेल.

(३) समोरचे जेवण यंत्राने तोंडात गेले तर इतर गोष्टींसाठी हात मोकळे राहातील.

(४) हँडल ओढल्याबरोबर सर्व घरास कड्या-कुलपे लागली पाहिजेत.

(५) तसेच ज्या अनेक प्रकारच्या सेवा उपलब्ध आहेत, त्यात फोन करून अमूक एखाद्याच्या प्रेमात पडण्याची व्यवस्था करून देण्याची सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

(६) उत्तम साहित्य व कलांचा आस्वाद तुमच्यासाठी कॅपसूल फॉर्ममध्ये देण्याची सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(७) अमेरिकन जीवनपद्धती अंगी बाणवण्याचा सुलभ मार्ग तयार करून ताबडतोब अमेरिकन माईंडेड कसे व्हावयाचे याची सेवा उपलब्ध होत आहे.

काही झाले तरी युनायटेड स्टेट्स हे राष्ट्र अत्यंत नेत्रदीपक अशा तांत्रिक संशोधनासाठी प्रसिद्ध आहेच. तेव्हा हे शोध लावणे त्यांना कठीण नाही.

❖❖❖

ग्रंथ संग्रहालय
शाखा
२८८११

# प्रधान अर्थ

'अमेरिकेत स्वस्ताई आहे की महागाई?' असा प्रश्न भारतात परत आल्यावर मला अनेकांनी विचारला. मी गंभीरपणे उत्तर दिले, 'फार महागाई आहे.'

'कमाल आहे. मी तर ऐकले की सगळे स्वस्त मिळते तिथे; मग महागाई कशी?' काही माहितगारांनी मला प्रतिसवाल केला.

'तुम्ही ऐकले ते चुकीचे आहे असे नव्हे. तिथे प्रत्येक वस्तूंच्या किंमती फार नाहीत. पण जवळचे पैसे संपेपर्यंत तिथे तुम्हाला दिसणारी प्रत्येक गोष्ट विकत घेत राहावीशी वाटते.'

खरेदीसाठी अमेरिकनांनी मॉल नावाची यंत्रणा शोधून काढली आहे. मॉल कुणाही माणसाला मोहात पाडणारा भूलभूलय्याच आहे. हा मॉल शब्द यांनी कुठून आणि कशासाठी घेतला असावा? भारतात सिमल्याला प्रसिद्ध असा 'माल रोड' आहे. माल म्हणजे मार्केट प्लेस किंवा बाजार असा अर्थ असावा. हा शब्द मूळ ब्रिटिशांचा असणार. अमेरिकनांनी तो उचलला असावा.

या 'मॉल' मध्ये आकाराने प्रचंड आणि आकाराने मध्यम अशा दोन प्रकारची अतिशय आकर्षकरीत्या सजवलेली आणि भरपूर मालाने भरलेली सुमारे २०० ते ३०० दुकाने असतात. इथे चेन स्टोअर्स हे प्रकरण खूप. एकाच कंपनीची संपूर्ण देशभर एकाच पद्धतीची, एकाच नावाची हजारो दुकाने. प्रत्येक लहान शहरातही त्यांची शाखा. अशी जे. सी. पेनी, सिअर्स वगैरे ३ मजली दुकानेही या मॉलमध्ये असतात. सगळा मॉल हिंडायचा म्हटला तर एक दिवसही पुरत नाही. पेंटिंगचे सुरेख दुकान. त्यात जगभरच्या प्रसिद्ध चित्रकारांच्या चित्रांचे प्रिंट व उत्तम फ्रेम होत्या. कॉस्मॅटीक्स बहुधा ड्रग स्टोअर्समध्येच मिळतात. 'मदर' नावाचे केवळ गरोदर

स्त्रियांसाठी सर्व कपडे व वस्तू उपलब्ध असणारे भव्य दुकान. लहान पोरांसाठी दुकान. डिस्नेवाल्यांचे प्रचंड आकाराची खेळणी असलेले दुकान. हजारो प्रकारच्या चाकू-सुऱ्यांचे दुकान, पादत्राणांची दुकाने, व्ही. डी. ओ. कॅसेट्स, म्युझिकची दुकाने, किचन वेअर्स, दागिन्यांची दुकाने, आणि सर्वांत जास्त कपड्यांची दुकाने. इतक्या सगळ्या दुकानांत पुस्तकांचे एकच दुकान. इथले मॉल पाहून वाटले मानवी जीवनात सर्वांत जास्त महत्त्व कपड्यांना आहे की अन्नाला ? शिवाय या मॉलमध्ये बसण्यासाठी छान बाक आहेत. बागेत बसावे तसे काही वृद्ध आणि वृद्धा (त्यांना सिनियर सिटिझन्स म्हणायचे) मजेत वृत्तपत्र वाचत त्या बाकांवर वेळ घालवत होते. इथे फक्त वृद्धच स्वस्थचित्त दिसतात. बाकी प्रत्येकजण सारखा धावत असतो. रोज प्रत्येक पान स्प्रे मारून स्वच्छ व चकचकीत केले जाते. अशी अनेक ५-६ फूट उंचीची शोभेची झाडे ठिकठिकाणी असतात. कारंजी नाचत असतात. सगळी खरेदी करून तुम्ही मध्येच दमलात, भुकेले झालात तर एक कोपरा इटींग प्लेसचा असतोच. त्यात चिनी, जपानी, इटालियन, अमेरिकन, थाई, मेक्सिकन फूडची लहान लहान अशी सुमारे १० ते १५ दुकाने असतात. पैसे देऊन कागदाच्या बशीत जेवण घ्यायचे. सोबत काही तरी पेय. बसायला प्रसन्न रंगाच्या टेबल-खुर्च्या. खाऊन झाले की आपली बशी, पेले उचलून गार्बेज कॅनमध्ये टाकायचे. टिश्यू पेपरने टेबल येणाऱ्या पुढल्यांसाठी स्वच्छ करून उठायचे हा रिवाज.

आठवड्यातले पाच दिवस सकाळपासून अंधारून येईपर्यंत प्रत्येक अमेरिकन कष्ट करून जे पैसे मिळवतो ते सगळे पैसे व पुढील आठवड्यात त्याला मिळू घातलेले पैसे एका आठवड्याच्या दोन दिवसांच्या शनिवार-रविवारच्या सुट्टीत संपूर्णतः खर्च होतील अशी सोय या मॉलनी केलेली आहे. इथे फारसे सांस्कृतिक जीवन नसावे. मग रोज संध्याकाळी काय करायचे? वेळ कसा घालवायचा? तर पाकिटात डझनभर क्रेडिट कार्डे घेऊन उठून खरेदीला जायचे, स्वागताला मॉल नटून थटून वाटच पाहात असतात. नवऱ्याने बायकोला आणि बायकोने नवऱ्याला एकमेकांवरच्या प्रेमाची खात्री पटवण्यासाठी सारख्या 'गिफ्टस्' देत राहाणे फार आवश्यक असते. मैत्री टिकवणे, व्यावसायिक संबंध टिकवणे यासाठीही 'गिफ्टस्' ही अत्यावश्यक बाब. त्यामुळे खरेदी आवश्यक.

खरेदी करणे इथे अगदी सोपे आणि फार आनंददायक आहे. जवळ पैसे असोत वा नसोत. मनात येईल ती गोष्ट, मनात येईल त्या किंमतीची गोष्ट, तुम्ही खरेदी करू शकता. कशी? तर हप्त्याने. आणि पहिला हप्ता एक वर्षाने सुरू. वर्षभर

चिंताच करायची नाही. फ्रीज हवा? वॉशिंग मशिन पाहिजे? महागडा कॉम्प्युटर हवा? कोल्डस्टोरेजचे प्रचंड कपाट हवे? चिंताच नको. सरळ खरेदी करायचे. पहिल्या हप्त्याची वेळ वर्षाने येते. मग हा मोह कोणाला बरे टाळता येईल?

दिवसभर तुम्हाला खरेदी करायला वेळ नसेल तरी काही बिघडत नाही. एकदा रात्री बारा-एकला आम्ही प्रवासाहून परतलो. आता कुठे काय मिळणार? त्यातल्या त्यात इराण्याचे हॉटेल तरी आपल्याकडे उघडे असते. पण इथे अमेरिकेत कुठला आलाय इराणी असे वाटले. पण आमचे काही अडले नाही. मध्यरात्री आम्ही डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये जाऊन खाद्यपदार्थ, सूपचे डबे, फळे, दुधाचा कॅन, आईस्क्रीम सारे आणू शकलो. कारण इथे भव्य आकाराची बरीचशी डिपार्टमेंटल स्टोअर्स चक्क २४ तास उघडी असतात. कारणही मजेदार. मॅनेजमेंटला म्हणे सगळे दिवे घालवणे, आवराआवर करणे आणि सारे दरवाजे बंद करणे यांचा एवढा खर्च येतो की त्यापेक्षा रात्रभर स्टोअर उघडे ठेवून हजारो दिवे जाळणे परवडते. आपल्या तर्कबुद्धीला न पटणाऱ्या पण अमेरिकनांना फार सयुक्तिक वाटणाऱ्या अनेक गोष्टी इथे आहेत. त्यांतलीच ही एक.

त्यामुळे दिवसाच्या २४ तासांत जेव्हा कधी मनात येईल तेव्हा (जवळ पैसे आहेत का नाही, हा प्रश्नच नसतो) उठसूट आलिशान गाडी काढून फ्री वेवरून ताशी १०० ते १२० मैल वेगाने गाडी चालवत ४०/५० मैलांपर्यंतच्या टापूत कुठेही जाणे यातच अमेरिकनांना आनंद वाटतो.

दुकानात प्रत्येक वस्तूवर किंमत असते. पण अनुभवाने लक्षात आले की, बिलातल्या किंमतीचा त्याच्याशी संबंध नसतो. त्यांची खरेदी प्रचंड असते. दुकानात शिरताना एक दोन चाकी ढकलगाडी सामानासाठी आत न्यायची. सारी खरेदी डझनात. टीशर्ट घ्यायचे तर एक डझन, पेप्सीकोला एक क्रेट, ज्यूसच्या, बिअरच्या किंवा वाईन कुलरच्या बाटल्या पाच डझन, दुधाचा पाच पौंडांचा कॅन, बटर तीन पौंड, पोरीला फ्रॉक अर्धा डझन, पुलओव्हर्स अर्धा डझन... एक किंवा दोन वस्तू खरेदी करणे त्यांना फार लांच्छनास्पद वाटत असावे. म्हणून ते त्या डझनांनीच खरेदी करतात.

खरेदी करण्याचीही इथे विशिष्ट पद्धत आहे. त्याला 'शॉप टिल यू ड्रॉप सिंड्रोम' म्हणतात. सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र अव्याहत खरेदी करायची. इतकी, की तुम्ही थकून कोसळेपर्यंत काही ना काही खरेदी करतच राहायचे. मग त्यात आवश्यक, आवडलेल्या आणि बिलकूल न आवडलेल्या गोष्टीसुद्धा खरेदी

करायच्या. त्या कशासाठी? त्यामागेही विचारपूर्वक केलेले नियोजन असते. या वस्तू एवढ्यासाठीच घ्यायच्या की त्या परत करायला पुन्हा शॉपिंगला जाता येते. बरं त्यातही एक लक्षात ठेवण्याजोगी बाब. अमेरिकेत माणूस वस्तू परत करायला जेव्हा जातो तेव्हा शर्ट बदलून दुसरा शर्ट घेणे अथवा स्वत:साठी दुसरा कपडा घेणे असला वेडेपणा करत नाही. मायक्रोवेव्ह ओव्हन परत करून तो पायपुसणी आणतो किंवा बाबागाडी परत करून त्याबदली तो फ्रीज खरेदी करू शकतो आणि पुन्हा तो फ्रीज परत करून त्याऐवजी बूट आणू शकतो.

जगातली प्रत्येक उत्तम गोष्ट इथे विक्री साठी उपलब्ध आहे. स्वीस आर्मी नाईफ फार अप्रतिम असतो. लाईफ टाईम गॅरंटी. शिवाय त्यात दहा प्रकारची पाती. अमेरिकेत उत्तम स्वीस नाईफ मिळाला. जर्मनीत जे काही उत्तम होते ते इथे मिळते. फ्रान्समध्ये तयार होणारी सगळी उंची परफ्यूम्स् इथे मिळतात, जपानमधील एकूण एक इलेक्ट्रॉनिक गॅजेटस् इथे मिळतात, इटलीमधील उत्कृष्ट पादत्राणे इथे मिळतात,स्वीस घड्याळे व चॉकलेटस मिळतात, डॅनिश कुकीज मिळतात, चायनीज क्रोकरी मिळते. किंमतीशी काहीही संबंध नसतो. म्हणजे वस्तूवर लिहिलेली किंमत सोडून इतर कुठलीही किंमत त्या वस्तूची असू शकते. हे कटू सत्य कळाल्यानंतर खिशातले पैसे पाहून वस्तूंच्या किंमतीशी मेळ घालून त्या घेण्याचा वेडा प्रयत्न मी तर पार सोडून दिला. फारसे काही घ्यायचे नाही असा निश्चय केला आणि आपण कितीही दृढनिश्चयी असलो, तरी तिथल्या दुकानात गेल्यावर तो पार कोलमडून जातो, याचा अनुभव आला. मुलीला घड्याळ घ्यायचे नाही, भारतात आता उत्तम घड्याळे मिळतात असे निग्रहाने ठरवून खूप छान छान घड्याळांकडे दुर्लक्ष करून मी एका दुकानातून बाहेर पडले. पण शेजारच्या दुकानात कॅट व माऊस वॉच फॉर कॅटलव्हर्स असा काऊंटर होता. सेकंद काट्याऐवजी पळणारा उंदीर आणि त्याला पकडणारे मिनिट काट्याचे मधोमध अतिशय गोंडस मांजर पाहून माझा निश्चय कधीच वितळला. असे बहुतेक बाबतीत झाले. तुम्हाला आकर्षित करणारे विविध वस्तू प्रकार इथे दरतासाला बाजारात येत असावेत. घेणारा रसिक आणि सारी उपलब्धता असा समसमा संयोग आहे. याची परिणती कशात होते? तर ज्या वस्तूंचा आयुष्यातही पुढची शंभर वर्षे आपण स्वत: वापर करणार नाही अशी ठाम समजूत आहे अशा शेकडो वस्तू अमेरिकन माणूस खरेदी करून हौसेने घरी आणतो आणि तितक्याच हौसेने भरून गॅरेजमध्ये ठेवून देतो.

सिडने पॉईंटर या काळ्या नटासारखा दिसणारा आमचा काळा शेजारी

आपल्या गोऱ्या भुऱ्या कॉकेशियन बायकोशी भांडला-गॅरेजमध्ये उभा राहून एकदा तिला चिडून, हातवारे करून सांगत होता, 'व्हाय डू यू कीप ऑन विथ युअर शॉपिंग? लुक अ‍ॅट दीज. हाफ ऑफ इट, यू आर नॉट गोईंग टू यूज फॉर अनदर हाफ अ सेंच्यूरी.'

त्यामुळे त्यांचे गॅरेज हे अनेक वस्तूंनी भरलेल्या खजिन्यांसारखेच वाटते. त्यात काय नसते? कधी कधी हुक्की आली तर सकाळी उठून व्यायाम म्हणून सायकलींगला जाता यावे म्हणून लेडीज व जेण्टस व मुलांच्या सायकली. अनावश्यक कपड्यांच्या पेट्या, जादा खेळणी, उंची उभे लॅम्प्स, खुर्च्या, गालिचे, पिकनिकला नेण्यासाठी आवश्यक सारे सामान, ट्रेकिंग, हायकिंगला आवश्यक असणारे सारे सामान, काही वाद्ये... ही यादी कितीही वाढवता येईल. अमेरिकनांच्या गॅरेजमध्ये कसे असंख्य गमतीदार वस्तूंचे प्रदर्शन असते हे सांगून सोनेरी केसांचा अवाढव्य विली मिश्किलपणे हसून म्हणाला, 'येस, आय फरगॉट टू टेल यू समथिंग. सम स्टुपिड पिपल पुट देअर कार्स इन दी गॅरेज ऑल्सो.'

सांस्कृतिक जीवन फारसे दिसत नाही. तसेच सामाजिक जीवनही दिसत नाही. वाढदिवस, मौंजी - व्रतबंध, मंगळागौर, हळदीकुंकू, वास्तुशांती, बारसे यांसारखे प्रकारही नाहीत. बोलायला कुणाला वेळ नाही. गप्पा मारायला कुणी नाही. कुणालाच दुसऱ्यासाठी फारसा वेळ नाही. कारण इथे प्रत्येकाला एकच ठाऊक आहे ते म्हणजे,

'वेळ म्हणजे पैसा.'

❖❖❖

# तुझी माझी धाव आहे

कौटिलीय अर्थशास्त्रात 'अर्थ एव प्रधान:' असे २५०० वर्षांपूर्वी केलेले प्रतिपादन आज भारत पूर्णत: विसरला आहे. पण अमेरिकनांनी मात्र अर्थाचे महत्त्व पुरेपूर लक्षात घेतले आहे. त्यांना पैशाचे फार महत्त्व वाटते. पैशाबद्दल त्यांना अतोनात प्रेम वाटते. इथेच हे संपत नाही. आपल्याला अत्यंत प्रिय वाटणाऱ्या पैसे, प्रिय डॉलर या वस्तूबद्दल त्यांना फारसा आदर मात्र नसावा हे प्रकर्षाने जाणवते. कारण अमेरिकेतला प्रत्येक माणूस सतत जास्त पैसे कसे मिळवावेत आणि मिळवलेल्या पैशापेक्षा सतत अधिक पैसे कसे खर्च करावेत याचे नवनवे उपाय शोधत असतो.

कमाईपेक्षा जास्त खर्च, हे त्यांचे लाडके तत्त्व असल्यामुळेच वारसाहक्काने मिळालेली परंपरागत संपत्ती नावाचा प्रकार अमेरिकेत सर्वसाधारण कुटुंबामध्ये दिसत नाही. वाडवडिलांनी बांधलेले घर, घराण्याचे दागदागिने, कुटुंबातली चांदीची भांडी, आजोबांच्या काळातले सोन्याच्या साखळीचे कोटाच्या खिशातले घड्याळ हा प्रकार इथे नाही. पिढीजात फर्निचरवर बसण्याचे शाही सुख या मंडळींना माहीत नाही.

वडिलोपार्जित कमाईवर श्रीमंत होण्याचा मार्ग इथे पूर्णत: बंद असतो. याचे कारण जे मिळवू ते स्वत: उपभोगायचे ही वृत्ती. मुलांसाठी माया करून ठेवणे किंवा पुढच्या पिढ्यांची सोय करणे हे तत्त्व त्यांना मान्य नाही. मुलांनी स्वत:ची कमाई करावी. त्यांना वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत शिक्षण, तेही फक्त शालेय - देण्याची जबाबदारी आईबापांची. पुढे त्यांचे त्यांनी पाहावे.

आणि मुलींनासुद्धा १८ वर्षांनंतर आईबाप आपले आपण पाहा म्हणून सांगतात. - मुली आणि मुले फरक नाही! एकच नियम लागू. अठराव्या वर्षी

घराबाहेर पडावे. पण मग त्यांच्या लग्नाचे कोणी पाहायचे? अर्थात प्रत्येकाने आपापल्या लग्नाचे पाहावे. नोकरी शोधावी तसाच नवराही शोधावा. अशा प्रकारे मुलांमुलींची जबाबदारी आईबाप अठरा वर्षांत झटकून टाकतात. त्यामुळे त्यांची संपत्ती वारसा हक्काने त्यांच्या पोरापोरींना मिळण्याचा प्रश्नच राहात नाही.

त्यामुळेच वयाच्या १८ व्या वर्षापासून प्रत्येक अमेरिकन पैसे कमविण्याच्या मागे लागतो. तिथे शिक्षण, उच्च शिक्षण हा अधिक पैसे मिळविण्याचा अपरिहार्य मार्ग नाही. उलट शालेय शिक्षण संपले की , पुढचे शिक्षण घेण्यात वेळ खर्च करणे त्यांना पसंतच नाही. एकतर स्वत: कमावून शिकावे लागते किंवा कर्ज काढून. नंतर पुढे कमवायला लागल्यावर प्रथम कर्ज फेडत बसायचे. श्रीमंत होण्यासाठी तेवढा उशीर होतो ना. भारतीयांना शालेय शिक्षण संपल्यानंतर जर गरिबीत जगायचे असेल तरच ते नोकरी धरतात अथवा झापड लावून थेट कॉलेजमध्ये प्रवेश. डिग्री हवीच. त्याशिवाय पायावर आपल्याला उभे राहाता येणार नाही असे प्रत्येक आईबाप दिवसातून तीन वेळा त्याचे बौद्धिक घेतात. अमेरिकेतली लिंडा - वय वर्षे १४ - मला म्हणाली,

'मला शाळेत जाऊन शिकायला आवडत नाही. मी आपली नोकरी करणार.'

'अग, पण त्याशिवाय कसली नोकरी करणार गं तू? निदान माध्यमिक शिक्षण तरी समाजात वावरायला प्रत्येकाला आवश्यक आहे. तुमचा समाज तर पुन्हा इतरांपेक्षा अधिक प्रगत आहे.'

'ओ नो, नोकरीसाठी शिक्षण कशाला? मॅक्डोनाल्डमध्ये मला आजही वेट्रेस म्हणून घेतील. पगार उत्तम. मला अक्षर-ओळख नसली तरीही बिघडणार नाही.'

अशिक्षितांनाही पैशाची भ्रांत पडू नये अशी सोय इथे आहे. 'मॅक्डोनाल्ड' ही हॉटेल्सची चेन आहे. वेटरलाही उत्तम पगार मिळतो. दुकानांच्या, डिपार्टमेंटल स्टोअर्सच्याही इथे चेन आहेत. सामानाचे बिल कॉम्प्युटर करतो. बिलाचा आकडा जरी तुम्हाला वाचता येत नसला तरी हरकत नाही. कॉम्प्युटर मोठ्या आवाजात 'फोरटी डॉलर्स सिक्सटी सेंट्स' असे सांगतो. सेल्सगर्ल, सेल्समन म्हणूनही अशिक्षितांना नोकरी मिळते. त्यामुळे शिक्षणाची ऐशी की तैशी. अठराच काय पण त्याहीपेक्षा लहान वयात अमेरिकन माणूस पैसे कमवायला सुरुवात करतो. तो जेवढे जास्त काम करतो, जितक्या नोकऱ्या करतो तेवढे अधिक पैसे त्याला मिळतात.

त्याचा परिणाम म्हणजे फास्ट फॉरवर्ड करून फिल्म पाहावी तसे यांचे

जीवन! गांधी सत्याग्रहाच्या ४२ च्या आंदोलनाच्या आपल्याकडच्या फिल्ममध्ये जशी माणसे सारखी धावत असतात तसे इथे प्रत्येकजण सारखा धावत असतो.

सकाळी सहा-साडेसहाला बाहेरचे कपडे चढवले की घाईने धावत सुटायचे. कुठे? हा प्रश्न फार दुय्यम. कारण प्रत्येकजण वेगवेगळ्या दिशांनी सारखा पळत असतो. त्यांच्या घाईला पूरक अनेक गोष्टी उपलब्ध आहेत. एक्सप्रेस लिफ्टस्, एक्सप्रेस सबवे ट्रेन्स, फ्री वे इत्यादी. फ्री वे म्हणजे ज्याच्यावरून ताशी १०० मैल वेगाने मैलन्‌मैल कुठेही न वळता गाडी हाकता येते असा मार्ग. कारण एकच. घाई. जवळच्याच ठिकाणी जायचे असले तरी फ्री वे वरून. त्यातही पुन्हा फास्ट लेन पकडून लांबवर जाऊन वळून त्या ठिकाणी अमेरिकन परत येतो. कारण सावकाश जाणे आणि घाई न करणे त्याच्या स्वभावात नाही. अमेरिकेत अशी रेस्टॉरेंटस् आहेत जिथे वेटर आपल्या टेबलावर स्टॉपवॉच आणून ठेवतो. टेबलावर छोटा बोर्ड असतो. ऑर्डर दिल्यापासून सहा मिनिटांत आम्ही संपूर्ण जेवण तुम्हाला दिले नाही तर जेवणाचे बिल आमच्यावर. काही फास्ट फुडस् सेंटरमध्ये तर ९० सेकंदांत चार कोर्सेसचा लंच मिळतो.

रस्ता क्रॉस करताना एक बटण दाबायचे. मग समोर वॉक अशी अक्षरे व चालणारा माणूस येतो. त्यावेळी क्रॉस करायचा. दुतर्फा ट्रॅफिक थांबतो. एरवी प्रत्येक गोष्टीची घाई करणारा अमेरिकन अशा वेळी मात्र कचकन ब्रेक दाबून गाडी उभी करतो. क्रॉस करणारा आपल्यासारखा एखाद दुसराच दिसतो. फारच क्वचित. पण त्यावेळी दोन्ही बाजूंनी आठ दहा गाड्यांची रांग आपण क्रॉस करण्याची वाट पाहात उभी असते. ही अंगची शिस्तप्रियता का प्रचंड दंडाच्या भीतीपोटी आलेली शिस्तबद्धता आहे ते कळत नाही. पण एक जाणवले. इथे ही मंडळी चट्‌कन चिडत, संतापत नाहीत. प्रत्येकजण दुसऱ्याची घाई समजून घेतो. इतकेच नाही तर दुसऱ्याच्या घाईत असण्याबद्दल आदरभाव दाखवतो. धावणारा एक अमेरिकन दुसऱ्याला धक्का देऊन लिफ्टमध्ये शिरला किंवा पार्क केलेली गाडी वेगात काढू लागला तर इतर अत्यंत सहृदयतेने फक्त थोडे स्मित करतात. 'द गाय इज इन हरी.' असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर असतो. इथे प्रत्येक व्यक्ती 'गाय' असते. ऑस्ट्रेलियात ती 'ब्लोक' असते तर इंग्लंडमध्ये ती 'पर्सन' असते.

एकूणच पैसे कमावण्याच्या गडबडीत असल्यामुळे ही मंडळी घाईघाईत चालतात. घाईत वाहन चालवतात, घाईत जेवतात, घाईत झोपतात. आपण अत्यंत आरामात दुकानातून हिंडत असलो तर, रस्त्यावरून रेंगाळत चालत असलो तर

शरमिंदे होऊन आपणही इतरांच्या गतीने कधी धावू लागतो आहोत हे आपल्यालाच कळत नाही.

प्रत्येकजण अधिकाधिक पैसे मिळविण्यासाठी सतत धडपडतो. नोकरी करणारा पुन्हा पार्ट टाईम नोकरी करतो. शिवाय आठवड्यातून दोन तीन वेळा करण्याचा एखादा जॉब स्वीकारतो. रोजचे जास्तीत जास्त चेक्स कसे येतील याची चिंता प्रत्येक स्त्रीपुरुष करतो. बिझनेस करणारा एका बिझनेसमधून इतर बिझनेस कसे सुरू करता येतील याची गणिते मांडीत असतो.

इथे पाच दिवसांचा आठवडा आहे. पाच दिवस खूप कष्ट करून मंडळी जास्तीत जास्त पैसे मिळवतात. एकदा आम्ही घराबाहेर पडलो आणि लक्षात आले की, किल्ल्या आतच राहिल्या. साऱ्या किल्ल्यांचा एकच जुडगा. शहरात 'क्राऊन लॉकस्मिथ सर्व्हिस' होती. त्यांना एका पब्लिक फोनवर जाऊन फोन केला. चिंतातूर चेहेऱ्याने येरझारा घालीत आम्ही वाट पाहात होतो. सुमारे दहा मिनिटांत भल्या थोरल्या व्हॅनमधून एक आडदांड उंचापुरा माणूस हजर झाला. कुलूप वगैरे पाहाण्याआधी गाडीतून उतरल्याबरोबर त्याने प्रश्न केला की, 'तुम्ही घराचे मालक आहात याचा एखादा पुरावा दाखवाल का? आयडेंटीटी कार्ड वगैरे?'

पुन्हा शोधाशोध. अमेरिकनांच्या पैशाच्या पाकिटात पैशाखेरीज इतर वस्तू खूप असतात. क्रेडिट कार्ड, बँक कार्ड, आय कार्ड, ट्रॅव्हलिंग लायसन्स, कार्ड बुक आणि बरेच काही. त्यामुळे पाकिटात पैसे ठेवायला एकच कप्पा असतो, पण कार्डे ठेवायला सोळा कप्पे. त्या बाबाला आयकार्ड दाखवले. त्याची खात्री पटली आणि मग त्याने अक्षरश: वीस सेकंदांत कुलूप उघडले. आपल्या कामाचा मोबदला म्हणून पन्नास डॉलर्सचा चेक घेऊन 'हॅव अ गुड डे' असे सांगून तो निघून गेला. वीस सेकंदांच्या कामाचे चक्क पन्नास डॉलर्स !

एकदा बेसिनचा नळ गळत होता म्हणून प्लंबर आला. तोही पन्नास डॉलर्स घेऊन गेला. एकदा एअर कंडिशनरचे कुलींग होत नाही म्हणून मेकॅनिक आला. त्याने सांगितले, एअर कंडिशन प्लँटमधले फिल्टर जुने झालेय ते बदला आणि तो या सल्ल्याचे साठ डॉलर्स घेऊन गेला. जाताना म्हणाला, 'टेक अिट इझी.' एक छान वाटले. ही मंडळी सारी नुसता फोन केला की, सुमारे आठ ते दहा मिनिटांत हजर होतात. पण त्यांचा वेळ, काम आणि त्यामानाने त्यांना मिळणारा मोबदला पाहून चकित व्हायला होते. पुण्यात एकदा किल्ली हरवली म्हणून डेक्कनवर किल्लीवाल्याकडे मी रिक्षा करून गेले. तिथे कळले तो दुकान बंद करून गेला आहे.

कुठे ते ठाऊक नाही. रात्री आठला येईल. आम्ही सारे बाहेर बंद कुलुपाशी. प्लंबर शोधणे, मेकॅनिक शोधणे ही गोष्ट तर इथे पुण्यात लॉटरीचे तिकीट लागण्याइतकीच दुरापास्त आहे.


खूप कष्ट करून खूप पैसे मिळवावेत ही यांची वृत्ती. पण मिळवलेल्या पैशांचा साठा करावा, योग्य गुंतवणूक करावी हे यांच्या स्वभावात दिसले नाही. इथे पगार दर पंधरा दिवसांनी होतो. पगार हातात आला की, मंडळी पगारापेक्षा अधिक रक्कम खर्च करून मोकळी होतात. कारण इथे कुणालाही उद्याची चिंता नाही. सरकारने त्यांना जगण्यासाठी सामाजिक सुरक्षितता दिलेली आहे. नोकरी जाऊन बेकार झालात (आणि इथे ती कधीही जाऊ शकते.) की बेकारभत्ता मिळतो. म्हातारपणाची तरतूद म्हणून जास्त पैसे गाठीला लावायचे म्हणाल तर तीही आवश्यकता नाही. तुम्ही ६५ वर्षांचे झालात की, सिनिअर सिटीझन्स म्हणून तुम्हाला ५०० ते ६०० डॉलर्स मिळतात. कुणी तुमचे पहाणारे नसेल तर अधिकही मिळतात.

अमेरिकनांची वृत्ती एकूण 'असंग्रहाची' आहे. भारतीय तत्त्वज्ञानात 'इदं न मम' म्हणजे जे आहे ते माझे नाही, ही वृत्ती सर्वांत महत्त्वाची मानली आहे. सर्व दुःखाचे कारण 'ममत्व' आहे असे ऋषी सांगतात. भारतीय वेदवेत्त्यांनी सांगितलेली ही सुखाची गुरुकिल्ली आम्ही विसरलो आहोत. पण ती प्रत्यक्ष आचरणात आणताहेत अमेरिकन.

❖❖❖

# गुणीजन अवघे

अमेरिकन माणूस शिष्ट स्वभावाचा नाही. त्याला जवळीक साधायला, मैत्री करायला आवडते. त्याचा चेहरा कडक इस्त्री केलेला नसतो. उलट त्याचा सगळाच आविर्भाव मित्रत्वाचा असतो. उद्दाम चेहऱ्याने कायम स्वतःच्याच गुर्मीत असलेली माणसे इथे दिसली नाहीत. सारेच चेहरे मैत्रीप्रिय वाटले.




जवळिकेचा सोपा मार्ग

इथे प्रत्येकजण एकमेकाला पहिल्या नावाने हाका मारतो. जवळिकेचा एक सोपा मार्ग, मैत्रीचा पहिला टप्पा.

अमेरिकेत प्रसिद्ध असलेले लहान मुलांचे मासिक कसे तयार होते, त्यांची कार्यपद्धती, त्यांचे लेखक, चित्रकार व त्यांची छपाई पाहाण्यासाठी मी गेले होते. मासिकाचे नाव होते लिटील एंजल. संपादकीय विभागातल्या लोकांशी मी बोलत होते. तिथल्या एका सद्गृहस्थांशी संभाषण करताना मी म्हटले,

'मिस्टर डग्लस, वितरणासाठी तुम्ही काय विशेष प्रयत्न...' त्यांनी वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच मला आडवले. आणि ते म्हणाले, 'स्वीटी,

माय फादर वॉज मिस्टर डग्लस. आय ॲम जस्ट सॅमी.' यांचे वडील श्रीयुत डग्लस आणि हे फक्त सॅमी. सॅम्युअल सुद्धा नाही, बरं का. यांचे वय सुमारे पंचावन्न. आता एवढ्या मोठ्या बाबाला चक्क सॅमी म्हणायचे आणि तेही पहिल्याच भेटीत. कसे शक्य आहे? पण अमेरिकेत असेच म्हणायचे असते. बॉसला यस सर म्हणणे फारच चुकीचे. म्हणजे बॉसला स्वतःलाच ते अपमानास्पद वाटत असावे. प्रचंड श्रीमंत असलेल्या भल्या थोरल्या कंपनीचा मालक इतर कर्मचाऱ्यांबरोबर चहाच्या लाईनीत उभा राहातो आणि कुणी परदेशी कर्मचाऱ्याने स्वतःच्या देशातल्या सवयीने त्याला चहाचा कप आणून देत 'प्लीज हॅव इट सर' म्हटले तर तो दुखावला जातो. वाईट चेहरा करून म्हणतो, 'हे बडी, आय ॲम नॉट सर. आय ॲम बिली.'

जॉर्ज मायकेशने अमेरिकनांच्या स्वभावावर खूप सुरेख मल्लीनाथी केलेली आहे. अल्बर्ट आईन्स्टाईन या थोर शास्त्रज्ञाचा अमेरिकन टी. व्ही. वर कसा इंटरव्ह्यू घेतला जाईल याविषयी तो लिहितो–

'अनाऊन्सर सांगतो, आज स्टुडिओत फेमस सायंटिफिक गाय मि अल्बर्ट आईन्स्टाईन आले आहेत आणि मग इंटरव्ह्यू सुरू होतो.

–'हाय अल्बर्ट नाईस टू सी यू. आय वान्ट टू आस्क यू फ्यू क्वेश्चन्स. फर्स्ट ऑफ ऑल, ॲल्बी, व्हाट अबाऊट रिलेटीविटी? डोण्ट लुक सो वरीड्. कम ऑन बर्टी. डोण्ट बी शाय.'

असा एकूण सारा अरेतुरेमधला मामला. बॉसला बिल अशी नावाने हाक मारायची. एकमेकांशी ओळख करून देताना हे श्री. जॉन्सन, हे श्री. विल्सन अशी ओळख न सांगता 'धिस इज जॉन, धिस इज लिंडा' सांगायचे. मग हे जॉन किंवा लिंडा कंपनी डायरेक्टर असोत वा त्यांची वये ६५ वर्षे असोत.

'भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे' ही पसायदानातली ओळ इथे प्रत्येकात भिनलेली आहे. या मंडळींना साऱ्यांबद्दल मित्रत्वाची भावना. प्रत्येकाचा स्वभावही अत्यंत मनमोकळा. त्यामुळे दुसऱ्यापाशी आपल्या स्वतःच्या खाजगी जीवनाबद्दल किती बोलायचे याचा विधिनिषेध नाही. सारा मामला अगदी खुल्लम् खुल्ला. स्वतःचा बँक बॅलन्स, सेक्स लाईफ, वैवाहिक आयुष्यातले तणाव, स्वतःचा विवाहबाह्य संबंध, मुलांचे अनैतिक वर्तन यावर ते तुमच्याशी तासभर सहज गप्पा मारू शकतील. यासाठी त्यांना थोडीशी ओळख पुरते. घनिष्ठ मैत्रीतच या बाबी बोलावयाच्या असतात हे त्यांना पटत नाही. बरं, स्वतः दुसऱ्याशी बोलून ते थांबत नाहीत. तुमच्या आयुष्याबद्दलही तुम्हाला ते तितक्याच मोकळेपणाने प्रश्न

विचारतात. ते ऐकून मला फारच शरमायला व्हायचे. काय उत्तर देणार? या असल्या गोष्टी कुणी विचारूच कसे शकते? आणि विचारले तर या काय बोलायच्या गोष्टी आहेत? अस्वस्थ होऊन मी आपली नर्व्हसली हसायचे अशा वेळी. पण त्यावर समोरचा फारच गंभीर होई. आपण फार अनमॅनरली वागलोय अशी जाणीव होऊन माझा चेहरा साफ पडे.

बाहेर कुणाशीही सौहार्दपूर्ण वागायला उत्सुक असलेली ही मंडळी घरी मात्र वेगळीच वाटतात. पतीपत्नी एकमेकांशी बोलतात व बोलताना आपल्या वैयक्तिक स्वातंत्र्याबद्दल फारच दक्ष असतात असे जाणवे. नवऱ्याने बायकोला अगदी सहजगत्या जरी विचारले,

'हनी, संध्याकाळी कितीला येणार आहेस? किंवा उद्या काय करणार आहेस?' तरी ती लगेच फार सावध होते. आपल्या स्वातंत्र्यावर घाला घातला जातोय म्हणून सामन्याला उभी राहाते. भयंकर सावधानतेने थंड आवाजात पत्नी उत्तरते -

ही माझी खाजगी बाब आहे असे तुला वाटत नाही का? 'डोण्ट यू थिंक इट इज टू पर्सनल? एक्सपेक्ट मी व्हेन आय् एम् बॅक.' बायको नवऱ्याला आणि नवरा बायकोला दिवसातून काही वेळा हे वाक्य ऐकवतातच. अगदी न चुकता. मला हा प्रकार फारच चमत्कारिक वाटला. आणि आठवले की माझी आई अजूनही कौतुकाने सांगते -

-'लग्नानंतर ह्यांनी मला सॅण्डल्स घालायला बंदी केली. त्यांना आवडत नाही म्हणून मी नंतर आयुष्यात कधीच सॅण्डल्स घातले नाहीत.'

प्रवासकांशी, शेजाऱ्यापाजाऱ्यांशी, मित्रमैत्रिणींशी अत्यंत मनमोकळेपणाने बोलणारे अमेरिकन, पती-पत्नी झाल्यावर असे वकिली थाटाने का बोलतात मला कळले नाही. यांच्याकडे कुणाच्याही बंगल्याला सभोवताली कुंपण नसते. तसेच संसाराभोवतीही कसलीच बांधबंदिस्ती यांना सहन होत नसावी. 'मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे' अशी यांची वृत्ती असावी.

अमेरिकन सिटिझन झालेली जपानी 'मिशेल' आपल्या अमेरिकन नवऱ्याबद्दल संतापाने एकदा सांगत होती—

—'डॉन मला म्हणाला, तू तुझ्या वयापेक्षा मोठी दिसतेस. डॉनला हे म्हणणे शोभते का? डोण्ट यू थिंक इट इज टू पर्सनल?'

अमेरिकेत एका फ्युनरलला जाण्याचा योग आला. सुरुवातीला सारे गप्प

आणि गंभीर चेहऱ्याने वागत होते. मृत व्यक्तीबद्दल काहीजण चार शब्द बोलले. तो किती चांगला भला माणूस होता हे त्यांनी सांगितले. मग सारे वातावरण थोडे उदास झाले. पायघोळ झग्यातल्या सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या प्रिस्टने धार्मिक भाषण करून 'मृतात्म्यास शांती मिळो' अशी प्रार्थना केली. हे सारे चालू असताना पार्श्वसंगीत म्हणून पियानोवर मधून मधून उदास धून वाजत होती. त्यामुळे वातावरणातल्या ताणामध्ये अधिक गहिरेपणा आला होता. मग निळ्या मिश्किल डोळ्यांच्या त्या लालबुंद प्रिस्टने चक्क विनोद सांगायला सुरुवात केली. जमलेला प्रत्येकजण त्या विनोदांवर खदखदा हसायला लागला. मृताच्या नातेवाईकांनीही त्यात भाग घेतला. इतका वेळ वाजणारा पियानो थांबून गिटारवर आनंदी धून वाजू लागली. हास्यविनोदाचे फवारे उडू लागले. मी थक्कच. अंत्यविधीसाठी आलेली माणसे असे वागूच कशी शकतात? रडारड, दुःखप्रदर्शन, शोकाचा आवेग, उमाळे - काही नाही?

या सर्वांच्या पाठीमागे या मंडळींचे तत्त्वज्ञान असे की, झाले ते होऊन गेले. त्याचा शोक फार काळ करीत बसू नका. आता पुन्हा उत्साहाने, आनंदाने तुमच्या दैनंदिन जीवनाला सुरुवात करा.

'जुने जाऊ द्या मरणालागूनी' अशी यांची वृत्ती आहे. तो प्रत्येक बाबतीत दिसून येते. गतकाळचा फुका शोक करू नका. मिळालेला मानवी जन्म पुरेपूर उपभोगून घ्या. दुःख करीत बसून काळ व्यर्थ दवडू नका अशी यांची धारणा आहे.

भर्तृहरीने नीतिशास्त्रात म्हटले आहे की,

'वित्ताच्या दान, भोग आणि नाश अशा तीन गती आहेत. जो पुरुष दुसऱ्याला दान देत नाही किंवा स्वतः उपभोग घेत नाही त्याच्या वाट्याला तिसरी गती म्हणजे विनाश येतो.'

अमेरिकन माणूस नाश ही तिसरी गती वाट्याला येण्याची पाळीच येऊ देत नाही. 'उपभोग' या वित्ताच्या गतीचा पराकाष्ठेचा अवलंब तो करतो. शिवाय इथले जीवन इतके गतिमान आहे की थांबेल तो संपतो. त्यामुळे ही मंडळी भावनेच्या आहारी जाणे, शोक करीत राहाणे यावर विश्वास ठेवीत नाहीत.

माझा अमेरिकेत वास्तव्य करणारा भाऊ एके दिवशी संध्याकाळी घरी येऊन चकित मुद्रेने सांगत होता-

-'आज माझा बॉस मला म्हणाला की, मी आज चांगल्या मूडमध्ये आहे. माझी तिसरी बायको वारली. आज ऑफिसमध्ये कुणी उशिरा आला तरी मी मुळीच

मनावर घेणार नाही.'

अमेरिकनांना जसे एकमेकांबद्दलचे ममत्व आणि भावनिक गुंतवणूक नाही हे प्रकर्षाने जाणवायचे तसेच यांना जमीनजुमला, घरदार याबद्दलही ममत्व नाही हे वारंवार दिसून यायचे. फारसे म्हणण्यापेक्षा अजिबात ममत्व नाही. फासेपारध्यांची पाले उठावीत तसे हे लोक एके दिवशी उठून दुसरीकडे जातात.

आम्ही भारतीय जुने ते सोने मानतो. आमची ती संस्कृतीच आहे. त्यामुळे प्रत्येक घरात जुन्या पेट्या, जुने शालू, फेटे, जुने फोटो, जुनी बक्षिसे, पदके, जुनी घड्याळे अशा अनेक जुन्या गोष्टी आठवणींसह पत्र्याच्या ट्रंकांमध्ये जिव्हाळ्याने जतन केलेल्या असतात. आईने माझ्या मुलांना उपयोगी येतील म्हणून माझी लहानपणीची झबलीटोपडी जपून ठेवली होती.

जुनी टाकावू वस्तू सोडवत नाही, मग देश, गाव किंवा घर सोडणे किती कठीण आणि दु:खदायक. अमेरिकेत मात्र सारा प्रकार वेगळा. सारे व्यवहार उपयुक्ततेच्या निकषावर.

ज्याचा उपयोग संपला ते टाकून द्यायचे किंवा सोडून द्यायचे. ऊन लागते म्हणून तत्काळ हॅट खरेदी करायची; ऊन गेले की ती गार्बेज कॅनमध्ये टाकायची हे इथे सहजपणे होते. आणि तितक्याच सहजपणे ही मंडळी एखाद्या गावाचा उपयोग संपला की, अख्ख्याच्या अख्खा गावच मोकळा करून निघून जातात. कॅलिफोर्नियाहून ॲरिझोनाला जाताना वाटेत अशी मोकळी केलेली ओसाड गावे दिसली. घोस्ट टाऊन्स. कॅलिफोर्नियात सोन्याच्या खाणी सापडल्या. गोल्डरश सुरू झाला. खाणीजवळ गावे वसली. खाणीतले सोने संपले की घरदार, फर्निचरसकट ती गावे सोडून लोक निघून गेले. उपयुक्तता संपली मग राहायचे कशासाठी? माझा गाव, माझे घर असली भावनिक गुंतवणूक नाही.

गाव सोडून जायचा तर भारतात गाववाल्यांच्या आणि सोडणाऱ्यांच्या डोळ्यांत पाणी उभे राहाते. जुने घर बदलून नव्या घरात जाताना आमचा जीव तीळतीळ तुटतो. शहरात ४५ वर्षे राहूनही माझे वडील, काका त्यांच्या खेड्याकडे दरवर्षी प्रेमाने जिव्हाळ्याने जातात. निघताना गावच्या ओढीने आतूर होतात. येताना व्याकूळ होतात. जुने घर बदलले तरी वाट वाकडी करून मी अजून जुन्या घरात जाते. शेजाऱ्यापाजाऱ्यांना भेटते. माझ्या आत्याचा नवरा ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर होता. सतत बदल्या होत. दरवेळी घर सोडताना आत्याला फार फार वाईट वाटे. सूप, केरसुणी, जुने डबे, खुंटाळी सारे आठवण म्हणून ती बरोबर नेई.

जिमी हा अमेरिकन शिक्षक माझ्या भावाचा मित्र होता. जिमी शाळेत इतिहास शिकवे. पाठ्यपुस्तकातल्या इतिहासाची दुसरी बाजूही शिकवे. तसे करणे आवश्यक माने. त्याचे म्हणणे की, तसे केले नाही तर ती शिक्षकी पेशाची प्रतारणा होईल.

उंचापुरा, सोनेरी भरगच्च दाढीचा, निळ्या डोळ्यांचा जिमी जन्माने अमेरिकन. वयाची ४० वर्षे त्या देशात, त्या मातीत काढलेला. त्याच्या मनाने घेतले –

'धिस इज लाऊझी कंट्री. आय ॲम फेड अप.' आणि त्याने सिंगापूरला शिक्षकाची नोकरी पत्करली. एके दिवशी फक्त दोन बॅगा हातात घेऊन त्याने अमेरिकेला कायमचा रामराम ठोकला. जाताना घर-दार, सामान-सुमान, गाडी, कपडे, भांडी सारे... सारे सरळ त्याने विकून टाकले. देश, गाव, घर, माणसे या कुठल्याही गोष्टी त्याच्या निर्णयाआड आल्या नाहीत. एवढेच काय पण जिच्याबरोबर तो १५ वर्षे संसार करीत होता ती बरोबर यायला तयार नाही, हे लक्षात आल्यावर तिलाही त्याने शांतपणे टाटा केले.

❖❖❖

# विल्यमस् - अमेरिकन खेडे

दुपारी दोन वाजता कॅलिफोर्निया राज्यातल्या रेडलँड शहरातून 'ग्रँड कॅनियन' पाहायला आम्ही निघालो. जगातल्या सात नैसर्गिक आश्चर्यपैकी एक आश्चर्य.

गाडी सरळसोट धावत होती. वळसे - वेलांट्याचे रस्ते इथे नव्हतेच. सारा मामला थेट, सरळसोट आणि भव्य.

राजस्थानमधली आठवण यावी असे रणरणते ऊन. रस्त्याच्या दोन्ही बाजूला लांबलांब भेगा पडलेली तर कुठे रेताड सपाट राने. विटक्या हिरव्या रंगाचे खुरटे गवत. झुडपे सगळी वठलेली. काळी पडलेली, तुटकी मोडकी झाडे जागोजाग, डोक्यावर टळटळणारा सूर्य. दूरवर बोडके डोंगर.

कॅलिफोर्नियाच्या या भागात सोन्याच्या खाणी सापडायच्या. अजूनही सापडतात म्हणे. प्रवासात अनेक ओसाड वस्त्या दिसल्या. माहिती मिळाली की, ती सारी डेझर्टेड गोल्ड टाऊन्स आहेत. सोन्याच्या खाणीपाशी गाव वसे. सोने संपले की फासेपारध्यांची पालं उठावीत तशी माणसे उठून जात. गाव उजाड होई.

कॅलिफोर्निया राज्याची हद्द संपवून आम्ही ॲरिझोना राज्यात शिरलो, अन ऋतू बदलावा तसे सारे चित्र बदलले. जंगलांनी हिरव्या रंगाची उधळण केलेली होती. भव्य शिल्पे उभारावीत तसे कातीव डोंगर दुतर्फा दिसत होते. रस्त्यांच्या कडेला हरणाच्या चित्रांचे साईन बोर्डस् होते. इथे हरणे खूप. ती गाडीखाली सापडू नयेत म्हणून ह्या पाट्या होत्या.

सूर्य ढळला होता. हवेत सुखद गारवा जाणवत होता. विल्यमस् नावाच्या खेड्यात आम्ही शिरलो. तशी चक्क थंडी वाजायला लागली. हवेत चांगलाच गारठा होता. पाऊस पडत होता. सारीकडे एक वेगळाच वास भरून राहिला होता.

जंगलाचा, पावसाचा, मातीचा वास.

जुन्या अमेरिकन चित्रपटातल्या वाटाव्यात अशा व्यक्ती गावात वावरताना दिसू लागल्या. शहरांच्या मानाने गावात खूपच अरुंद रस्ते होते. दोन्ही बाजूला फूटपाथ. त्यावर उंच लोखंडी खांबावर लोंबणारे दिवे. अमेरिकन ओल्ड क्लासिक्स समजल्या जाणाऱ्या चित्रपटात दिसतात तशा हॅटस् घातलेले धिप्पाड कॉकेशिअन्स.

विल्यमस् नावाच्या कुणा ट्रॅंपरच्या नावे हे गाव आहे. गावाच्या मधोमध त्याचा भव्य ब्रॉंझचा पुतळा आहे. खाली लिहिले आहे 'विल्यमस् द ट्रॅंपर.' कदाचित सुरुवातीस ही फासेपारध्यांची वस्ती असावी. विल्यम ट्रॅंपरच्या खांद्यावर जाळे, हातात दोरी घेतलेली आहे. पायात शिकारी बूट.

संध्याकाळी आम्ही गावातल्या हॉटेलात गेलो. शहरातली धावपळ, शहरातला चटपटीतपणा इथे नव्हता. सारे संथपणे चालले होते. आमच्या पलीकडच्या टेबलावर दोन उंच कॉकेशिअन्स खूप दारू पीत बसले होते. त्यांचे ते मदिरासेवन खूप काळ चालले होते, असावे. दोघे बसल्याबसल्या झुलत होते आणि झुलता झुलता बोलत होते. बोलताना त्यांचे डोळे त्यांना मोठ्या कष्टाने उघडे ठेवावे लागत होते. त्यांचे शब्दोच्चार अडखळत होत होते. एक पन्नाशीचा होता. दुसरा तिशीच्या आतला. दोघेही साडेसहा फुटांच्या आसपास असावेत. रुंद जबडे आणि रुंद पंजे. पिळदार दणकट शरीर. वाटले यांच्या एका फटक्यात अस्वल सुद्धा लोळेल. पन्नाशीचा माणूस भयंकर प्यायला होता. त्याचा चेहरा तांबडाबुंद झाला होता. दोघांच्याही डोक्यावरच्या हॅटस्मध्ये थोडी पांढरी पिसे खोवलेली होती. ते इंग्रजीतच बोलत असावेत. पण त्यांचे उच्चार मला कळत नव्हते. इथेही आमच्यासारखी शहरी भाषा आणि ग्रामीण भाषा असे भेद असावेत असे त्यांचे बोलणे कानावर पडत असताना मला वारंवार वाटत होते.

पिणे संपून त्यांनी खाणे मागवले. वेट्रेस त्यांच्याशी अत्यंत समजुतीने वागत होती. त्यांच्या पिण्याचा, बडबडीचा, झोकांड्या खाण्याचा कुणालाच त्रास होत नव्हता. सारे स्वाभाविक क्रमातच चालले आहे असाच भाव इतरांच्या चेहऱ्यांवर होता. ऑर्डर देताना ते काय सांगतात हे तिला कळेना तेव्हा तिने न चिडता, थोडीही नाराजी न दाखविता पुन्हा पुन्हा मेनू कार्ड दाखविले. एकदाचे त्यांचे जेवण आटोपले. मलाच हुश्श वाटले. वेट्रेसने कॉफी आणली. त्यांनी तीनचार वेळा ती काळी कॉफी पुन:पुन्हा मागून घेऊन ढोसली. मग उठून ताठ चालण्याचा प्रयत्न करीत पन्नाशीतला तांबड्याबुंद चेहेऱ्याचा माणूस रेस्टॉरंटच्या बाहेर पडला. त्याचे कपडे स्वच्छ व

इस्त्रीचे होते. थोड्या वेळाने बिल देऊन तरणाही त्याच्या मागोमाग निघाला. वाटेत तो रेस्टॉरंटच्या मालकापाशी थांबून हसून 'थँक्यू' म्हणाला. एक १८/१९ वर्षांचा भारतीय मुलगा वेटरचे काम करताना दिसला. तो आमच्याशी येऊन बोलला नाही. उलट त्याने टाळलेच. रेस्टॉरंटचा मालक आमच्याजवळ आला. म्हणाला,

'माझे नाव जॅक. काही हवे असेल तर मला सांगा. तुम्ही आमचे पाहुणे आहात.'

'थँक्यू जॅक, सर्टनली.' असे संभाषण झाले.

वेट्रेसच्या साऱ्या वागण्याबोलण्यात अगत्य होते. आग्रहाने ती आम्हाला खाऊ घालत होती. शहरातली माणसे खूप निर्विकार वाटायची. त्या उलट खेड्यातली प्रेमळ होती. शहरात कुठल्याच हॉटेलमध्ये वेट्रेस अशी प्रेमळ आग्रह करताना आढळली नाही. परीटघडीच्या कपड्याने आणि चेहऱ्यानेच ऑर्डर घेण्यापासून ते बिलाचे पैसे घेऊन आपण दिलेली टीप उसने हसून थँक्यू म्हणून घेण्यापर्यंतचे सारे व्यवहार ती त्रयस्थपणे करे.

विल्यमस्‌मध्ये मोटेलपेक्षा उच्च प्रकारच्या 'ट्रॅव्हलॉज' नावाच्या हॉटेलमध्ये आम्ही राहिलो होतो. ते कुणा गुजराथी माणसाचे होते. इथे स्थायिक झालेले बहुतेक गुजराथी या होटेलच्या धंद्यात आहेत. घरामधली सगळी माणसे होटेलमध्ये काम करतात. त्यामुळे पगारी लोक ठेवणे, त्यावर खर्च व इतर सवलती देणे या गोष्टी त्यांना कराव्या लागत नाहीत. अमेरिकेतली ही कुणाही पर्यटकाला परवडावीत अशी कमी किंमतीची अनेक मोटेल्स आहेत. प्रवासकांना जाता जाता रस्त्याच्या कडेच्या ह्या मोटेल्समध्ये रात्र काढता येते. हा संपूर्ण धंदा गुजराथी मंडळींनी काबीज केला आहे. या विल्यमस् गावातच अनेक मोटेल्स होती. कारण ग्रँड कॅनियनला जाणारे प्रवासक इथे रात्रीचा विश्राम घेऊन पुढे निघतात. प्रवासात आमचा मित्र झालेला सोनेरी केसाचा, रेखीव चेहऱ्याचा मध्यमवयाचा कॉकेशिअन अमेरिकन जॉन म्हणाला,

'आमच्याकडे आता विचारतातच की, हॉटेल, मोटेल किंवा पटेल यांपैकी कुठे राहिलात?'

तिथे जपानी प्रवासी खूप होते. जेवणानंतर आम्ही गावात फेरफटका मारला. पाऊस थांबला होता. हवेत बोचरी थंडी होती. गाव छोटासाच. पायी फिरता येण्याजोगा. छोटी बैठी घरे. छोटी दुकाने. एका दुकानात प्रवाशांसाठी रेड इंडियन्स वापरतात ते कपडे, माळा, त्यांनी तयार केलेल्या हस्तकौशल्याच्या वस्तू होत्या.

रेड इंडियन्सची पोर्टेटस् विकण्यासाठी ठेवलेली होती. त्यांची पादत्राणे आणि वापरायची भांडी होती. त्यांनी काढलेली चित्रे होती. लाकडाचे वेगवेगळे आकार होते. आपण ज्या कौतुकाने आदिवासींनी काढलेली चित्रे, केलेल्या मूर्ती, मातीची भांडी घेतो त्याच कौतुकाने लोक इथल्या वस्तू खरेदी करीत होते. घेताना 'ओ वंडरफूल' अशी तोंड भरून स्तुती करीत होते. एकूणच रेड इंडियन्स लोकांच्या कलेचा आणि नावाचा सवंग बाजार ठिकठिकाणी दिसला.

एक दुकान जुन्या-पुराण्या वस्तूंचे होते. तिथे पूर्वी आपल्याकडे रेल्वे स्थानकावर तांबड्या पोर्टरच्या हातात दिसत तसे जाड काचेचे चौकोनी आकाराचे पितळेचे कंदील होते. जुन्या पितळी किटल्या होत्या. काही पोर्सेलिनची छोटी चित्रे होती. दांड्याची चपट भांडी दिसत होती. एक गालिचा भिंतीवर टांगलेला होता. सायकलीत हवा भरण्यासाठी वापरण्याचा हाताने चालवायचा पंप होता. दुकानाच्या मालक दोन स्त्रिया होत्या. आपल्याकडे जुनेपुराणेवाल्याच्या दुकानात किती तरी कलात्मक वस्तू दिसतात. पितळी मूर्ती, कोरीव काम केलेली भांडी, रेखीव, कल्पक अडकित्ते, विविध प्रकारची आणि आकाराची सुबक भांडी इत्यादी. इथे सारा मामला ढोबळ आणि बटाबटीत वाटला.

दारू पिऊन बायकोला शिवीगाळी करणारा एक आडदांड गडी दिसला. आमच्या खेडुतांत आणि यांच्यात काहीच फरक नाही. नवरा आक्रमक पवित्र्यात आणि बाई बिचारी भेदरलेली, दुर्बल, असहाय्य, एकाकी, एका कोपऱ्यात चिकटून उभी होती. अमेरिकेत जोराने वाहाणारे स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री-मुक्तीचे वारे बापडीपर्यंत पोहोचलेले नसावे.

आपल्या खेड्यात जशी नीरव शांत संध्याकाळ असते, तसेच इथे वाटले. कसलेही आवाज नाहीत. जे आवाज होते तेही विरत चाललेले. सारा आसमंत नि:स्तब्ध. गडद होत चाललेली झाडे, वाऱ्याने संथपणे हलणारे त्यांचे शेंडे. अंधाराच्या बुरख्यात गुंडाळून गेलेले सभोवतालचे डोंगर.

एकाशी गप्पा मारताना कळले, इथे बहुतेकजण छोटे शेतकरी आहेत. म्हणजे किती छोटे तर 'बेअरली हँड टु माऊथ' म्हणजे जेमतेम हातातोंडाची मिळवणी होऊन घासभर अन्नाची ददात नसणारे.

मी - म्हणजे त्यांच्याकडे खूपच कमी शेतजमीन असणार, एखाद दुसरा एकर नाही का?

तो शांतपणे म्हणाला - बिचाऱ्याकडे जेमतेम ४० एकर शेतजमीन असते.

मी थक्क झाले. डोळे विस्फारून म्हणाले,

मग इथे मध्यम शेतकऱ्यांकडे किती जमीन असते?

तो - २,००० एकर म्हणजे बरा शेतकरी. ५,००० एकरांपर्यंत जमिनीचा मालकही मध्यम शेतकरीच.

छोट्या शेतकऱ्याची आणि मध्यम शेतकऱ्याची ही व्याख्या ऐकून मी अधिक काही विचारले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी ग्रँड कॅनियनला जाण्यासाठी आम्ही निघालो. लाकडी कुंपण घातलेल्या अनेक रँचेस दिसले. त्यात घोडे फिरत होते. टाईट निळ्या जीन्स व ढगळ सदरा घातलेली माणसे शेतात वावरत होती. इथे शेतीच्या कामासाठी घोड्यांचा सर्रास उपयोग करताना दिसले. कुठं पांढऱ्या करड्या काळ्या कासेचा डेरा हलवीत चालणाऱ्या गाईंचा मोठा कळप चरताना दिसत होता. कुठे मांसाकरता पोसलेल्या तांबड्या गुरांचा कळप, तर कुठं काळी गुरं दिसत. कुठं घोडे तर कुठं रेडकासारखी पांढरी तुकतुकीत डुकरे. मस्तीने मुसमुसणारी गुरं, रानकामाचे धिप्पाड घोडे, डुक्करं, पोसलेल्या गुबगुबीत कोंबड्या पाहून मी चकित झाले. नजर वर टाकावी तिकडे 'हिरवे हिरवे, गार गालिचे, हरित तृणांच्या मखमलीचे' असा देखावा होता. विल्यमृस लहानसे सुरेख गाव वाटले. निळी-जांभळी रंगवलेली छपरांची आटोपशीर घरे, कुंपणाला लागून एकमेकांशी कुलूकुलू करणाऱ्या शेजारणी. बऱ्याच जागी रानात सोनकीसारख्या दिसणाऱ्या पिवळ्या धम्मक फुलांचे ताटवे.

सकाळी १० वाजता विल्यमृस सोडताना मनात आले. एका दिवसात अमेरिकेतल्या खेड्याची तोंडओळखसुद्धा नीटशी झाली नाही. मग स्वभाव कळणे तर सोडाच.

❖❖❖

# निसर्गाने कोरलेले शिल्प

विल्यमस् गाव सोडून दूरवर पसरलेले पिवळ्या धम्म सूर्यफुलांचे आणि हिरव्या गवतांच्या नक्षींनी विणले गेलेले गालिचे पाहात आम्ही ग्रँड कॅनियनला पोहोचलो. पुढे नर्तकीच्या हस्तमुद्रांसारखी वळणे घेत नेमक्या स्थळी येऊन उभे राहिलो.

पहिला परिणाम झाला, तो थक्क होण्याचा. ते निसर्गनिर्मित शिल्प पाहून मी चकित झाले. निसर्गाचे जगड्व्याळ रेखीव कॅनव्हास. छाया आणि प्रकाशाचा मनोहारी खेळ. सारं भान गळून गेलं. सावरीच्या वाळल्या बोंडातून निघून हलकेच वाऱ्यावर तरंगत जाणाऱ्या सावरीच्या म्हातारीसारखी मी तरंगत राहिले. आत्ममग्न झाले. वाटलं, हे तर दगडात स्वतः निसर्गानेच कोरलेले महाभारत आहे. अतिभव्य, अतिविशाल, सर्वव्याप्त, सर्वग्राही.

अमेरिकेचे भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष थिओडोर रुझवेल्ट यांनी ग्रँड कॅनियन पाहिले आणि आपल्या भाषणात भव्य दरीबद्दल ते म्हणाले होते-

'निसर्गाने निर्मिलेला अप्रतिम शिल्पकृतीचा हा विस्मयकारक मनोहर चमत्कार आज आहे तसाच राहू द्या. तुम्ही त्यात भर घालू शकणार नाही. कणभरसुद्धा नाही. कालपुरुष स्वतःच ही कलाकृती घडवत आला आहे. माणूस तिचे स्वरूप फक्त बिघडवूच शकेल. तुम्ही फक्त एवढेच करू शकता की, ही निसर्गकृती तुमच्या मुलांसाठी आणि जे कोणी तुमच्यानंतर जन्मणार आहेत त्यांच्यासाठी एक श्रेष्ठ प्रतीचे दृश्य म्हणून जतन करू शकता. जो प्रवास करू शकतो अशा प्रत्येक अमेरिकन नागरिकाने हे पाहिलेच पाहिजे. ही ग्रँड कॅनियन आहे त्या स्थितीतच ठेवा.'

वैश्विकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असणारे हे ठिकाण 'सांस्कृतिक वारसा' म्हणून

मान्य झाले आहे. जगातल्या सात नैसर्गिक आश्चर्यांत त्याची गणना होते. प्रचंड लांबी आणि रुंदी असणारी ही खोल दरी एखाद्या ग्रंथासारखी आहे. भूगर्भातील सारे चमत्कार व वास्तवता, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि मानव वसाहतीचे मानवाच्या विकासाचे शास्त्र अशी अनेक प्रकरणे या निसर्गाने निर्मिलेल्या ग्रंथात ग्रंथित झालेली आहेत. दोन अब्ज वर्षांचा सारा रंगीत कालपट इथे निसर्गाने स्वत: दगडात कोरून ठेवलेला आहे. ग्रँड कॅनियनमध्ये झाले आहे इतके भूगर्भशास्त्रीय रेकॉर्ड जगात कुठेही इतक्या स्पष्टपणे व्यतीत झालेले नाही. ग्रँड कॅनियनच्या भिंतींमधून जो कालपट दिसतो तो २० कोटी वर्षांचा आहे असे इतिहास सांगतो.

ग्रँड कॅनियन म्हणजे काय? निसर्गाने एक भव्य चमत्कार केला. युगानुयुगे कोलोरॅडो नदी भूमीच्या पोटात शिरत गेली. शिरताना तिने दुतर्फाचे खडक कोरून काढले. ही सारी दरी एकूण १,३०,००० चौरस मैल आहे. अमेरिकेतला हा एकमेव भाग आहे की, जिथे चार राज्यांच्या सीमा मिळतात. कोलोराडो, न्यू मेक्सिको, आरिझोना आणि युराह. यावरूनही ही दरी किती भव्य आहे याची कल्पना येते.

ग्रँड कॅनियन पाहाण्यासाठी वेगवेगळे पॉईंटस् आहेत. तिथून नदीच्या प्रवाहापर्यंत खाली उतरण्यासाठी १२ तास लागतात व वरती पुन्हा यायला ४८ तास लागतात. तिथून सारे दृश्य सुरेख प्रकारे पाहाता येते. अशाच एका पॉईंटवर उभी होते. समोर अतिभव्य पसरलेली ग्रँड कॅनियन. आपले क्षुद्र अस्तित्व निसर्गाच्या त्या विशाल रूपापुढे विसरून जायला झाले. अवाक् होऊन पाहाता पाहाता मनाला विलक्षण सुन्नपणा आला. का ते ठाऊक नाही.

दुसऱ्या एका पॉईंटवरून जरा वेगळ्या कोनातून समोरचा देखावा पाहात आम्ही उभे होतो. आजूबाजूला काही प्रवासी होते. वेगवेगळ्या देशांचे असावेत. चेहऱ्यावरून आपल्याकडे जसे हा दाक्षिणात्य, तो बंगाली, ही केरळी, तो पंजाबी असे समजते, शिवाय पेहेरावावरूनही समजते तसे इथे नव्हते. मात्र त्यांच्या भाषा वेगवेगळ्या होत्या. उभ्या असलेल्या पाच-पंधराजणांत काही तरुण-तरुणींची युगले होती. काही पोराबाळांना घेऊन आलेली कुटुंबवत्सल माणसे होती. काही वृद्ध जोडपी होती. एकूण मध्यमवयीन पुरुष जास्त दिसत होते. अचानक सगळ्यांच्यात चुळबूळ झाली. ओह क्यूॅट.... ल्येब्याँ...अमेझिंग...असे शब्दोच्चार झाले. मीही कुतूहलाने पाहू लागले. तर एक भली मोठी प्रचंड झुपकेदार उंच शेपटाची खार आमच्यापाशी आली होती. भलतीच धीट. मला फार आनंद झाला. अरेच्चा ही

तर 'काईबाब खार!' ग्रँड कॅनियनचे एक वैशिष्ट्य. पांढऱ्या शुभ्र झुपकेदार शेपटाची, करड्या रंगाची ती खार साधारणपणे १८" ते २०" लांबीची होती. मला वाचलेले आठवले की, काईबाब खार हा सस्तन प्राणी आहे. पाईन वृक्षाच्या बिया व झाडांची कोवळी लाल पाने खाणारा हा प्राणी उन्हाळ्यात बऱ्याचदा आळंबी खाऊनही उदरनिर्वाह करतो. हल्ली या खारींचा, दुर्मिळ व नाहीशा होत चाललेल्या जाती म्हणून विशेष संरक्षणाखाली असलेल्या जातींच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. मी अलगद खाली बसले. तीही पठ्ठी पळून न जाता शेपूट फुगवून माझ्याकडे एकटक पाहात ठाम उभी होती. तिला हात लावण्याचा मोह झाला. मी अलगद हात पुढे केला तेवढ्यात मागून एक अधीर आवाज आला.

'ओ प्लीज डोण्ट टच. दे मे हॅव डिसिजेस.' (त्यांना रोग असू शकतात. तिला स्पर्श करू नकोस.)

मी दचकून हात मागे घेतला आणि खारही दचकून धूम पळून गेली. पार नाहीशी झाली.

ग्रँड कॅनियनचे वन्यजीवन थक्क करून सोडणारे आहे. किती तरी वैचित्र्य आणि केवढी विविधता आहे त्यात! तिथल्या एका माहिती-फलकावरून खालील माहिती कळली.

ह्या विभागात २९९ प्रकारच्या पक्ष्यांच्या जाती आहेत, ७४ प्रकारचे सस्तन प्राणी आहेत. जमिनीवर आणि पाण्यातही राहू शकणाऱ्या प्राण्यांच्या आठ जाती इथे आहेत व एकूण ४० प्रकारचे सरपटणारे प्राणी आहेत.

अशा प्रकारची माहिती व ग्रँड कॅनियनचा भिंतभर नकाशा. त्यात रंगीत दिवे. त्याच्या आधारे पाडलेले विभाग. ग्रँड कॅनियनमध्ये दिसणारे ग्रॅनाईट, सँडस्टोन, लाईमस्टोन इत्यादी प्रकारचे वेगवेगळे थर व त्यात मिळणारे प्राण्यांचे, वनस्पतींचे अश्मीभूत झालेले अवशेष. उपलब्ध झालेले व संशोधनाअंती मिळालेले सारे अवशेष. या सगळ्यांचे अप्रतिम म्युझियम तिथे होते. म्युझियम म्हणण्यापेक्षा ती संपूर्ण माहिती - शाळाच होती. ही माहिती - शाळा सात हजार फूट उंचीवर आहे. मोठ्यांसाठी नकाशे, अवशेष, छापील साहित्य असे ग्रॅंड कॅनियनवरचे साहित्य तिथे उपलब्ध होते. पण जास्त कौतुक वाटले ते लहान मुलांसाठीही त्यांना आवडेल अशा पद्धतीने ग्रँड कॅनियनवर छोट्या छोट्या कार्टून फिल्मस् केल्या होत्या. त्या छोट्या टी.व्ही. स्क्रीनवर दोन-तीन ठिकाणी दाखविण्यात येत होत्या. पोरे उत्साहाने पाहात होती. वाचनशून्य. मोठ्यांसाठीही दोन टी.व्ही. सेटस्‌वरून ग्रँड कॅनियनवरचे

माहितीपट दाखविण्यात येत होते.

इथे शतकानुशतके वास्तव्य करून असणारी हवासुपाई ही रेड इंडियन जमात मानते की, परमेश्वराने पृथ्वीला हे एक प्रचंड भोक पाडले व त्यात पहिला पुरुष व स्त्री पाठविली. ही लोककथाही उत्तम प्रकारे चित्रित करून म्युझियममध्ये लावलेली आहे.

ग्रँड कॅनियनमध्ये अनेक जमातींचे रेड इंडियन्स राहातात. त्यांतल्या मुख्य जमाती हवासुपाई, हालापाई आणि नवाजो अशा आहेत. ११,००० वर्षांपूर्वी ग्रँड कॅनियनमध्ये वस्तीस आलेली पहिली मानवी जमात म्हणजे पाल्यो इंडियन्स. हे आशियातील लोकांचे वंशज आहेत. रेड इंडियन्सच्या जमातींपैकी अनासाझी इंडियन्सनी १,००० वर्षांपूर्वी बांधलेली धान्य कोठारे या कॅनियनमध्ये आजही उपलब्ध आहेत. इंडियन्सनी खडकावर नैसर्गिक रंगाच्या साहाय्याने काढलेली भित्तीचित्रेही ग्रँड कॅनियनच्या विशाल खडकांमध्ये सापडतात. त्यात शिकार करणाऱ्या मानवाची, प्राण्यांची, झाडांची चित्रे आहेत.

ग्रँड कॅनियनच्या वरच्या परिसरात म्हणजे जिथे उभे राहून साऱ्या कॅनियनचे दृश्य दिसते अशा सपाट भागावर रेड इंडियन्सच्या गावाचे सापडलेले भग्नावशेष जतन केलेले आहेत. 'टुसायन पाब्लो', अनासाझी जमातीचे खेडे कसे असावे याची कल्पना त्यावरून येते. माहितीपर फलक ठिकठिकाणी आहेत. पर्यटक चकित चेहेऱ्याने हे खेडे पाहात होते. आणि त्याच्या शेजारीच रेड इंडियन्सचे संग्रहालय उभारले आहे. ही वास्तू पूर्वी रेड इंडियन्स ज्या प्रकारे व ज्या तऱ्हेची बांधकामे करीत तशा पद्धतीने बांधलेली आहेत. त्यात रेड इंडियन्सची रहाणी, जीवनपद्धती यावरची रेखाचित्रे आहेत. कपडे विणण्याचा एक प्राथमिक अवस्थेतला 'माग' आहे. रेड इंडियन्स जी धान्ये खायचे ती जतन केली आहेत. त्यांची आयुधे, त्यांचे दागिने, त्यांचे कपडे, त्यांची भांडी याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले आहे. काऊंटरवर रेड इंडियन्सबद्दल अमेरिकेत जी पुस्तके प्रकाशित झाली आहेत ती सारी विक्रीसाठी उपलब्ध होती. मी त्यांपैकी 'पीपल ऑफ ब्ल्यू वॉटर' नावाचे पुस्तक घेतले. किंमत मात्र दणकून होती. त्यामुळे इच्छा असून इतर पुस्तके घेण्याचे धाडस झाले नाही. कॅनियनवरच्या व रेड इंडियन्सवरच्या व्ही. डी. ओ. कॅसेटही अनेक होत्या. एका अमेरिकन बाईने २० वर्षे केवळ रेड इंडियन्सवर अभ्यास केला. अजूनही ती करते आहे. अभ्यासाचा पहिला टप्पा म्हणून तिने एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. तोही उपलब्ध होता.

एका बाईने ह्या अफाट दऱ्याखोऱ्यांतून वीस वर्षे वणवण केली. रेड इंडियन्सच्या रहाणीचा, सवयींचा, संस्कृतीचा, समाजाचा तपशीलवार अभ्यास केला. फार थोडी माणसे अशी असतात की, ती स्वतःची वाट स्वतःच्या पायांनीच पाडतात. एकाएकी चालत रहातात. पुष्कळदा या वाटचालीत त्यांना फार मोलाचा ठेवा गवसतो. अखिल मानव जातीच्या व्यवहारांवर प्रकाश पडतो. या बाईच्या कर्तृत्वाने मी थक्क झाले. नतमस्तक झाले. या अफाट खडकाळ व किर्र घनदाट प्रदेशात ही गोरी बाई कशी हिंडली असेल? कुठल्या जिद्दीने आणि महत्त्वाकांक्षेने झपाटून वीस वर्षे ती हे काम करीत राहिली असेल? या ऋषितुल्य स्त्रीने लिहिलेली गाथा वाचायचीच असे मी ठरवून टाकले.

ग्रँड कॅनियनच्या परिसरात आणखी एक अद्‌भुत संग्रहालय होते. ग्रँड कॅनियनची शिल्पकार कोलोरोडो नदी संपूर्णपणे तरून जाऊन तिच्या दुतर्फा काय काय आहे, तिचा उगम कुठे होतो इत्यादी गोष्टी शोधून काढण्यासाठी अनेक गोऱ्या मंडळींनी गेल्या २०० वर्षांत जी साहसे केली, त्या साहसी संशोधकांच्या सफरीचा सारा इतिहासच या संग्रहालयात जिवंत केलेला आहे. वेगवान अंतःप्रवाह व फक्त १० सेंटीग्रेड तपमान असलेल्या या नदीत त्यांनी नेलेल्या बोटी व इतर सामग्री इथे जतन केलेली आहे. त्यांच्यापैकी ज्या लोकांची रोजनिशी, टिपणे, रेखाटणे उपलब्ध झाली ती इथे ठेवलेली आहेत. उपलब्ध छायाचित्रे आहेत. त्या काळातले नकाशे आहेत. सारे पाहाताना रोमांचित व्हायला झाले.

ग्रँड कॅनियनच्या रहस्याने झपाटलेला पहिला धाडसी संशोधक आणि प्रवासक होता 'जॉन पॉवेल.' १८६९ मध्ये त्याने पहिली अभ्यास मोहीम काढली व बोटीने संपूर्ण ग्रँड कॅनियनचा प्रवास केला. अत्यंत मोजक्या रकमेत, कमी अनुदानात नऊ लोकांना बरोबर घेऊन चार बोटींच्या ताफ्याने त्याने हा प्रवास केला. प्रवासात एक बोट फुटून तिचे तुकडे तुकडे झाले. बरोबरचा एक माणूस पहिल्या टप्प्यालाच गळाला. मोहिमेच्या मध्यावर आल्यावर याहून अधिक पुढे जाणे हितावह नाही, धोक्याचे आहे, असे घोषित करून त्याच्याबरोबरची तीन माणसे मोहीम सोडून परत जाण्यास निघाली. ते तिघे कधीच कुणाला दिसले नाहीत. कदाचित त्यांना तिथल्या टोळ्यांनी मारले असावे. परंतु जिद्दी आणि धाडसी पॉवेलने १,०४८ मैलांचा आपला नियोजित प्रवास पूर्ण केला. त्याला अठ्ठ्याण्णव दिवस लागले. आपल्या या अभ्यास-यात्रेविषयी जॉन पॉवेलने तपशीलवार ग्रंथ लिहिला आहे. तो तिथे विक्रीसाठी उपलब्ध होता. त्यावरचे त्याचे अन्य ग्रंथही उपलब्ध आहेत.

या ग्रँड कॅनियनमध्ये सर्वप्रथम येऊन स्थायिक झालेला पहिला वसाहतवाला 'जॉन हॅम्प'. तो १९१९ मध्ये मृत्यू पावला. त्याचे थडगे ग्रँड कॅनियनमध्ये वसलेल्या खेड्यात आजही उभे आहे. त्याच्या अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. आजही 'जॉन हॅम्प' तिथला कथानायक आहे. जॉन हॅम्पचे एक बोट इतर बोटांपेक्षा खूपच लहान होते.

एकाने विचारले-'बोटाला काय झाले?'

हॅम्प उत्तरला-'प्रवासकांना आणि हौशी बघ्यांना ग्रँड कॅनियन दाखवून झिजले.'

त्या खेड्यातला एक रहिवासी म्हणाला-

'परमेश्वराने ग्रँड कॅनियन निर्माण केली आणि जॉन हॅम्पने तिथे जाण्यासाठी मानवाकरता वाटा निर्माण केल्या. दोघांशिवाय त्या एकमेकांना पूर्णत्व येणार नाही.'

ग्रँड कॅनियन पाहून परत निघाले. विलक्षण गारठा होता. प्रथमच असे वाटले की, आज जे काही दृश्य पाहिले त्यामुळे साऱ्या आयुष्याचे सार्थक झाले.

❖❖❖

# यंग गन्स ए. के. ४७

इथल्या आयुष्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करणारी अनेक भारतीय मंडळी मला भेटली. त्यात ती किती प्रमाणात यशस्वी झाली आहेत मला शंका आहे. इथे सारेच वेगळे आहे. अमेरिका सुंदर आहे, चांगली आहे, पण आपल्याला जेवढी वाटते तेवढी फार ग्रेट नाही. एकच चांगली गोष्ट - आत्तापर्यंत म्हणजे गेल्या काही महिन्यांत माझ्या लक्षात आले की इथे प्रत्येक गोष्ट मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. जगातल्या उत्तमोत्तम वस्तूंची निवड तुम्ही इथे करू शकता. जगातल्या प्रत्येक राष्ट्रातल्या सर्वोत्कृष्ट चिजा इथे मोठी बाजारपेठ आहे म्हणून येतात.

भारतात राहून आपल्याला अमेरिका जेवढी श्रेष्ठ वाटते तेवढी नाही. याला कारणे अनेक. एक महत्त्वाचे कारण म्हणजे इथे गुन्हेगारीचे प्रमाण भयंकर मोठे आहे. आणि दुसरे म्हणजे इथेही बेघर लोक आहेतच. त्यांना स्ट्रीट पीपल म्हणतात. कारण ते रस्त्यावरच झोपतात.

इथे गुन्हेगारीचे प्रमाण एवढे जास्त का? टी. व्ही., वृत्तपत्रे पाहाताना त्यातून सर्वांत जास्त बातम्या असतात गुन्हेगारीच्या. मन विषण्ण करून टाकणाऱ्या. पॅरी मॅसन या अजरामर कॅरेक्टरला जन्म देणारा अर्ल स्टॅन्ली गार्डनर म्हणतो,

'गुन्ह्याविरुद्धची लढाई वाटते तेवढी सोपी नाही. कारण आजचा गुन्हेगार केवळ गंमतीखातर खून करणारा आहे. आयुष्याला कंटाळलेले लोक, ज्यांना आंतरिक शिस्त नाही असे लोक मनोरंजन म्हणून बऱ्याच गोष्टी करतात आणि शेवटी अशी वेळ येते की, त्यांना सर्वांत श्रेष्ठ प्रतीचे मनोरंजन म्हणून दुसऱ्या व्यक्तीचा खून करावासा वाटतो.'

एकदा चित्रपट पहायला गेले. थिएटर छोटे, २०० प्रेक्षक बसतील एवढे. एका इमारतीत सहा चित्रपटगृहे, पण छान. तिकिटाला रांग नाही. तिकीट व्यवस्था

कॉम्प्युटराइज्ड. चित्रपट निवडीला भरपूर वाव. आणि सगळ्यांत गंमत म्हणजे एका तिकिटात त्यावेळचे तीनही खेळ तुम्ही पाहू शकता. हे इथले विक्रीचे तंत्र असावे. एक तिकीट एका खेळाचे काढले की दोन खेळ फुकट. 'बाय वन, गेट वन फ्री'- एक विकत घ्या, एक फुकट मिळवा अशा पाट्या तर अनेक गोष्टींबाबत वाचायला मिळाल्या. सिझर्स पिझ्झा एक विकत घेतला तर दुसरा भला थोरला पिझ्झा फुकट. तर अशा एका शोचे एक तिकीट खरेदी करून दोन वेळा फुकट पाहाण्याच्या इराद्याने आम्ही थिएटरमध्ये गेलो. प्रेक्षकांत टीन एजर्स जास्त. थिएटर फुल्ल होते. १९८९ मध्ये तयार झालेला 'यंग गन्स' नावाचा चित्रपट होता. चित्रपट तांत्रिक दृष्ट्या अप्रतिम, प्रेक्षकांना अगदी खिळवून ठेवणारा. पण चित्रपटाचा विषय काय तर 'बिली द किड्' या गँगस्टरचे सनसनाटी जीवन. शेवट असा की, त्याला पोलिस इन्स्पेक्टरने - पॅट गॅरेटने गोळी घालून मारला का नाही हे गूढ. ती एक वदंता. आपल्याकडे भाऊसाहेब पेशव्यांच्या मृत्यूबद्दल आहे तशी. तो तिथून चक्क निसटला आणि तोच खूप म्हातारा होऊन फ्लॅशबॅकमध्ये स्वतःची गोष्ट सांगतोय. बिली फार शूर होता. त्यामुळे गॅरेटने त्याला जीवदान दिले. नालस्ती नको म्हणून त्याचा मृत्यू जाहीर केला. या बिली द किड वरच आणखी तीन चित्रपट मी टी.व्ही. वर पाहिले. वेगवेगळ्या काळात ते बनवले गेले होते. म्हणजे अशा गुन्हेगारांवर या मंडळींना पुन्हा पुन्हा चित्रपट बनवावेसे वाटतात आणि प्रेक्षकांना ते पुन्हा पुन्हा पाहावेसे वाटतात. 'जॅक डिलींजर' हाही असाच गुन्हेगार. लहानपणापासूनच त्याच्यात गुन्हेगारी वृत्ती वाढीस लागली आणि पुढे पटापटा मुडदे पाडणे ही त्याच्या दृष्टीने मुंग्या मारण्याइतकी क्षुद्र आणि सहज क्रिया झाली. या 'जॅक डिलींजर' वर गेल्या ५० वर्षांत अनेक चित्रपट निघाले, अजूनही निघतील. बोनी ॲण्ड क्लाईड, बिली द किड, जॅक डिलींजर हे यांचे लिजंडरी हिरोज. आपल्याकडे 'तंट्या भिल्ल' हा लिजंडरी हिरो आहे. ब्रिटिशांचा रॉबिनहुड आहे. या गुन्हेगार व्यक्तींना आम्ही माहात्म्य दिले, पण का? तर श्रीमंतांना लुटून ते त्यांचे धन गरिबांत वाटायचे. त्यांच्या दुष्टपणात, गुन्ह्यातही काही निवड होती, नीतिमत्ता होती. इथे तसे नाही. इथे मुळातच गुन्हेगारी वृत्तीच ग्लोरीफाय केलेली दिसून येते. इथले गुन्हेगारीवरचे चित्रपट आणि त्यातल्या हिरोंची प्रतिमा आणि लोकप्रियता पाहून इथल्या लोकांना गुन्हेगारीचे आकर्षण असावे असे मला वाटले. 'कृतिशून्यता आणि गुन्हा यामागचे कारण अपेक्षापूर्ती न होणे हे आहे. ही अपेक्षापूर्तीची प्रतीक्षा करताना आम्ही विनोद करणे, खाणे, झोप घेणे आणि गुन्हे करणे या गोष्टींनी आमचा वेळ भरून काढतो.'

हे थोर विचारवंत इमर्सनचे वाक्य आठवले.

वृद्ध जॉन वेनने काम केलेला एक अगदी नवा चित्रपट पाहिला. तो सत्तरीच्या पुढे आहे. त्यात तो अत्यंत कुप्रसिद्ध गुन्हेगार असतो. साऱ्या पोलिस डिपार्टमेंटला हवा असलेला. त्याला डॉक्टर सांगतात की, तुला कॅन्सर झालाय. तू काही दिवसांचा सोबती आहेस. हा वृद्ध हिरो एका आडगावात शेवटचे दिवस घालवण्यासाठी व एकांतात मरण्यासाठी येतो. आपल्यासारख्या शूरवीराचा रोगाने मृत्यू यावा हे त्याला असह्य वाटते. त्या गावातल्या एका मध्यमवयीन स्त्रीच्या घरात तो पोटभाडेकरू म्हणून राहतो. बाईच्या १२ वर्षांच्या मुलाला हाच तो सुप्रसिद्ध गुन्हेगार हे त्याच्या घोड्याच्या जीनवरच्या व बंदुकीवरच्या आद्याक्षरांवरून कळते. मुलगा त्याचा भक्त बनतो. वृद्ध जॉन वेन आपल्या पूर्वीच्या तीन दुष्मनांना एका बारमध्ये बोलावतो. सुरेख कपडे करून ऐटीत जॉन निघतो. पूर्वीचा हिशेब चुकता करतो. प्रचंड गोळीबार होतो. आपल्या तिन्ही शत्रूंना यमसदनाला पाठवून जॉन वेन हिरोचे मरण पत्करतो. रोगजर्जरीचा मृत्यू त्याच्या नशिबी लिहिला असतानाही तो योद्ध्याचे मरण मरतो. सारा गाव भयचकित. छोटा पोरगा आठवण म्हणून जॉन वेनचे पिस्तुल काढून स्वतःकडे घेतो आणि त्याला आदराने वंदन करतो.

म्हणजे नवी पिढीही गुन्हेगारीकडेच आकर्षित होते आहे आणि गुन्हेगार प्रवृत्तीची पूजक आहे हे दिग्दर्शक, सेन्सॉर आणि प्रेक्षकांना मान्यच आहे, असे हे चित्रपट पाहून परतताना मनात आले. बरोबरचे अमेरिकन गृहस्थ चित्रपटाच्या प्रेमात पडले होते. 'वंडरफुल' म्हणत त्यांनी गाडी सुरू केली. इथली तरुण पिढी 'हाय ऑन ड्रग्ज' असण्यात आयुष्याची इतिकर्तव्यता मानते. व्यसनाधीनता हा त्यांचा स्थायीभाव झाला आहे. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ म्हणतात,

'आज अमेरिकेत बालकांच्या बाबतीत घडणारी सर्वांत मोठी दुर्घटना त्यांचे 'तारुण्य' हीच आहे.'

सदर्न कॅलिफोर्नियात गाड्या कधीच थांबत नाहीत. झुरळांच्या झुंडी आक्रमणासाठी याव्यात तशा त्या तुरूतुरू धावत सुटलेल्या दिसतात. सतत अंगावर आल्यासारख्या येतच राहातात. ते पाहाताना वाटते की, यांचे अस्तित्व टोळधाडीसारखे आहे. संख्येने प्रचंड आणि कृतीने विध्वंसक.

नवशिक्या परदेशी माणसाला इथे ड्रायव्हिंग फार भयानक वाटते. ताशी १०० मैल वेगात हायवेवरून गाड्या धावत असतात. त्यामुळे किंचितसे अनवधान किंवा छोटीशी चूक महागात पडू शकते. या हायवेवर अपघातांपेक्षा गुन्हे जास्त

होतात. बरोबरच्या अमेरिकन गृहस्थांनी मला सांगितले की, 'एनी टाईम यू कॅन शॉट डेड ऑन दीज हायवेज.' फार सहजपणे त्यांनी सांगितले, पण मी मात्र घर येईपर्यंत अस्वस्थ होते.

कुणालाही शूट करणे ही इथे फार धक्कादायक बाब वाटत नसावी. एकदा मी बँकेत जाताना लिंडाला विचारले,

'तू कॅश का जवळ बाळगत नाहीस? सतत थोडेसे पैसे काढायला बँकेत का जातेस?'

ती हसली. कुठेही इथे आधी हसतात, मग बोलतात हे मला सवयीने ठाऊक झाले होते. सहजपणे ती म्हणाली,

'कॅश जवळ असेल तर ड्रग अॅडीक्ट पैशासाठी मारून टाकतात म्हणून कॅश बाळगत नाही इथे कुणी.'

तिचे वाक्य ऐकून मला आपल्याकडचा 'सारांश' नावाचा चित्रपट आठवला. भारतात राहाणाऱ्या वृद्ध आईबापांचा अमेरिकेत राहाणारा एकुलता एक मुलगा. त्याला काही डॉलर्ससाठी ड्रग अॅडीक्ट मारून टाकतात. त्या पोराच्या अस्थी आणण्यासाठी भारतातल्या एअर पोर्टवर वृद्ध बाप खूप रखडतो. शेवटी कातावून वरिष्ठाला भेटतो. संताप, चीड, असहाय्यता, अपमान सारे त्याच्या डोळ्यांत, आवाजात भरलेले असते. तो सांगतो, 'मी माझ्या अमेरिकेतल्या मुलाच्या अस्थी आणायला आलोय. व्ही.सी.आर. किंवा टी.व्ही. नाही.' अमेरिकेतून टी.व्ही., व्ही.सी.आर. सारख्याच चिजा येऊ शकतात, अस्थी नाही. असा आमचा अजूनही सार्वत्रिक समज आहे.

गुन्हेगारांना डोक्यावर घेणारा हा समाज. इथले तरुण-तरुणी ड्रग अॅडीक्ट. इथल्या किशोरी, बालिका कुमारी माता. त्यांच्यासाठी इथे वेगळ्या शाळा काढाव्या लागतात, एवढी त्यांची संख्या. इथे जीविताची शाश्वती नाही. इथे कुणीही कुणाही मायेफिरूच्या गोळीचा निशाणा बनू शकतो. काही डॉलर्ससाठी ड्रग अॅडीक्ट इथे माणसाची हत्या करतात. एवढेच पुरेसे नाही. इथे ज्या पोर्नोग्राफिक फिल्म्स् दाखवल्या जातात त्यांतल्या पन्नास टक्के फिल्म्स् ह्या 'चाईल्ड अॅब्यूज' वर असतात. आणि लोक त्या कुतूहलाने पहातात. चाईल्ड मोलेस्टेशन, बालबलात्कार इथे मोठ्या प्रमाणात होतात आणि बऱ्याच केसेसमध्ये बालकांचे वडीलच या बलात्काराला जबाबदार असतात. सारे घृणास्पद, किळसवाणे, माणुसकीवरचा विश्वासच उडावा असे.

टीव्हीवर एक फिल्म पाहिली. एक खूप निरागस चेहऱ्याचा, भाबडा, गोड, पाच वर्षांचा मुलगा. त्याचा फुटबॉलचा कोच दिसायला उग्र, रांगडा आणि आडदांड. तो या छोट्या पोरावर बलात्कार करतो. पोरगा नंतर भयानक भेदरलेला. तो भित्र्या सशासारखा, माणूस पाहून चटकन् लपू लागतो. पोराला आई नसते. पोरगा बापाला पाहिल्यावरही घाबरून कापू लागतो. एक सोशलवर्कर बाई सतत मुलाबरोबर राहाते. त्याला धीर देते. पोरगा पोलिसांच्या ताब्यात असतो. आधी पोलिसांचा आणि सोशल वर्करबाईचाही रोख पोराच्या वडिलांवर असतो. नंतर कळते की वडील निरपराध आहेत.

मुलाला कोर्टात उभे करतात. फुटबॉल कोच फार निष्णात वकील देतो. त्याच्याविरुद्ध सरकारी वकील अशी केस कोर्टात सुरू होते. पोरगा विलक्षण भ्यालेला असतो. वडील आणि ती सोशल वर्करबाई रोज त्याच्याशी बोलून त्याला समजावून त्याचे धैर्य वाढवतात. भिऊन पार आकसलेला पोरगा हळू हळू धक्क्यातून सावरतो.

फिल्मच्या शेवटी तो पाच वर्षांचा, नितळ डोळ्यांचा पोर खालच्या आवाजात मधे मधे अडखळत कोर्टाला घडलेला सारा प्रकार सांगतो. विरोधी वकील विचारतो, 'तू इतके दिवस गप्प का बसलास? वडिलांना, बाईंना किंवा पोलिसांना का सांगितलं नाहीस?' पोराच्या चेहऱ्यावर पुन्हा भीतीचे सावट पसरते. अगदी केविलवाण्या चेहऱ्याने पण सारे धैर्य गोळा करून तो सांगतो की माझ्या लाडक्या कुत्र्याला कोचने माझ्यासमोर सॅनिटरी होलमध्ये घालून ठार मारले. घडलेला प्रकार मी कुणाला सांगितला तर मलाही तो असेच ठार करेल, असे त्याने सांगितले.

अपराध सिद्ध होतो. कोचला शिक्षा होते. ही फिल्म पाहून मला विलक्षण उदास व्हायला झाले. मनात आले हा सारा समाज आजारी मनाचा आहे, विकृत आहे.

प्रवासामुळे तुमची वृत्ती विशाल होते. पण मायदेशी परतणे हा एक खूप आनंददायक प्रसंग असतो हे मला अमेरिका सोडून भारतात परतताना फार फार जाणवले.

मी भारतात परत आल्यावर काही आठवड्यांनी मला एक पत्र मिळाले. आईवडिलांचा विरोध पत्करून त्यांची एकुलती एक मुलगी आणि अत्यंत बुद्धिमान असलेली माझी मैत्रीण अमेरिकेच्या आकर्षणामुळे स्थायिक होण्यासाठी मोठ्या अपेक्षेने आणि उमेदीने अमेरिकेला गेली होती. तिचे ते पत्र होते. त्यात तिने मला लिहिले होते,

'मला इथे अजिबात करमत नाही. सारखे परत यावेसे वाटते. इथे सगळे फार विचित्र आणि भयानक आहे. आपल्या देशाप्रमाणे दारिद्र्य आहे. लॉस एंजलीसलाही बेघर माणसे आहेत जी फूटपाथवर झोपतात. काही दिवसांपूर्वी खूप थंडी पडली तेव्हा त्यांतली काही मरण पावली. मग लॉस एंजलीसमध्ये आणि बिहारमध्ये काय फरक?

आपल्यापेक्षा इथे गुन्ह्यांचे प्रमाणही खूप जास्त आहे. टीव्हीवर रोज कसल्या कसल्या बातम्या ऐकायला मिळतात; ज्यामुळे मन खिन्न होते. काही दिवसांपूर्वी एका माणसाने शाळेच्या मैदानात 'ए.के. सत्तेचाळीस' रायफलने गोळीबार केला आणि नंतर आत्महत्त्या केली. बरीच शाळकरी मुले दगावली. असे सगळे इथे चालू आहे. इथे आल्यावर एकंदरीतच मला आयुष्यात कधीच आले नव्हते, इतके डिप्रेशन आले आहे. काही सुचेनासे झाले आहे.'

माझ्या प्रिय मैत्रिणीचे पत्र खूपच बोलके होते. तिला अमेरिका लवकर कळली होती.

❖❖❖

# म्हातारा इतुका न

'कितीही वृद्धाश्रम, नर्सिंगहोम, सोसायटीज अस्तित्वात असल्या तरी आजचे जग म्हातारं होण्यासाठीं वाईटच आहे किंबहुना भयानक आहे.'

आम्ही एका कॉफीशॉपमधे ताजी दळलेली मस्त वासाची कॉफी पीत बसलेलो असताना शेजारच्या टेबलावरून माझ्या कानावर हे वाक्य पडले. वाईट दिसणार नाही अशा बेताने मी मागे वळून पाहिले.

दोन सत्तरीच्या पुढच्या वृद्धा ऐटीत बसून कॉफी पीत होत्या. सकाळचे नऊ वाजले होते. तरुण मंडळी नोकरीवर, त्यापेक्षा लहान कॉलेज अथवा शाळेत; त्यामुळे अशावेळी माझ्यासारखे प्रवासक किंवा वृद्ध मंडळीच कॉफी शॉपमधे दिसतात. फ्रेंच विचारवंत ला-रोफुको यांची अनेक बोधवचने अक्षर वाङ्मयात जमा झाली आहेत. तो म्हणतो 'वृद्धत्व हा वृद्धांचा नरक आहे.' तसे या मंडळींकडे पाहून वाटत नव्हते. दोघींचेही कपडे उत्तम फॅशनचे होते. चेहऱ्यावर रंगरंगोटी आणि केसांचे हेअरडू. त्यांच्या अंगावरून येणारी झुळूक मंद सुवास घेऊन येत होती. या दोघी अगदी टिपिकल अमेरिकन वृद्ध स्त्रियांचे प्रतीक होत्या.

या वृद्धा आपला वेळ कसा घालवतात? आपल्याकडे पुण्यामुंबईत उच्च मध्यमवर्गीय स्त्रिया क्लबात जातात आणि पत्ते खेळण्यात वेळ घालवतात. सदाशिवपेठ, नारायणपेठेतल्या एखाद्या देवळात एकत्र जमतात. भजने, अभंग म्हणतात. लेकाच्या, सुनेच्या तक्रारी एकमेकींना सांगतात.

७०/८० वर्षांच्या अमेरिकन म्हाताऱ्या नटून थटून आपली गाडी काढून चक्क गॅम्बलींगला जातात. नवऱ्याने ठेवलेल्या पैशांनी त्याची आठवण काढत जुगार खेळतात. लासवेगासच्या कॅसिनोत 'ओ पुअर फिलीप. ही लेफ्ट मी अ फॉर्च्यन अँड पासड् अवे' असे एक बाई गॅम्बलींग करत एका हाताने बिअरचा डबा रिचवत म्हणत

होती. तिच्या बोलण्यात फिलीपच्याबद्दल दुःखापेक्षा कौतुकच जास्त होते. इथले वृद्ध आणि वृद्धा शिकण्यासाठी शाळेत प्रवेश घेतात. त्यात बागकाम, फोटोग्राफी, चित्रकला, व्हीडीओशूटींग, क्रिअेटीव्ह रायटींग असे नाना प्रकारचे कोर्सेस असतात. आपल्याकडे जसे राजपुत्र ६४ कलांत प्रवीण व्हायचे तसे इथे ६४ कला शिकण्यासाठी राजपुत्र असावे लागत नाही किंवा आज भारतात कॉलेजप्रवेशासाठी वयाची अट असते तसे ठराविक वय असावे लागत नाही. खूप इच्छा असूनही माझ्या आईला मॉन्टेसरी टीचरचा कोर्स करता आला नाही; कारण तिचे वय ४२ वर्षांचे होते. इथे ४२ काय ८२ वर्षे वय असेल तरी काहीही शिकता येते आणि वृद्ध मंडळी ते शिकतात.

म्हातारपणामुळे कुणी दुःखी दिसत नाही. मला चापट मारून एक ओळखीचा म्हातारा म्हणाला, 'लाईफ बिगीन्स ॲट सिक्स्टी स्वीटी!' किंवा 'टू हॅव अ किक् आऊट ऑफ लाईफ' हे लाईफ म्हणजे यांच्या लेखी काय तर 'टू हॅव फन.' आता यांची 'फन' ची व्याख्या काय? 'फन' ही इथे फारशी गुंतागुंतीची गोष्ट नाही. टीव्हीवर पिक्चर बघणे ही ग्रेट फन असू शकते. हॉटेलात बावीस इंचाचा 'पेसरोनी पिझ्झा' ही फन असू शकते. नाचणे, धावणे, पत्ते खेळणे, ही 'फन' असू शकते. कॉफीशॉपमध्ये कॉफी पीत पेपर वाचणे व केक खाणे ही मस्त 'फन' असू शकते. एकाद्या म्हाताऱ्या बाईला घेऊन कारमधून लेकवर जाणे आणि बोटींग करताना किसिंग करणे ही फन असू शकते. बिल क्रॉसबी या अमेरिकन निग्रोचे आपल्याला कंटाळवाणे वाटणारे विनोद खदखदा हसून हातपाय झाडत पाहाणे ही गंमतच. वेगवान कोस्टररोलरमध्ये बसून ते सुरू झाल्यावर बेंबीच्या देठापासून घसा सुकेपर्यंत किंचाळत रहाणे आणि ते थांबल्यावर उतरताना 'ओ ऽऽ इट वॉज ग्रेट फन' म्हणणे ही तर फार श्रेष्ठ प्रतीची गंमत असू शकते. एवढेच नाही, तर ही मंडळी झू बघायला जातात. आपल्याकडे चतुःश्रृंगीच्या जत्रेत कपाळावर पोरेटोरे रंगवतात किंवा आफ्रिकेतील वनवासी टोळ्या नृत्यासाठी प्राण्यांचे मुखवटे तोंडावर चितारून घेतात तसे ही मंडळी वाघाचे, माकडाचे चेहरे स्वतःच्या तोंडावर रंगवून झू बघत फिरतात. स्वतःवरच खूष होतात आणि म्हणतात 'ओ ऽऽ धिस इज टू वंडरफुल फॉर वर्ड्स्!'

एवढ्या आनंदात वावरणाऱ्या आणि जिंदगीची मजा लुटणाऱ्या या सर्व वृद्ध मंडळींना अमेरिकेत 'सिनियर सिटीझन्स' म्हणतात. त्यांच्यासाठी हा देश खूप सवलती देतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या देशात जो वृद्ध होतो त्याचा सर्व आर्थिक भार देश घेतो. ती व्यक्ती या देशाची 'वडिलधारी नागरिक' (सिनियर सिटीझन)

आहे म्हणून प्रत्येकाला इथे वृद्धत्वाची पेन्शन मिळते. त्यामुळे म्हातारपणी कसे होणार ही चिंता कुठल्याच स्त्रीपुरुषास नसते. वृद्धत्वातही ते 'निज शैशवास' जपत राहाताना दिसतात. सकाळी फिरायला बाहेर पडले की मला साधारणपणे ६५/७० वर्षांचे दोन मस्त म्हातारे जॉगिंग करताना दिसायचे. अर्धी चड्डी, टीशर्ट, सनग्लासेस्, डोक्यावर कॅप असा त्यांचा वेष. दोघांचे चेहरे अत्यंत आनंदी. एकूणच मला हताश, दुर्मुखल्या चेहेऱ्याचे म्हातारे आणि म्हाताऱ्या आढळल्याच नाहीत. अगदी शोधून सुद्धा. आर्थिक स्वावलंबन हे त्यातले महत्त्वाचे कारण असावे.

ही वृद्ध मंडळी म्हातारपणी प्रेमात पडतात. एखादी म्हातारी मैत्रीण शोधतात. लग्नाच्या फंदात पडावे वाटले तर लग्नही करून टाकतात. घोळामेळाने सारे राहातात. त्यांचे जग वेगळेच असते. सारी वृद्ध मंडळी सिनियर सिटीझन अपार्टमेंटमधे रहातात. तिथे भरणाऱ्या भाड्यातच त्यांचा नाश्ता व जेवणाचे पैसे धरलेले असतात. एका हॉलमधे सारे एकत्र खाण्यापिण्यासाठी येतात.

वृद्धांसाठी चकित करून सोडणारी आणखी एक सोय इथे आहे. ती म्हणजे 'मोबिल होम पार्क.' कल्पना एकदम रम्य. वृद्धांसाठी यात चाके असलेली घरे असतात. पार्कमधली थोडी जागा भाड्याने घ्यायची. गाडीला बांधून आपले चाकाचे घर तिथे आणून उभे करायचे. त्या राज्यात किंवा शहरात कंटाळा येईस्तवर राहायचे. कंटाळा आला की आपले चाकाचे घर घेऊन चालले दुसरीकडे. ही घरे फार टिकावू नसतात आणि त्यांची किंमत बरीच कमी असते अशी माहिती मला मिळाली. फिरस्त्यांची पाले पडतात तशी मला या मंडळींची ही जीवनपद्धती वाटली. सिल्व्हीनिया मोबाईल पार्क नावाच्या मोबाईल पार्कमध्ये मी गेले होते. वातावरण सारे शांत. चाके असलेली सुमारे ३०/३५ घरे. त्यात पार्कचे एक ऑफिस. तिथे एक नव्वद वर्षांचा वृद्ध बसला होता. त्याचे डोळे लहान मुलासारखे होते. आवाज मधुर होता. तात्पुरते राहायचे तरी प्रत्येकाने घराभोवती बाग केली होती. कुणी जोडपे बागेत काम करत होते. एकजण व्हरांड्यात खुर्ची टाकून वर्तमानपत्र वाचत होता. या सर्वांच्या जवळून मी चालत गेले. त्यांचे लक्ष जावे म्हणून रमत गमत गेले; पण रस्त्याने मुंगी चालत जावी एवढेच महत्त्व त्यांच्या लेखी माझ्या खटाटोपाचे दिसले. कुणी माझ्याकडे मान वर करून पाहिलेही नाही. बोलणे तर दूरच.

या वृद्ध मंडळींना इतरत्र अनेक सवलती असतात. मी एकदा प्रचंड मोठ्या दुकानात काचेला नाक लावून आतल्या वस्तू पाहात होते. तिथे एकेजागी सिनियर सिटीझन्स डिसकाऊंटचा बोर्ड दिसला. म्हणजे या मंडळींना वस्तू खरेदीवर स्पेशल

डिसकाऊंट असतो. का तर ते सिनियर सिटीझन्स! काही हॉटेलमध्ये किंमतीत सवलत असते. प्रवासभाड्यांत सवलत असते.

या मंडळींसाठी नर्सिंग होम आहेत. तिथे फुकट औषधोपचार, सारी वैद्यकीय मदत व सकस आहार मिळतो. वृद्धाश्रमही आहेत. जे स्वतःच्या हिंमतीवर राहाण्यास शारीरिक दृष्ट्या असमर्थ आहेत त्यांचीही राष्ट्राने सोय पाहिली आहे. त्यांच्यासाठी मेडिकल सोशल वर्कर नियुक्त केलेले असतात. ते या वृद्धांच्या अडचणी समजावून घेऊन त्यातून मार्ग काढतात.

अमेरिकेतल्या वृद्धांच्या जीवनाविषयी मला फारच आकर्षण वाटले. 'म्हातारपण' या देशात घालवावे असे कुणालाही वाटेल असे मला राहून राहून वाटे.

एके दिवशी गाडी भल्याथोरल्या शॉपिंग मॉलपाशी पार्क करत असताना एका चंदेरी रंगाच्या गाडीचे उघडे दार एका गाडीला थोडेसे लागले. त्या गाडीत एक देखणा तरुण आणि त्याची तितकीच देखणी बायको होती. एक खूप सुरकुत्यांचे शरीरभर जाळे असलेला ८०/८५ वर्षांचा म्हातारा त्या चंदेरी रंगाच्या गाडीत पुढे ड्रायव्हरच्या सीटशेजारच्या सीटवर बसला होता. त्याच्याबरोबर आलेली व्यक्ती काही आणायला दुकानात गेली असावी. त्या तरुणाने म्हाताऱ्यावर तोंडसुख घेण्यास सुरुवात केली. मला राहावले नाही.

मी-जाऊ द्या. म्हातारं माणूस आहे. (माझ्या देशात एवढे म्हटले की पुरते. कारण आमचा समाज म्हातारपणाबद्दल आदर करतो.)

तरुण किंचाळला,'ऽऽ ही इज ओल्ड अँण्ड दॅट इज नॉट माय फॉल्ट. ही हॅज लीव्हड् हिज लाईफ. नाऊ ही शुड बीहेव हीमसेल्फ.'

अरेच्चा! हे तत्त्वज्ञान ऐकून मी थक्कच झाले. भारतात आमचे आजोबा-आजी ही आमची संकटनिवारक असतात. त्यांचे सल्ले आम्हाला मोलाचे असतात. म्हातारी माणसे म्हणजे संकट असे आम्हाला कधीच वाटत नाही.

इथल्या तरुण पिढीला वृद्धत्व हा एक समाजाचा निरुपयोगी भाग वाटतो. स्वतःचे वृद्ध मातापिता हा त्यांना अनावश्यक कंटाळवाणा भाग वाटतो. वीस वर्षांचा जॅक म्हणाला,

'वी आर हिअर ऑन द अर्थ टू अर्न, स्पेंड, अँड कन्झुम.'

❖❖❖

ग्रंथालय

REFBK-0026799

REFBK-0026799